९०६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय इतिहास

लेखक शंगाजी दामोदर काळे

सन १८९९

संग्रहालय क्रमांक १७६

पुस्तकाचें नांव हिन्दुस्थानच्या साद्यःस्थिती चित्र

१७६ / इति.

॥ श्री ॥

# हिंदुस्थानच्या
# सद्यःस्थितीचें चित्र.

स.ह. ३६९

चित्रकार

अंताजी दामोदर काळे

यांनीं

मुंबईः—"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

सन १८६७ च्या २५ व्या आक्ताप्रमाणें रजिस्टर करून सर्व हक्क मालकानें स्वाधीन ठेविले आहेत.

सन १८९९.

किंमत ८ आणे.

# समर्पण.

श्रीमंत

## डा॰ मोरेश्वर गोपाळ देशमुख,

बी. ए., बी. एस्. सी., एम्. डी.,

माजी असि॰ केमि॰ अनालायझर,

जे. पी., मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो

यांस,

त्यांच्या ठायीं असलेल्या परोपकार, शांति, निस्पृहता, ाभिमान, इत्याद्यनेक गुणांवर लुब्ध होऊन व हरतऱ्हेच्या कारराशीचें स्मरण म्हणून कृतज्ञताबुद्धीनें हें पुस्तक रपुरःसर त्यांच्या परवानगीनें अर्पण केलें आहे.

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

प्रत्येक मनुष्यावर आईबापाच्या ऋणाची जबाबदारी आहे, तशी तो ज्या देशांत जन्मला असेल, त्या देशाचीही त्याजवर जबाबदारी असते. ही जबाबदारी ओळखून वागणारास जगाकडून शाबासकी मिळाली, तर त्यांत आश्चर्य नाहीं. कारण, तशी वर्तणूक ठेवणें ह्मणजे असिधारावलेहनव्रत संभाळणें होय! हिंदुस्थान देशाला अवनति प्राप्त झाली आहे, बहुजनसमाज आज्ञानामध्यें बुडाला आहे! अशा स्थितींत काय केलें असतां आपण मातृभूमीच्या ऋणांतून मुक्त होऊं, हें न कळल्यामुळें बरेच दिवसपर्यंत चित्तास स्वस्थता नव्हती! पुढें विचार करितां असें कळून आलें कीं, सद्यःस्थितीचें चित्र तयार करून तें प्रिय वाचकांस दाखवावें. तें पाहून डोळ्यावरील धुंदी उतरली तर त्यांस पुढील मार्ग क्रमण्यास सोपें जाईल असें वाटल्यावरून एक पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली. ईश्वरकृपेनें मला जें ज्ञान प्राप्त झालें आहे, त्यावरून माझी पक्की खात्री झाली आहे कीं, आज जगांत जितके राज्यकर्ते आहेत, तितक्यांमध्यें इंग्रजांइतके उदार मनाचे दुसरे कोणीच नाहींत. सदर्हू राज्यकर्ते परकी देशांतील राहणारे असल्यामुळें त्यांस इकडील लोकांची खरी स्थिति माहीत नाहीं. यामुळें कधीं कधीं त्यांच्या हातून चुका होतात. या चुका नाहींशा झाल्या तर या राज्यास रामराज्याची उपमा देण्यास कांहींएक हरकत नाहीं. असा स्तुत्य उद्देश मनांत असल्यावर १२४ अ कलमाची आठवण होणारच कोठून? ही घोरपड लांब गेल्यामुळें पुस्तक झपाट्यानें लिहून तयार झालें, व त्यामुळें अर्थात् आनंद होणें साहजिक आहे. परंतु गरिबीमुळें तें छापण्याचें अटकणार, असें पाहून पराकाष्ठेचें दुःख झालें. सुखापाठीमागें दुःख आल्यास नवल कसलें? तेव्हां दयाघन परमेश्वराच्या

कृपेखेरीज हें काम पार पडत नाहीं असें वाटून मी मनोभावें त्याची प्रार्थना करून मदत मागितली. तेव्हां चमत्कार असा झाला कीं, जे एकेक प्रत घेणार नव्हते, त्यांनीं दोन दोन घेतल्या! याप्रमाणें उदार आश्रय मिळाल्यावर मुंबईस आलों. डा० देशमुख यांच्या अन्नानें हा देह जगला आहे, म्हणून त्यांसच हें पुस्तक अर्पण करण्याचा माझा प्रथमपासून विचार होता, तो मी त्यांस कळविला. रावसाहेब ओक यांचा अभिप्राय पाहून डा० साहेबांनीं माझ्या विनंतीस मान दिला. यामुळें उपकारराशीमध्यें थोडीबहुत भर पडली हें सांगावयास नकोच. असो, मायभाषेची सेवा करण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग आहे. हिंदुस्थानची उन्नति व्हावी, अशी माझी अत्युत्कट इच्छा आहे. आश्रयरूपी जीवन मिळाल्यास या इच्छावल्लीचीं सुंदर फळें आश्रयदात्यांस चाखावयास मिळतील हें सांगणें नकोच. या पुस्तकांत अनेक दोष असतील ते टाकून वाचक गुण असतील तेच घेतील अशी आशा आहे.

सदर्हू पुस्तक तयार करतांना 'विचारसाधन,' 'केरळ कोकिळ,' 'बालबोध,' राजेकृत 'कृषिकर्म विद्या' गोखलेकृत 'बगिच्याचें पुस्तक' यांची फार मदत झाली, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. तसेंच हें पुस्तक तपासण्याचे कामीं माझे कित्येक विद्वान् मित्र यांनीं व प्रती खपविण्याच्या कामीं गांवोगांवच्या मित्रमंडळींनीं—त्यांतही विशेषेंकरून नानुभाई अढिया डाहाणूकर यांनीं—निरपेक्ष बुद्धीनें जी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. शेवटीं ज्या सच्चिदानंद प्रभूच्या कृपेनें आजचा दिवस बघितला त्याचे अंतःकरणपूर्वक उपकार स्मरून ही प्रस्तावना पुरी करतों.

खत्तलवाडा, जि० ठाणें,
तारीख १५-१२-९९.

ग्रंथकर्ता.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| वर्णन. | १ |
| लोकसंख्या. | २ |
| दुष्काळ. | ३ |
| गरिबी. | ७ |
| शेती, भाग १ ला. | २१ |
| ,, २ रा. (जिरा०) | ४० |
| ,, ३ (बागा०) | ५६ |
| व्यापार. | ६९ |
| विद्या. | ८६ |

श्रीगणेशाय नमः

# हिंदुस्थानच्या औद्योगिक सद्यःस्थितीचें चित्र.

प्रिय स्वदेशबांधवहो, हल्लीं आपल्या देशाला जी निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे, ती जाऊन उत्तमावस्था प्राप्त व्हावी अशा हेतूनें अनेक ठिकाणची माहिती एकत्र जमवून आपल्या समोर ठेविली आहे, ती आपल्या आदरास पात्र होईल अशी आशा आहे.

**वर्णन.**–हिंदुस्थान देशाचा आकार प्रत्यंचा लावून ओढलेल्या धनुष्याप्रमाणें असून त्याची लांबी १९०० मैल व रुंदी १८०० मैल आहे. याचें क्षेत्रफळ १९८२१२० चौरस मैल आहे. यापैकीं ८८१००० चौ. मै. प्रदेश इंग्रज सरकारच्या ताब्यांत असून ५११००० चौ. मै.प्रदेश देशी राजांच्या ताब्यांत आहे. पोर्तुगीज व फ्रेंच लोकांच्या ताब्यांत अनुक्रमें १०८० व १७८ चौ. मै. प्रदेश आहे. या देशांत लहानमोठे मिळून एकंदर एक हजार संस्थानिक असून त्यांपैकीं फक्त १५४ न्नांजवळ चक्रवर्तिनी राणीसरकारच्या सनदा आहेत. हैदराबाद ( दक्षिण ), ग्वाल्हेर, म्हैसूर, बडोदें व काश्मीर हीं सर्वांत मोठीं संस्थानें होत. कित्येक संस्थानिकांस इंग्रजी शिक्षण मिळालें असल्यामुळें व प्रत्येकास रेसिडेंटाची सल्ला मिळत असल्यामुळें आतां कोणत्याही संस्थानांत बेबंदपादशाही दृष्टीस पडत नाहीं. हे सर्व संस्थानिक सन १८७६ पर्यंत राणीसरकारचे मित्र असे

६
११०

म्हटले जात असत; परंतु १८७७ सालीं भाग्यशाली राणीसरकार यांनीं "हिंदुस्थानची बादशाहीण" असा किताब धारण केला तेंव्हांपासून महाराणी सरकार 'सार्वभौम' व संस्थानिक 'मांडलिक' असें नातें जडलें आहे. सर्व संस्थानिकांचीं सूत्रें आपल्या दयाळू सार्वभौम प्रभूच्या हातीं आल्यामुळें त्या सर्वांस गुण्यागोविंदानें राहणें भाग झालें आहे, हा केवढा फायदा झाला बरें? भोपाळ नांवाचें संस्थान आज सतत तीन पिढ्यांपासून मुसलमान स्त्रीच्या ताब्यांत असून त्याचा कारभार उत्तम प्रकारें चालला आहे, हें विशेष अभिनंदनीय होय. या सर्व संस्थानिकांचें एकंदर उत्पन्न १६ कोटी रुपये आहे. पैकीं ७२½ लक्ष रुपये सार्वभौम सरकारास खंडणीब्रद्दल मिळतात. या सर्व संस्थानिकांचे मानपान ठरलेले आहेत. सलामीच्या तोफा सुटतात, त्यांवरून कोणाची योग्यता किती आहे, हें साधारणपणें ध्यानांत येतें. सर्व संस्थानांचें एकंदर सैन्य ३८१००० आहे. हें वाढविण्याचा अधिकार देशी राजांस नाहीं, हें सांगावयास नकोच. आतां हिंदुस्थानची लोकसंख्या वाढत आहे कशी, ती वाढण्याचीं कारणें, व त्याचा एकंदर देशावर होणारा परिणाम या संबंधानें विचार करूं.

**लोकसंख्या.**–आशियाखंडांत जे देश आहेत, त्यांमध्यें क्षेत्रफळ व लोकसंख्या या संबंधानें चीनदेश पहिला व हिंदुस्थान दुसरा आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या २८ कोटीपेक्षां जास्त आहे. १८८१ सालीं २५ कोटी होती. यावरून तीन कोट वाढली हें उघड आहे. आजपर्यंतच्या अनुभवावरून १९०१ सालीं होणारी खानेसुमारी निदान ३० कोटी तरी होईल असा तर्क करण्यास कांहींएक हरकत दिसत

नाहीं. लढाई वगैरे लोकसंख्या कमी होण्याचें साधन पुष्कळ वर्षांपासून नाहींसें झाल्यामुळें कूपमंडूकवृत्ति आमच्या हाडामांसांत भिनून राहिली असल्यामुळें, बालविवाह, एक पत्नी हयात असतां दुसरी, तिसरी देखील करण्याची वहिवाट चालू असल्यामुळें, या देशाची लोकसंख्या एकसारखी वाढत जाणार हें निर्विवाद आहे. लोकसंख्येप्रमाणें उदरनिर्वाहाचीं साधनें न वाढल्यास दुष्काळ व गरिबी हीं दिवसेंदिवस वाढत जाऊन जास्त त्रासदायक होणार हें उघडच आहे ! आतां दुष्काळाबद्दल विचार करूं.

**दुष्काळ.**—या देशांत आगगाडी होण्यापूर्वी मारवाड वगैरे देशांत वारंवार व इतर प्रांतांत कधीं कधीं दुष्काळ पडत असे. एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत धान्य पाठविण्याला आगगाडीसारखें सुलभ साधन नसल्यामुळें जेथें दुष्काळ पडे, तेथें लोकांचे अतिशय हाल होत. यामुळें या देशांत आगगाडी करण्याचें ठरलें. आतां बहुतेक ठिकाणीं आगगाडी झाली आहे, ह्मणून आतां वाटेल त्या ठिकाणचें धान्य वाटेल त्या ठिकाणीं पाठवितां येईल, यांत संशय नाहीं. आगगाडीपासून हा जसा फायदा झाला आहे, तसा तोटाही झाला आहे. आगगाडीसारखें व्यापाराचें सुलभ साधन हातीं आल्यामुळें पुष्कळ लोक धान्यानें आगगाड्या भरभरून बाहेर देशीं पाठवूं लागल्यामुळें आतां देशांत धान्याचा सांठा पूर्वीप्रमाणें राहत नाहीं. आगगाडी झाल्यापासून दुष्काळ लवकर पडूं लागले, व त्यांचा परिणाम पूर्वीप्रमाणें एका प्रांतावरच न होतां सर्व प्रांतांवर सारखा होऊं लागला. अलीकडे एक दुष्काळ जाऊन थोडीं वर्षें जातात, तोंच दुसरा दत्त ह्मणून उभा राहतो. पूर्वी

जिकडे दुष्काळ पडे तिकडे धान्य महाग होत असे, इतर ठिकाणीं विशेष महाग होत नसे. आतां तर सर्वत्र एकसारखीच महर्गता होते! पूर्वीं ज्या देशाला सुवर्णभूमि असें नांव मिळालें होतें, व अन्नाकरितां ज्याच्या तोंडाकडे पाहण्याचा दुसऱ्या देशांतील लोकांस प्रसंग येत असे, त्याच देशांतील लोकांस हल्लीं दुष्काळाच्या पहिल्या झटक्याबरोबर दीन वदनानें अन्नाकरितां परकी देशाच्या तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग येऊं लागला, हा केवढा चमत्कार आहे बरें! दुष्काळासंबंधानें "विचारसाधन" पुस्तकांत दिलेली माहिती महत्त्वाची वाटल्यावरून येथें दिली आहे.

"इसवी सन १८०२ पासून १८५४ पर्यंत च्या ५२ वर्षांत एकंदर लहानमोठे १३ दुष्काळ पडले, व त्यांत सुमारें ५० लक्ष मनुष्यें मरण पावलीं. पुढें सन १८६१ मध्यें आगगाडी चालू झाली तेव्हांपासून १८७८ पर्यंत १७ वर्षांत एकंदर १६ दुष्काळ पडले व त्या योगानें एकंदर १ कोटी १६ लक्ष २१ हजार मनुष्यें मरण पावलीं." सदरहू आंकड्यांचा विचार केला ह्मणजे आगगाडी झाल्यानंतर दुष्काळ लवकर पडूं लागले हें माझें ह्मणणें खरें ठरतें. सन १८७७ सालचा दुष्काळ किती भयंकर होता, याची कल्पना, त्या वेळीं सरकारास ११ कोटी रुपये खर्च करावा लागला, एवढ्यावरून होईल. या दुष्काळाच्या अगोदर सतत २ वर्षें पीक कमी आलें होतें, ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. १८९६ सालीं जो दुष्काळ पडला तो फक्त एक सालचा होता. त्याच्या अगोदरच्या वर्षीं जिकडे तिकडे सुबत्ता होती. असें असतां या दुष्काळानें केवढा गहजब करून सोडला, हें आतां सर्वांस

माहीत झालेंच आहे. विलायत, रशिया, अमेरिका व आस्ट्रेलिया वगैरे दूरच्या देशांतून मदत आली; शिवाय या देशांतील धार्मिक श्रीमंत लोकांनीं ठिकठिकाणीं कांजी, खिचडी वगैरे देऊन पुष्कळ लोकांचे जीव वांचविले. याप्रीत्यर्थ लोकांचा बराच पैसा खर्च झाला असतांही सरकारचे खजिन्यांतून सुमारें ९ कोटी रुपये खर्च झाले. यावरून हा दुष्काळ सामान्य नव्हता, हें उघड दिसतें. आज १७।१८ वर्षांत आगगाडी व कालवे वगैरे दुष्काळनिवारणार्थ पुष्कळ तजविजी झाल्या असून जर दुष्काळाचा तडाका असह्य झाला, तर यावरून देशांत पूर्वींप्रमाणें धान्य शिल्लक राहत नाहीं, असें अनुमान निघत नाहीं काय? आज आगगाडीमध्यें २३७ कोटी रुपये भांडवल गुंतलें आहे; याच्या निम्में जरी कालव्यामध्यें गुंतलें असतें तरी दुष्काळरवीचे किरण हल्लींइतके कडक खचीत भासले नसते. हिंदुस्थानाशीं चालू असलेला इंग्लंडचा व्यापार वाढावा, ह्मणून सुवेजसारखा प्रचंड कालवा खणण्यांत डोळे मिटून कोट्यावधि रुपये खर्च केले, व येथील लोक नको नको ह्मणत असतां पहिलें कर्ज फेडण्याचें बाजूस ठेवून, नवीन कर्ज काढून दरसाल आगगाडीचा रस्ता वाढविण्यांत येत आहे, यांत व्यापारी कावा नाहीं, असें ह्मणतां येईल काय? आगगाडीच्या योगानें चोहों मुलखांतलें धान्य मुंबईस आणावयास सांपडून तेथून आगबोटींच्या साह्यानें तें थेट विलायतेस नेतां येतें, व तिकडील एकंदर जिनसा या देशांतील प्रत्येक भागांत पोंचविण्याची सोय होते, तशी कालव्याच्या योगानें होणार नाहीं, हें उघडच आहे. शेतकीच्या उपयोगीं पडतील असे कालवे

या देशांत खणल्यास, त्यांपासून इंग्लंडचा प्रत्यक्ष नफा कांहीं नाहीं, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. पूर्वी लोकसंख्या कमी असून धान्याचा व्यापार नसे यामुळें तें फार स्वस्त मिळत असे. ह्मणून गरीबसुद्धां चार पांच वर्षांचें जुनें धान्य खात; आतां मध्यम प्रतीच्या लोकांस देखील तितकें जुनें धान्य मिळण्याची मारामार पडते. मग गरीबांस कोठून मिळणार? आतां कोणी असें ह्मणेल कीं, पूर्वींपेक्षां खर्च वाढल्यामुळें जुनें धान्य शिल्लक राहत नसेल, याला आगगाडी काय करील? याला उत्तर इतकेंच कीं, पूर्वींपेक्षां खर्च वाढला आहे, तसें धान्याच्या किंमती चढल्यामुळें उत्पन्नही वाढलें आहे. पूर्वींपेक्षां एकंदर जिनसांची किंमत निदान दीडपटीनें वाढली आहे, तरी एकंदर देशाच्या संपत्तिसमुद्राला ओहोटी लागली असल्यामुळें, जिनसांची किंमत वाढली, त्याचा फायदा येथील लोकांस कांहींएक मिळत नाहीं. पूर्वी या देशांत निरनिराळे कारखाने असल्यामुळें आपणांस नेहमीं लागणाऱ्या जिनसा परदेशांतून आणाव्या लागत नसत. आतां बहुतेक कारखाने ठार बुडाल्यामुळें आपला देश अतिशय गरीब होत चालला आहे. १८९६ सालच्या दुष्काळाची विस्मृति झाली नाहीं तोंच यंदां भयंकर दुष्काळ पडणार असें दिसूं लागलें आहे. आतां असले भयंकर दुष्काळ पडण्याचें मूळ कारण अनावृष्टि हें होय. हें कारण नाहींसें करणें मानवी शक्तीच्या बाहेर आहे; तथापि कृत्रिम उपायांनीं दुष्काळाची तीव्रता कमी करतां येते. आद्यापेक्षां खर्च कमी करून दरसाल थोडथोडें धान्य शिल्लक ठेवीत गेल्यास तें दुष्काळांत बरेंच उपयोगीं पडेल. पर-

देशी वस्तु विकत घेऊं नये, ह्मणजे पैशाची अडचण दूर होईल, व पैशाच्या अडचणीमुळें स्वस्त भावानें धान्य द्यावें लागणार नाहीं. रयतेच्या रक्षणासाठीं सरकारानें कालव्यांसारखीं महत्वाचीं कामें प्रथम हातीं घेणें जरूर आहे. कालव्याच्या योगानें हजारों एकर जमीन भिजली जाऊन तिजवर लाखों लोकांचा उदरनिर्वाह होऊं शकतो. सबब हजार कामें बाजूस ठेवून हें काम हातीं घेणें किती जरूरीचें आहे, हें उघड करून सांगावयास पाहिजे असें नाहीं. परंतु आमच्या दुर्दैवानें आपल्या राज्यकर्त्यांस यापेक्षां सरहद्दीचा प्रश्न विशेष महत्त्वाचा वाटतो! असो, आतां आमच्या देशाला जी गरिबी प्राप्त झाली आहे, तिज-बद्दल विचार करूं.

**गरिबी.**—हल्लीं आपल्या देशाला गरिबी प्राप्त झाली आहे कीं काय, याचा विचार करण्यापूर्वीं आपल्या देशाची पूर्वस्थिति कशी होती, याचें ज्ञान असणें जरूर आहे. तें ज्ञान झाल्याशिवाय दोन्ही स्थितींची तुलना करतां येणें अशक्य होय. फार प्राचीन काळापासून हा देश कला-कौशल्यानें संपन्न असल्यामुळें इतर देशांतील संपत्ति अनेक कारणांनीं या देशांत येत असे. पूर्वीं या देशाला "सुवर्णभूमि" नांव मिळालें होतें, या एकाच गोष्टीवरून त्याच्या संपन्नतेची साक्ष पटते. मध असला ह्मणजे तेथें माशा जमतात, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. अलेक्झांडरापासून इंग्रजी अंमल सुरू होईपर्यंत परचक्रें आलीं, तीं व व्यापारा-निमित्त आरंभीं जीवावर उदार होऊन आलेले डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज वगैरे इतर देशांत न जातां याच देशांत कां आले, याचा विचार केला, तर या देशांत

पूर्वी द्रव्यरूप मध पुष्कळ होता हें अगदीं उघड दिसतें. भोज, विक्रम, शालिवाहन यांच्या वेळीं या देशाची स्थिति उत्तमच होती. मुसलमान लोकांनीं स्वाऱ्या केल्या, तेव्हांपासूनचा पूर्ण विश्वसनीय इतिहास मिळत आहे, तो देखील पूर्वस्थितीची ओळख पटविण्यास अगदीं पुरेसा आहे. गिझनीच्या महमुदानें या देशावर १७ स्वाऱ्या केल्या. प्रत्येक स्वारींत तो पुष्कळ द्रव्य घेऊन जाई. सोरटी सोमनाथावर मुसलमानांनीं हल्ला केला, त्या वेळीं तेथें जी संपत्ति होती, तिची हकीगत ऐकिली तर कोणाचेही नेत्रांतून अश्रु आल्याखेरीज राहणार नाहींत. फक्त एक लामणदिवा २०० मण सोन्याचा होता! पूर्वी प्रत्येक क्षेत्रांतील प्रसिद्ध देवळाला सोन्याचा कळस व चांदीनें मढविलेले दरवाजे असत. काळपुरुष तैमूरलंग यानें देखील या देशांतून पुष्कळ लूट नेली! नादीरशहानें सुद्धां कांहीं कमी केलें नाहीं! येणेंप्रमाणें या देशांतून लुटीच्या रूपानें पुष्कळ द्रव्य इतर देशांत गेलें, तरी इतर देशांतील संपत्तीचा प्रवाह व्यापाराच्या रूपानें या देशांत निरंतर चालू असल्यामुळें झालेलें नुकसान भरून येण्यास मुळींच विलंब लागत नसे. अगदीं अलीकडे म्हणजे १८ वें शतक अर्धें संपल्यावरही या देशाची स्थिति साधारण बरी होती. थोरले माधवरावांचे कारकीर्दीचे सुमारास महाराष्ट्र देशाची भरभराट होती, हें प्रसिद्ध इतिहासकार ग्रांट डफ यांच्या वर्णनावरूनच समजतें. महाराष्ट्राचे शेजारीं महिसूर प्रांत आहे. या वेळीं या प्रांताची स्थिति कशी होती तें पहा. सदर प्रांताचा अधिकारी हैदर अल्ली यानें मूळच्या हिंदु राजास एकीकडे ठेवून सर्व

राज्य स्वतां बळकाविलें होतें. तरी त्यानें सर्व प्रांत फार सुखी ठेविला होता. त्याजपाशीं ३ लक्ष सैन्य होतें, तरी अव्यवस्था मुळींच नव्हती! इतका खर्च असूनही खजिन्यांत पुष्कळ द्रव्य होतें, ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. याच्या कारकीर्दीचें वर्णन कर्नल फुलर्टन व उइल्क्स यांनीं केलें आहे, तें वाचण्यासारखें आहे. हैदराच्या मागून, महिसूरचा वाघ टिपू सुलतान हा गादीवर बसला. याची थोडीशी कारकीर्द कित्येक बाबतींत जुलुमाची व त्रासदायक झाली असें वाटतें. तरी पण एकंदरींत देशस्थिति कोणत्याही प्रकारें वाईट नव्हती, असें मूर व डायरम साहेबांनीं केलेल्या वर्णनावरून स्पष्ट दिसतें. आतां त्या वेळीं मध्यप्रांताची स्थिति कशी होती तें पहा. या प्रांताची राजधानी नागपूर, येथील अधिकारी भोंसले हे होते. त्या वेळच्या इंग्रज प्रवाशांनीं या प्रांताचें जें वर्णन लिहिलें आहे, तें वाचलें ह्मणजे हा प्रांत फार संपन्न होता असें स्पष्ट दिसतें. तेथील अधिकाऱ्यांनीं कोष्टी लोकांस जें उत्तेजन दिलें, व त्यामुळें त्यांच्या कसबांत किती सुधारणा झाली, हें नागपुरी कापडावरून हल्लीं देखील ध्यानांत येण्यासारखें आहे.

मध्यप्रांताच्या शेजारीं माळवा व गुजराथ. यांची स्थिति काय सांगावी? माळवा तर बोलून चालून सुपीक प्रदेश! तो त्या वेळीं स्त्रीरत्नभूषण, कुलस्त्रीमुकुटमणी देवी अहिल्याबाई होळकरीण हिच्या ताब्यांत होता. यामुळें तो प्रांत फारच उत्तम स्थितींत होता. सर जॉन माल्कम साहेबांनीं लिहिलेल्या इतिहासरूपी आरशांत माळव्याच्या स्थितीचें अति उत्तम प्रतिबिंब दिसत आहे. आतां त्या वेळीं

गुजराथची स्थिति कशी होती, तें काय सांगावें! सुरत, भडोच, अमदाबाद व बडोदें हीं शहरें तर थयथय नाचत होतीं! "भांगी तुटी पण भरूच ते भरूच" अशी गुजराथींत म्हण आहे. याचा अर्थ असा कीं, मोडली, तुटली तरी भरूचसारखें दुसरें शहर नाहीं. त्या वेळीं मुंबई हा साधारण गांव असल्यामुळें सुरत व भडोच हींच काय तीं तरतीं बंदरें होतीं. यामुळें येथें व्यापार अगदीं फुलून गेला होता. अमदाबाद ही तर गुजराथची राजधानीच होती. त्यामुळें तिचें वर्णन करावयास नकोच. बडोदें ही समशेरबहाद्दर गायकवाड यांची राजधानी. मग तेथल्या संपत्तीचें वर्णन काय करावयाचें आहे! गुजराथच्या उत्तरेस राजपुताना आहे. त्याचें वर्णन बिशप हिबर नांवाच्या प्रवाशानें स्वानुभवानें लिहिलें आहे, त्यांत भरतपूरच्या राज्याचें वर्णन दिलें आहे, तें वाचलें म्हणजे आनंदाच्या गुदगुल्या होतात. आतां अयोध्या, वायव्येकडील प्रांत, व बंगाल यांची स्थिति कशी होती तें पहा. बाबरापासून औरंगजेबापर्यंत जे मोंगल बादशहा दिल्लीच्या गादीवर बसले, त्यांनीं बहुतेक सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करून सर्व संपत्ति दिल्ली येथें जमा केली होती. दिल्लीच्या बादशहाचे ताब्यांतील एका नबाबाचें वर्णन करतों, म्हणजे अयोध्या प्रांताची स्थिति कशी होती, तें समजेल, व बादशाही वैभवाचीही कल्पना होईल. अयोध्या प्रांताची राजधानी लखनौ. पूर्वींची राजधानी फैजाबाद. दिल्लीच्या बादशहाचा सुभेदार ( कलेक्टर ) या प्रांतावर अधिकारी असे. सादत अल्ली, मनसूर अल्ली, सुजा उद्दौला वगैरे जे या प्रांतावर सुभेदार होऊन गेले, त्यांनीं फैजाबाद येथेंच कारभार

सं. इ. ३४

चालविला. पुढें असफ उद्दौला नबाब सुभेदार झाला. याच्या मनांत लखनौ राजधानी करावी असें आलें. १७७५ पर्यंत लखनौ हें एक लहानसें खेडें होतें. तेथें त्यानें 'मची भवान' नांवाचा किल्ला बांधला, व पुढें लवकरच तेथें राजधानी केली. त्यानें दौलतखाना, सेमाई दरवाजा, चिनहुत राजवाडा, इमामवाडा, ऐशबाग, चारबाग इत्यादि अनेक सुंदर इमारती बांधून शहरास अत्युत्तम शोभा आणिली. यानें अनेक लोकांस जहागिरी देऊन मोठमोठे सरदार बनविले. याची लहर लागल्यास हा एखाद्या भिकाऱ्यासही प्रतिनबाब करून सोडी! या त्याच्या औदार्यावरून तेव्हां अशी म्हण पडली कीं, "जिसको न दे मौला, उसको दे असफ उद्दौला." हा शक्तीनेंही दांडगा होता असें म्हणतात. शरयूनदींत पोहावयास जात असे, तेव्हां नदींतून जीवंत मगर धरून आणून त्याची नाभी तळून खात असे. असा भीमासारखा पराक्रमी वीर तोही हतवीर्य होऊन इंग्रज सरकाराशीं तह करण्यास उद्युक्त झाला! कालचक्र नेहमीं फिरत असतें, त्याचें हें उत्कृष्ट उदाहरण होय. याच्या मागून झालेले नबाब दुर्बळ असल्यामुळें त्यांच्या कारकीर्दींत अयोध्या प्रांतापैकीं बराच मुलूख इंग्रजांस मिळाला. तरी पण सादत अल्ली मेला तेव्हां नबाबाच्या खजिन्यांत १४ कोटी रुपये रोख शिल्लक होते! दिल्लीच्या बादशहाच्या एका नौकराचें हें वर्णन केलें, तेव्हां आतां खुद्द बादशाही वैभवाचें वर्णन करावयाचें कांहीं कारण राहिलें नाहीं, असें मला वाटतें. आतां बंगाल प्रांताची त्या वेळीं स्थिति कशी होती तें पहा. मुर्शिदाबाद, डाका, पाटणें, मोंगीर व कलकत्ता हीं शहरें

त्या वेळीं संपत्तिसमुद्रांत बुडाली होतीं, असें म्हटलें तरी चालेल. क्लाइव्ह साहेबानें तर त्या प्रांताला "अपार संपत्तीचा प्रदेश" असें नांव दिलें होतें! सुप्रसिद्ध मेकाले साहेबांनीं त्याला "नंदनवन" अशी उपमा दिली आहे. मुर्शिदाबाद येथील नगरशेटची पेढी मराठ्यांनीं एकदां लुटली, तेव्हां त्यांस तेथें २९ लक्ष रुपये मिळाले! डाक्काच्या हिंदु राजांचें वर्णन करतांना हालवेल साहेबानें तेथील संपन्नतेचे पोवाडे गाइले आहेत, ते वाचले म्हणजे त्या वेळीं या प्रांतांत किती संपत्ति होती, याची कल्पना सुद्धां करवत नाहीं. अशा संपन्न देशाचें राज्यसूत्र अलिवर्दीखानाच्या मागून, कलकत्त्याच्या 'अंधारकोठडी' मुळें प्रसिद्ध झालेला नबाब सुराज उद्दौला याच्या हातीं आलें. हा अतिशय वाईट राजकर्ता होता, असें पुष्कळ इंग्रज इतिहासकार ह्मणत आहेत, तरी त्याच्या कारकीर्दींत देशस्थिति चांगली असून तो हिंदु व मुसलमान या दोघांस सारखेपणानें वागवीत असे, असें बंगालचे इतिहासकार स्टुअर्ट साहेबच लिहितात! मद्रास इलाख्याची स्थिति देखील वाईट नव्हती, असें त्या वेळच्या पत्रव्यवहारावरून दिसतें. येथपर्यंत दिलेल्या वर्णनावरून बहुतेक हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीचें वर्णन झालें; परंतु खुद्द महाराष्ट्राची ग्रांट डफ साहेबांच्या हवाल्यावरच बोळवण केली, हें गैर झालें असें कोणास वाटेल ह्मणून आतां त्याचें थोडेंसें वर्णन करितों. महाराष्ट्राची खरी राजधानी सातारा ही होती. परंतु या वेळीं सर्व कारभार पुणें येथें चालत असे. श्रीमंत पहिले बाजीराव पेशवे यांनीं पुणें शहर वसविण्यास प्रारंभ केला. खुद्द पेशव्यांनी तेथें वाडा बांधला, तेव्हां सरदारांनींही आपापले वाडे तेथें बांधले. श्रीमंत नाना-

साहेब पेशवे यांच्या वेळीं पुणें शहर अगदीं फुलून गेलें होतें. श्रीमंत पहिले बाजीराव, नानासाहेब, थोरले माधवराव यांनीं सर्व हिंदुस्थान लुटून महाराष्ट्रदेश संपन्न करून सोडला होता! थोरल्या माधवरावांच्या मागें घरबुडवे तंटे सुरू झाल्यामुळें महाराष्ट्राच्या संपत्तींत बाहेरची भर पडण्याचें बंद झालें. त्या वेळीं पुणें येथें हरिभक्त, कर्ण, रास्ते, वांकडे, तांबेकर, वानवळे वगैरे अनेक श्रीमंत सावकार होते. यांपैकीं वानवळे यांची एक गोष्ट सांगतों. सदाशिवराव नाईक वानवळे यांजकडे पेशवाईतल्या मोठमोठ्या सरदारांचीं खातीं होतीं. थोर पराक्रमी सरदार महादजी शिंदे यांचें देखील नाईक यांच्या पेढीवर खातें होतें. त्यांच्याकडे नाइकांची ९० लक्ष बाकी होती. त्यांनीं पाटीलबोवांकडे पुष्कळ वेळां तगादा केला. पण बाकीचा निकाल लागेना! 'वकील मुतालकी'चे फर्माने, पोशाख, राजचिन्हें वगैरे घेऊन पाटीलबोवांची स्वारी दिल्लीहून पुण्यास येण्यास निघाली आहे असा नाईक यांस तपास लागला. पुढें प्रत्यक्ष भेट घ्यावी, या हेतूनें पैठण येथें पाटीलबोवांस गांठून नाईक यांनीं आपल्या ऐवजाबद्दल मागणें केलें. पाटीलबोवा मोठे चतुर होते. त्यांनीं त्यास उलट प्रश्न केला कीं, "तुमच्यानें धर्म जर होत नाहीं, तर तुह्मांस रुपये वसूल करून काय करावयाचें आहे"? सदाशिव नाईक हे कलकत्ता येथील प्रसिद्ध सावकार उमीचंद यांचे वर्गबंधु असल्यामुळें यांच्याकडून आपल्या प्रश्नाचें सयुक्तिक उत्तर मिळणार नाहीं, असें वाटल्यावरून पाटीलबोवांनीं ही कोटी लढवून वेळ टाळण्याची ही युक्ति काढली होती! परंतु ही त्यांची मसलत फसली. कारण, महादजी शिंद्यासारख्या फौजबंद

सरदाराजवळून अन्य तऱ्हेनें पैसा काढणें मुष्कील असल्यामुळें, सदरहू रकम बुडालेलीच आहे असें समजून नाईक यांनीं मोठें औदार्य दाखवून सांगितलें कीं, "तुह्मी या वेळीं जितके रुपये द्याल, तितका धर्म करितों." हें ऐकून पाटिलबुवा तर चकित झाले! हे महाकंजूष आहेत, असें त्यांस पक्कें माहीत होतें, सबब बोलणें खरें करून दाखविण्याला त्यांच्या कंठीं प्राण यावा ह्मणून पाटिलबोवांनीं एकदम २० लक्ष रुपयांचे तोडे मोजले! नाईक यांनीं पण किंचित् अनमान न करतां पाटिलबोवांच्या देखत तेथेंच विष्णुयाग यज्ञ करून तो सर्व पैसा धर्म केला. या यज्ञाची कीर्ति पैठणचे लोक अद्यापि गातात. वानवळ्यासारखे श्रीमंत सावकार त्या वेळीं महाराष्ट्रांत पुष्कळ होते. बारामतीकर नाईक हे सुद्धां फार श्रीमंत सावकार होते. यांच्याविषयीं एक दंतकथा माझ्या ऐकण्यांत आली आहे. श्रीमंत पेशवे यांनीं एकदां यांजपाशीं बऱ्याच मोठ्या रकमेची मागणी केली. तेव्हां नाईक यांनीं एका शिक्क्याचे रुपयांनीं गाड्या भरून पाठविल्या! व अधिक रुपयांची गरज लागल्यास कोणत्या शिक्क्याचे पाठवूं तें कळवावें, असा श्रीमंतांस निरोप पाठविला. प्रसिद्ध रणधुरंधर परशुरामभाऊ पटवर्धन यांचे व्याही हुकेरीकर जोशी हे त्या वेळीं नवकोटीनारायण, होते. दुसरी एक दंतकथा लक्षांत ठेवण्यासारखी आहे. श्रीमंत पेशवे यांस एका सावकारानें एकदां टोलेजंग मेजवानी दिली. श्रीमंतांचे पात्राजवळ अपूर्व थाट केला होता. मंडळी भोजनास बसल्यावर घरच्या वयोवृद्ध यजमानानें आपल्या मुलास "श्रीमंत कोणते" असा प्रश्न केला. तेव्हां मुलानें बोटानें खूण करून वडिलांस श्रीमंत दाख-

विले. पुढें मदांधत्वाचा हा परिणाम आहे, असें कोणीं श्रीमंताचे कानांत विष ओतल्यामुळें त्यांनीं त्याचें सगळें घर लुटविलें. तेव्हां बापानें मुलास "घरांतील कचरा गेला" असा जबाब दिला. पुढें तळघर लुटल्यावर घराचा एक कोंपरा गेला असा जबाब दिला! लाखों रुपयांची दौलत लुटविली, तरी ज्याचा द्रव्यमद कमी होत नाहीं, त्याची एकंदर संपत्ति किती आहे, हें एकदां पहावें, ह्मणून अभय वचन देऊन श्रीमंतांनीं आपली इच्छा तृप्त करून घेतली. आदिमाता जी लक्ष्मी, तिचें निवासस्थानच आज आपण पाहिलें, असें श्रीमंतांस वाटून स्वतःच्या मोठेपणाबद्दल उत्पन्न झालेला अभिमान गेल्यामुळें त्यांनीं त्याची सर्व मिळकत त्यास परत दिली. या एकंदर हकीगतीवरून महाराष्ट्रदेश संपन्न होता कीं नव्हता, हें कोणासही सहज समजेल. येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून आपला देश पूर्वीं धनधान्यसंपन्न होता, असें उघड दिसतें. आतां हल्लींची स्थिति कशी आहे तें पाहूं. पूर्वींसारखा नवकोटनारायण सावकार आतां या देशांत एकही नाहीं. पूर्वीं श्रीमंतांच्या बायका जडावाचे दागिने व मोत्यांचे हार घालीत. मध्यम वर्गांतील बायका नखशिखांत सोन्यानें मढून जात. कनिष्ठ वर्गांतील बायका चांदीचे दागिने घालीत. चंद्रहार, चिंचपेट्या, मौक्तिकहार वगैरे बहुमूल्य दागिने हल्लीं राजेरजवाड्यांखेरीज इतर ठिकाणीं दृष्टीस पडण्याचा संभव नाहीं. श्रीमंत लोकांच्या बायका गरीब लोकांच्या बायकांपेक्षां आपण सुखी, असें समजून सोन्याच्या दागिन्यांतच खुष होत आहेत. कित्येक 'पोकळगांव'च्या मोडक्या श्रीमंताचे घरीं निवळ सोन्याचे दागिने नसल्यामुळें लाखेवर

मुलामा चढविलेले दागिने वापरीत असतात!! पूर्वीं लक्ष-भोजनें नेहमीं होत असत. आतां सहस्रभोजन देखील दृष्टीस पडत नाहीं. पूर्वी शेंकडों ठिकाणीं अन्नछत्रें, सदावर्ते नेहमीं चालू असत. आतां मुक्तद्वार ठेवून अन्नछत्र किंवा सदावर्त चालविण्याचें सामर्थ्य एखाद्या राजास देखील नाहीं. मग इतर मनुष्यांस कोठून असणार ! पूर्वीं मध्यम प्रतीचे लोक जरीकांठी वस्त्रें वापरीत, आतां रेशीमकांठी वस्त्रें विकत घेववत नाहींत; पूर्वीं होन, मोहोरा, दिनार पुतळ्या वगैरे सोन्याचीं नाणीं चालू होतीं. आतां हा देश गरीब झाला असल्यामुळें येथें सोन्याचें नाणें चालू करणें बरें नाहीं, असें पुष्कळ विद्वानांचें ह्मणणें आहे. हा देश गरीब झाला आहे, अशाबद्दल सर विल्यम वेडरबर्न, सर सीमोर के, स्वॉन, मॅकलारेन, केन, डिग्बी, ह्यूम, वगैरे इंग्रज व दादाभाई नौरोजी, रोमेशचंद्र दत्त वगैरे नेटिव गृहस्थांचे अभिप्राय प्रसिद्धच आहेत. परंतु हे सर्व कांग्रेसभक्त असल्यामुळें यांच्या अभिप्रायांची किंमत मि० इलिहट, डा० हंटरसारख्या सरकारी नौकरांच्या अभिप्रायापेक्षां थोडी तरी कमी आहे, यांत संशय नाहीं. ह्मणून त्यांचे अभिप्राय येथें देतों. आसामचे माजी चीफ कमिशनर मि० इलियट ह्मणतात;—"आमच्या शेतकऱ्यांपैकीं निम्मे लोकांस वर्षभर पुरेसें अन्न मिळत नाहीं." डा० हंटर ह्मणतात;—"हिंदुस्थानांतील ४ कोट (?) मनुष्यांस सगळ्या जन्मांत कधीं सुद्धां पोटभर अन्न मिळत नाहीं." हल्लीं जिकडे पहावें तिकडे लहान थोर, गरीब श्रीमंत, विद्वान् अविद्वान् या सर्वांस "आपलें होईल कसें व अन्नांत दिवस जातील कसे" अशी एकच विवंचना लागलेली

दृष्टीस पडते! हा घरोघरचा अनुभव आपणांस माहीत आहे, तर मग इतर लोकांच्या अभिप्रायांची मुळींच जरूर नाहीं.

आज पुष्कळ वर्षांपासून कच्चा माल विकत देऊन त्याचाच बनलेला पक्का माल घेतलेल्या किंमतीच्या किती तरी पट जास्त किंमत देऊन विकत घेण्याचा आह्मीं एकसारखा सपाटा चालविला आहे. यामुळें हा देश पूर्वीपेक्षां गरीब झाला आहे. हातच्या कांकणास आरसा नको, त्याप्रमाणें या ढळढळीत दिसणाऱ्या गोष्टींस अधिक पुरावा नको! आतां ही गरिबी प्राप्त होण्याचें कारण, तिचा परिणाम, व ती घालविण्याचा उपाय यांचा थोडक्यांत विचार करून हें प्रकरण संपवितों.

पूर्वीं युरोपांत यंत्रकलेचा प्रसार झाला नव्हता, तेव्हां या देशांत सर्व प्रकारचे पदार्थ उत्तम प्रकारें तयार होत असत. ते पदार्थ येथून ईस्ट इंडिया कंपनी विलायतेस पाठवूं लागली. हे पदार्थ तिकडे फार खपूं लागल्यामुळें इकडील कारखान्यांस बरीच तेजी आली. पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. कारण, तिकडील लोकांचे डोळे लवकरच उघडल्यामुळें ते अतिशय गवगवा करून असें ह्मणूं लागले कीं, याप्रमाणें हिंदुस्थानांत पैसा गेला तर इंग्लंड देश भिकारी होईल. कित्येक पाद्री लोकांनीं हिंदुस्थानचा माल वापरील त्यास बहिष्कार घालावा असें देखील ठरविलें! धन्य त्या इंग्रज लोकांची! तेरड्याच्या रंगाप्रमाणें तीन दिवस चळवळ करून पुढें स्वस्थ बसले नाहींत; ह्मणून ते आज सोन्याचा दिवस बघण्यास समर्थ झाले आहेत. आमचे पूर्वज देवभोळे असल्यामुळें त्यांस कपट मुळींच समजत नसे. भोळ्या मनुष्यांस

साधारण डावपेंच समजत नाहींत; मग पाताळयंत्री कावे कसे कळणार ? आपल्या मुलाबाळांस अहोरात्र रडत बसविण्यास आपण कारण होत आहों, हें बिचाऱ्यांच्या ध्यानीं मनीं सुद्धां आलें नाहीं ! ह्मणून त्यांनीं परकी लोकांस कसब शिकवितांना जरा सुद्धां अनमान केलें नाहीं. याप्रमाणें कसब शिकलेले लोक इकडच्यासारखा माल तिकडे तयार करूं लागले. आरंभीं त्यांस चांगला माल तयार करितां आला नाहीं. सुदैवानें तिकडील देशाभिमानी लोकांनीं दूरवर नजर देऊन "आपलें तें बापडें व दुसऱ्याचें तें कारटें" या न्यायानें त्यांस उत्तेजन दिल्यामुळें त्यांची उमेद वाढतच गेली. कल्पक लोकांस मोठमोठ्या इनामांची लालूच दाखविल्यामुळें त्यांनीं यंत्रकलेंत बरीच सुधारणा केली. उद्योगाचें महत्त्व जगास कळावें ह्मणूनच कीं काय, परमेश्वरानें त्यांच्याकडे कृपादृष्टीनें पाहिलें; मग यंत्रकलेंत सुधारणा केल्याचें श्रेय त्यांस आलें, यांत नवल तें काय ? वाफेची प्रचंड शक्ति उपयोगांत आल्यामुळें तिकडे मोठमोठे कारखाने उभारले गेले, व त्यांत अगदीं थोड्या मेहनतीनें इकडच्यापेक्षां उत्तम माल अल्प अवकाशांत पुष्कळच तयार होऊं लागला. यात्रिक शक्तीपुढें हाताची शक्ति टिकण्यास असमर्थ झाल्यामुळें तिकडील धंदे तरले, व इकडील ठार बुडाले ! असें झाल्यामुळें तिकडचा पैसा इकडे येईनासा झाला; इतकेंच नव्हे, तर इकडचा पैसा तिकडे जाऊं लागला. आह्मांस ज्या ज्या जिनसा लागतात, त्या त्या आयत्या तयार करून पुरविण्याचा परदेशी लोकांनीं जणू काय पत्करच घेतला आहे ! यामुळें आतां आह्मांस जरुरीच्या व चैनीच्या जिनसा तयार करण्यासाठीं मुळींच श्रम

करावे लागत नाहींत. तांदूळ, तीळ, गहूं, कापूस, अळशी, कर्डई, भुइमुग, वगैरे कच्चा माल तयार करण्यासाठीं आह्मी जे श्रम करितों, त्याचा मोबदला सुद्धां आह्मांस मिळत नाहीं. या कच्या मालाबद्दल जे पैसे आह्मी घेतों, त्याच्या किती तरी पट पैसे आह्मी पक्क्या मालाबद्दल परकी लोकांच्या घरांत घालतों ! कागद, शाई, टांक, पेनसिल, रबर, सर्व प्रकारचें कापड, बिलोरी सामान, सुया, टांचण्या, चाकू, लोंकर, साबू, मेणबत्त्या, छत्र्या, आगपेट्या, घड्याळें, बूट, बटणें, यंत्रें, औषधें, दारू वगैरे अनेक पदार्थ परदेशांतून इकडे येतात, व ते सर्व आह्मी आज कैक वर्षें डोळे मिटून घेत आहों. या व दुसऱ्या जिनसांच्या पायीं आमचे आजपर्यंत जे पैसे गेले आहेत त्यांची एकंदर बेरीज काय होईल, याची कल्पना सुद्धां होत नाहीं. सुलतान महमूद, तैमूर, नादीरशाहा, अहमदशाहा वगैरे मंडळींनीं मनस्वी लूट केली, तरी एकंदर बेरीज ३०० कोटीपेक्षां जास्त होणार नाहीं. आतां वर दिलेल्या सर्व जिनसांपैकीं फक्त एक कापड घेतलें, तर या एकाच जिनसेबद्दल आज ४० वर्षांत कमींत कमी ६०० कोट रुपये गेले असतील !! आपला हा देश गरीब होण्याचें कारण आतां सर्वांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. आतां ही गरीबी अशीच वाढत गेल्यास पुढें परिणाम काय होईल तें कळणें अशक्य नाहीं. परदेशी वस्तू वापरण्याचा क्रम असाच अबाधित चालू राहिल्यास गरीबी वाढत जाईल व पुढें आपल्या नातीपणतीच्या नाकांतून पितळेचा गाडा व कांचेचीं मोत्यें अशा प्रकारच्या नथी पडण्याची वेळ खात्रीनें येईल. पोटभर खुराक न मिळाल्यामुळें सर्वांचीं शरीरें जरत्कारूप्रमाणें दिसूं लागतील!

जो तो पोटाच्या काळजींत असल्यामुळें सार्वजनिक काम करण्यास कोणीच मिळणार नाहीं. असें झालें ह्मणजे तें राष्ट्र जगांत असून नसल्यासारखेंच समजलें जाईल. ही स्थिति न यावी अशी इच्छा असेल तर त्यास उपाय इतकाच कीं, परदेशी जिनसारूपी जळवा आपल्या देशाच्या सर्व भागाला चिकटल्या आहेत, त्या सोडविल्या पाहिजेत. या देशांत पक्या पदार्थाला लागणारा मालमसाला पुष्कळ आहे. पण त्याचा कसा उपयोग करून घ्यावा हें आह्मांस समजत नाहीं. यासाठीं जपानप्रमाणें डोळे उघडून, आळस टाकून उद्योग करावयास शिकलें पाहिजे. देशहितासाठीं एक मोठा राष्ट्रीय फंड काढून त्याच्या व्याजांतून पगारी विद्यार्थी कसब शिकण्यासाठीं परदेशीं पाठविले, व ते परत येथें आल्यावर त्यांस कारखाने काढून दिले तर आपली स्थिति हां हां ह्मणतां बदलेल. आतां राष्ट्रीय फंड कसा काढावा तें सांगतों. आपल्या देशांत २८ कोटी लोक आहेत. यांपैकीं अशिक्षित व गरीब असे १२ कोटी धरले, व ते त्यांतून वजा केले तर बाकी १६ कोटी राहिले. सदरहू लोकांनीं दरसाल दरमाणशीं एक दिडकी दिली तर १६ कोटी दिडक्या जमतात. इतक्या दिडक्यांचे २९ लक्ष रुपये होतात. सदरहू पैसे वसूल करण्यासाठीं दरमहा २९ रुपये पगाराचे एक हजार इसम व त्यांवर १०० रुपये पगाराचे ५० इन्स्पेक्टर व ५०० रुपये पगाराचे १० सुपरिंटेंडंट व १५०० रुपये पगाराचा

१ कमिशनर ठेवावा. इतकें होण्यास काय खर्च येईल तो पहाः—

| | | |
|---|---|---|
| २५ × | १,००० × १२ = | ३ लक्ष रु० |
| १०० × | ५० × १२ = | ६० हजा० रु० |
| ५०० × | १० × १२ = | ६० हजा० रु० |
| १५०० × | १ × १२ = | १८ हजा० रु० |
| | | ४,३८,००० रुपये. |
| | आफिस व इतर कंटिजन्सी. | १,६२,००० |
| | | ६,००,०००रुपये. |

सदरहू खर्च वजा केला ह्मणजे बाकी १९ लक्ष रुपये राहतात. या रुपयांचें दरसाल दरशेंकडा ३।। प्रमाणें ५९,३७५ ह्मणजे जवळ जवळ ६० हजार रुपये व्याज येईल ! यांतून दरमहा ५० रुपयांची स्कॉलरशिप दिल्यास दरसाल १०० विद्यार्थी जपानसारख्या देशांत कलाकौशल्याचें शिक्षण मिळविण्यासाठीं पाठवितां येतील. दिडकी फंडाची सूचना दिसण्यांत चांगली, परंतु अमलांत आणण्यास अशक्य असें पुष्कळांचें मत आहे. परंतु राष्ट्रीय सभेनें मनापासून प्रयत्न केल्यास इलाखा, जिल्हा, तालुका व गांवकमिट्या स्थापल्या जाऊन दिडकी फंड वसूल होण्यास मुळींच त्रास पडणार नाहीं असें मला वाटतें. असो, आतां शेतीसंबंधानें विचार करूं.

**शेती, भाग० १.**—शेती याला संस्कृतांत कृषिकर्म ह्मणतात. कृष् धातूचा अर्थ नांगरणें असा आहे. यावरून या धंद्यांत नांगर हें प्रमुख साधन आहे, हें उघड आहे. येथील लोकसंख्येपैकीं शेंकडा ८० इसम या धंद्यावर निर्वाह करीत

आहेत, ह्मणून या देशांत 'शेती' हाच मुख्य धंदा आहे. पूर्वींपेक्षां लोकसंख्या पुष्कळ वाढली असून दरसाल वाढत आहे. लोकसंख्या जशी वाढली, तसें शेतीचें उत्पन्न वाढलें असतें ह्मणजे कांहीं पंचाईत नव्हती, पण तें तसें वाढलेलें दिसत नाहीं. यामुळें या वाढत्या लोकसंख्येचा उदरनिर्वाह व्हावा कसा, याची मोठी काळजी वाटते. विलायतेंत लोकसंख्या वाढली, त्याप्रमाणें तेथें शेतीचें उत्पन्नही फार वाढलें आहे. सन १७०२ ते १७१४ पर्यंत ॲन राणीच्या कारकीर्दींत इंग्लंदांत दर एकरास सुमारें ३० मण धान्य उत्पन्न होत असे, आतां दुप्पट होत आहे, व स्काटूलंडांत तर अडीचपटीपेक्षां जास्त होऊं लागलें आहे. आतां येथील जमीन इंग्लंडापेक्षां अधिक सुपीक असल्यामुळें येथें तिकडल्यापेक्षां जास्त उत्पन्न व्हावयास पाहिजे, हें उघड आहे. परंतु जास्त होण्याचें बाजूस राहिलें, त्याच्या निम्मे सुद्धां होत नाहीं. मुंबईचे माजी गव्हरनर सर रिचर्ड टेंपल साहेब यांनीं असें प्रमाण काढलें आहे कीं, या देशांत दर एकरास २२ मण धान्य पिकतें, व इग्लंडांत सुमारें ६० मण पिकतें ! येवढा फरक पडण्याचें कारण, तिकडील शेतकरी आपल्या धंद्यांत निष्णात असून त्यांचीं आउतें उत्तम आहेत, हेंच होय. इकडील शेतकरी अज्ञान व गरिबी यांच्या जाळ्यामध्यें गुरफटून गेल्यामुळें बिचारे, आजोबांनीं अगर पणजोबांनीं वापरलेलीं आउतें आहेत, तीं तशींच कायम ठेवून, सुधारलेल्या लोकांशीं टक्कर मारण्यास आपण असमर्थ आहों असें समजून, दैवाला दोष देत स्वस्थ बसले आहेत ! अतोनात श्रम करितात, परंतु “ रात्रभर दळी व पेल्यांत पीठ भरी ” अशी त्यांची

स्थिति होते; यामुळें त्यांचे सर्व श्रम फुकट जातात. ज्यांस थोडेंबहुत ज्ञान आहे, ते कर्जांत बुडाल्यामुळें त्यांच्या हातून कांहींएक होऊं शकत नाहीं. शिक्षणानें मन संस्कृत झालें नसल्यामुळें व पिढीजाद वहिवाटीचा कीट मनावर चढला असल्यामुळें नुसते सावकारही शेतीची स्थिति सुधारण्यास उपयोगी नाहींत. उंबरगांव पेठ्यांतील एका लक्षाधीश सावकारानें अनुभव घेण्यासाठीं सुधारलेल्या पद्धतीचा नांगर मागविला, व लहान बैलांना तो ओढवेना, ह्मणून या मुलखांत असला नांगर उपयोगी नाहीं, असें ठरवून एका कोपऱ्यांत ठेवून दिला! यामुळें आतां सुधारलेल्या नांगराचें कोणी कितीही वर्णन केलें, तरी तिकडे त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. तसेंच मीं एकदां कांहीं जणांस काफी, अंजीर, अननस वगैरे फळझाडें लावण्यास सांगितलें. तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं, असलीं झाडें या जमिनींत व्हावयाचीं नाहींत. आजपर्यंत कोणी लावलीं नाहींत, याचें कारण काय? तेव्हां त्यांचें अज्ञान त्यांस दाखवावें ह्मणून मीं कांहीं झाडें मागवून स्वतांच्या जागेंत लावलीं. तीं चांगलीं तयार झाल्यावर त्यांस मोठें आश्चर्य वाटलें! यावरून शेतीची सुधारणा होण्यास सुशिक्षित लोकांनीं इकडे लक्ष्य देणें जरूर आहे, हें ध्यानांत आलें असेलच. शेतीचा धंदा हलकट अशी त्यांची समजूत असल्यामुळें ते या धंद्यांत शिरतच नाहींत. शाळा, छापखाने, व कोर्टें या तीन ठिकाणीं यांची विशेष गर्दी दृष्टीस पडते. या तिन्ही ठिकाणांहून यांस रजा मिळाल्यास यांचे हाल कोणाच्यानें पहावणार सुद्धां नाहींत. उदाहरणार्थ, संपवाले तारमास्तरच घ्या. पूर्वीं विद्वान्

मनुष्याला मोठमोठ्या पगाराच्या व मानाच्या जागा मिळत, आतां भिकार पगारावर कित्येक वर्षें रखडावें लागतें. तेव्हां सुशिक्षित लोकांनीं लाथा खाण्याचें सोडून, शेतीसारखा स्वतंत्र धंदा पत्करल्यास त्यांचें व विशेषेंकरून सर्व देशाचें अत्यंत कल्याण होईल. उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नौकरी ही ह्मण खोटी आहे, असें त्यांस वाटत असल्यास नकळे! सुशिक्षित लोकांप्रमाणें सरकारानें सुद्धां इकडे लक्ष्य देणें जरूर आहे. शेतकऱ्यांची स्थिति बरोबर नसल्यामुळें शेतीची सुधारणा होत नाहीं, हें सरकारास कधींच समजलें आहे, असें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ठरावावरून उघड दिसतें. या ठरावापासून शेतकऱ्यांचा विशेष फायदा झालेला दिसत नाहीं. या ठरावाच्या भरतीसाठीं आणखी शेंकडों ठराव प्रसिद्ध केले, तरी जोंपर्यंत कायम धाऱ्याची पद्धति अमलांत आणून, हलक्या व्याजानें कर्ज देण्यासाठीं सरकार पेढ्या काढणार नाहीं, तोंपर्यंत शेतकऱ्यांची स्थिति सुधारेल, ही आशा बाळगणें व्यर्थ आहे. एखाद्याचें पोट दुखत आहे, ह्मणून त्याच्या कपाळावर शेंकडो उपचार केले, तर त्याचा जसा कांहीं उपयोग होत नाहीं, तसाच कांहीं प्रकार शेतकऱ्यांसंबंधानें होत आहे असें मला वाटतें. आतां नाडीज्ञानाच्या अभावामुळें डाक्तरच्या हातून होणारी चूक क्षम्य आहे, असें ह्मणतां येईल. पण रोगी कंठशोष करून आपलें दुःख सांगत आहे, व डाक्तर तिकडे लक्ष्य दिलें न दिलेंसें करून कांहींतरी उपचार करूं लागला, तर ती त्याची चूक का खिळा, तें मला समजत नाहीं. सरकारी अधिकारी हे डाक्तर व शेतकरी हे रोगी असें

आपण समजूं. आतां या रोग्यांस काय होत आहे, व त्यावर कोणता उपचार केला पाहिजे, हें या डाक्तरांस कधींच कळलें आहे. "पर्मनेंट सेटल्मेंट" (कायम धारा) हा उपचार एका डाक्तरानेंच बंगालमध्यें प्रथम अनुभवून पाहिला. या उपचारामुळें तिकडील रोग्यांस किती सुख झालें आहे, हें आतां सर्वांस माहीत झालेंच आहे. असा हा रामबाण उपचार माहीत असतां व इतर ठिकाणचे रोगी 'हाच उपचार करा' असें आग्रहपूर्वक सांगत असतां हल्लींचे डाक्तर कांहींतरी उपचार करीत सुटतात, हें त्या बिचाऱ्या रोग्यांचें दुर्दैवच ह्मटलें पाहिजे! हलक्या व्याजानें कर्ज देणें हा देखील बऱ्यापैकीं उपचार आहे. परंतु तो सुद्धां सर्वत्र प्रचारांत आलेला दिसत नाहीं. उंबरगांव पेठ्यांतील कांहीं इसमांस मीं सरकाराकडे अर्ज करण्यास सांगितलें. तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं, जरी सरकार आज हलक्या व्याजानें कर्ज देईल, तरी उद्यां हप्ते न भरल्यास दया माया गुंडाळून ठेवून मिळकत एकदम खालसा करील! याप्रमाणें लोकांच्या मनांत भीति असलेली पाहून मीं सरकारच्या दयालुत्वाबद्दल त्यांची खातरी करून सांगितलें कीं, सरकार मिळकत घेईल व सावकार सोडून देईल असें तुह्मांस वाटतें काय? जर वाटत नसेल, तर मग अधिक व्याज देऊन सावकारांची तुंबडी भरण्याचें कारण काय? याप्रमाणें समजूत केल्यावर त्यांपैकीं एक दोन इसमांनीं सरकाराकडे तगाईबद्दल अर्ज केले. परंतु त्यांची कांहीं दाद न लागतां, कर्ज मिळणार नाहीं असा त्यांस जबाब आल्याचें समजलें. कर्ज मागितलेल्या रकमेपेक्षां अधिक किंमतीचें इस्टेट असतां कर्ज कां

मिळालें नाहीं, तें समजत नाहीं. इतःपर असल्या अर्जा-वर कर्ज न देण्याचें कारण काय तें कळविण्याची तज-वीज सरकारकडून होईल अशी आशा आहे. असो. आतां पूर्वीप्रमाणें धंदे चालू नसल्यामुळें लोकांच्या हातांत पैसा खेळत नाहीं. शेतीच्या धंद्यांत वर्षातून एकदां पैसे हातीं येतात. त्यांतून शेतीचा खर्च वजा केला, ह्मणजे जवळ फारच थोडी शिलक राहते. दुर्दैवानें हंगामशीर पर्जन्य पडला नाहीं, अथवा कोल्ह्या लांडग्यांचा, चोरा चिरटांचा उपद्रव झाला, ह्मणजे कांहीं शिलक न राहतां कर्ज मात्र होतें! सरकारदेणें तर दिल्याखेरीज सुटकाच नाहीं. प्राप्ति–ती देखील अगदीं थोडी–एकदां व खर्च सदोदित चालू असल्यामुळें बिचाऱ्या शेतकऱ्याला नेहमीं वाणी किंवा मारवाडी याचें घर पाहण्याची पाळी आली, तर त्यांत नवल काय? 'व्याजबट्टा' हीच सावकारांची शेती! मग ते भारी व्याज घेऊन शेतकऱ्यांस पिळून टाक-तील यांत नवल नाहीं. लहान रकमेवर भारी व्याज घेतलें तर एकवेळ चालेल. परंतु मोठ्या रकमेवर भारी व्याज घेतलें तर तें जाचक झाल्याखेरीज कधीं राहणार नाहीं. भारी व्याजामुळें आजपर्यंत हजारों लाखों कुटुंबें धुळीस मिळालीं आहेत! इतर ठिकाणीं सावकार काय दराचें व्याज घेतात, हें मला पक्कें माहीत नाहीं, परंतु उंबरगांव पेठ्यांतील व्याजाप्रमाणें भारी दराचें तें नसेल अशी माझी कल्पना आहे. दरसाल दरशेंकडा १२ ते १८ हें व्याजाचें साधारण प्रमाण आहे. स्थावर मिळकत गहाण घेऊन दरसाल दरशेंकडा १८ रुपये व्याज घेणारे सावकार इतरत्र नसतील असें मला वाटतें. इकडील एका साव-

कारानें एका कुळाची १० रुपये धाऱ्याची उत्तमप्रतीची जमीन गहाण घेऊन त्यास वर दिलेल्या व्याजाप्रमाणें ४०० रुपये दिले! त्या कुळाच्या दोघां मुलांस चाकरी असल्यामुळें त्याच्या घरांत दरमहा १८ रुपये येत आहेत. आज ९ वर्षें झालीं, तरी तो अद्याप कर्जमुक्त झाला नाहीं. बाहेरची आवक असलेल्या मनुष्यास जर भारी व्याज जाचक होतें, तर मग शेतीखेरीज ज्याला दुसरें उत्पन्न नाहीं, त्याला तें किती त्रासदायक होत असेल, याची कोणालाही कल्पना करतां येईल. मुंबईतील सुप्रसिद्ध परोपकारी डा० मोरेश्वर गोपाळ देशमुख यांनीं उदार अंतःकरणानें मला कांहीं रकम ६ रुपये व्याजानें दिली, हें ऐकून सर्वांस आश्चर्य वाटलें! त्या वेळीं स्वतांचें इस्टेट गहाण देऊन सदर व्याजानें कर्ज घेण्याविषयीं पुष्कळांनीं आपली इच्छा दाखविली होती. असो, आतां पूर्वींप्रमाणें पाऊस पडत नाहीं, शेताचा कस धुपून गेल्यामुळें पूर्वींप्रमाणें पीक येत नाहीं. सरकारसारा फार असल्यामुळें शेतीचा धंदा ह्मणजे आंतबट्याचा व्यापार अशी लोकांची समजूत होत चालली आहे. आपल्या देशांत शेतसारा किती जबर आहे, तें उमरावतीचे प्रसिद्ध वकील रा० मुधोळकर यांनीं एकदां कांग्रेसमध्यें भाषण करतांना स्पष्ट करून दाखविलें होतें. युरोपांतील व हिंदुस्थानांतील शेतसाऱ्याची तुलना करतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, "विलायतेंत ३३ रुपये उत्पन्नाला १ रुपया व युरोपमध्यें बहुतकरून ९० रुपये उत्पन्नाला १ रुपया शेतसारा आहे. युरोपांतील अगदीं भिकार देश जो देन्मार्क, तेथें २७ रुपये उत्पन्नाला १ रुपया शेतसारा आहे. आणि आपल्या या हिंदुस्थानांत ३ किंवा ४ रुपये

उत्पन्नाला १ रुपया सारा आहे ! " खरोखर हें प्रमाण चमत्कारिक नव्हे काय ? बरें, पुनः अशा प्रकारचा जबर सारा असून तो कायमचा नाहीं. ३० वर्षांनीं वाढल्याखेरीज राहत नाहीं. १८७४ पर्यंत रिविजन सर्वेमध्यें धारा वाढण्याचें प्रमाण फारच भयंकर होतें. उदाहरणार्थ, सोलापुर जिल्ह्यांतील धाऱ्याचें प्रमाण पहा :–इंदापूर तालुक्यांत शेंकडा ५३, पंढरपूर तालुक्यांत ६७, भिमथडी ६९, सोलापूर व मार्ढे या तालुक्यांत शेंकडा ७७ प्रमाणें कर वाढला आहे. याप्रमाणें धारा बेसुमार वाढल्यामुळें लोकांस पुष्कळ त्रास झाला; त्यांनीं ओरड केली. तेव्हां त्या सालीं सरकारानें ठराव केला कीं, पुनः मोजणी होईल तेव्हां शेंकडा ३३ पेक्षां कर वाढूं नये. हें मान देखील पुष्कळ आहे. हल्लींचा धारा जबर असल्यामुळें इतःपर तो मुळींच न वाढेल तर फार उत्तम होईल. वाढविणेंच असल्यास हल्लींप्रमाणें ३० वर्षांनीं न वाढवितां ६० वर्षांनीं शेंकडा २५ प्रमाणें वाढवावा ह्मणजे रयतेचा पुष्कळ बचाव होईल. सरकारसारा दुष्काळाच्या सालीं देखील बहुतेक वसूल झाला, यावरून शेतकऱ्यांची स्थिति दिवसेंदिवस सुधारत चालली आहे, असें सरकारी रिपोर्टांत प्रतिपादन केलेलें असलें, तरी तें खरें आहे असें ह्मणतां येत नाहीं. मुदतशीर धारा न भरल्यास नोटीस होते. पुढें त्या मुदतींत नोटीसफीसह धारा न भरल्यास घरांतील सामानसुमान जप्त होतें! पुढें त्याचें लिलांव होऊन धारा वसूल केला जातो. धारा वसूल करण्याची पद्धति याप्रमाणें विलक्षण असल्यामुळें आतां शेत चांगलें पिकलें, मध्यम पिकलें, अगर अगदीं कमी पिकलें, तरी जवळ असेल तें विकून, अथवा कर्ज काढून धारा भरल्याखेरीज

लोकांच्या जीवास समाधान वाटत नाहीं ! यावरून धारा वसूल करण्याची हल्लींची पद्धत लोकांना 'बाऊ' प्रमाणें भीतिदायक वाटत असते, हें उघड आहे. खरी स्थिति अशी असतां, 'शेतकऱ्यांची स्थिति दिवसेंदिवस सुधारत आहे, ह्मणून धारा बहुतेक वसूल होतो' असें ह्मणणें हा ईश्वराचे घरीं तरी मोठा गुन्हा समजला जाईल, यांत संशय नाहीं; असो. हल्लीं या देशांत बसलेला सरकारधारा जबर असतां कित्येकांस तर तो अतिशय कमी आहे, असें वाटतें ! दुष्काळकारणशोधक कमिटींतील मेंबर जस्टिस कनिंगहाम यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "देशी राजांच्या कारकीर्दींत शेतीच्या उत्पन्नापैकीं $\frac{3}{5}$ सरकारांत घेत असत. बाकीच्या $\frac{2}{5}$ मध्यें शेतीचा खर्च व कुटुंब पोषण या दोन गोष्टी पूर्वींच्या शेतकऱ्यांस कराव्या लागत. आतां इंग्रजी अमलामध्यें शेंकडा ८ पर्यंत कर द्यावा लागतो." सर डब्ल्यू लीवार्नर यांचें मत सुद्धां अशा प्रकारचेंच आहे. मागें एकदां आपले माजी व्हाइसराय लॉर्ड एल्‌जिन यांनीं पुण्याच्या सार्वजनिक सभेला असें उत्तर दिलें होतें कीं, "हल्लींइतका कमी सारा पूर्वीं कोणत्याही राज्यांत नव्हता." होय, मी ह्मणतों, सारा कमी आहे. पण पूर्वीं जंगल, अबकारी, मीठ, स्टांप वगैरे बाबी नव्हत्या ! इन्कम टॅक्स लायसन्‌टॅक्स वगैरे कर नव्हते, ही गोष्ट नामदारांच्या लक्षांत कशी राहिली नाहीं कोण जाणे ! आतां पूर्वींच्या राज्यांत हल्लींपेक्षां शेतसारा जास्त होता, व कराच्या अनेक बाबी होत्या, असें आपण समजूं. या देशरूपी विहिरींतील पाणी मोटेनें बाहेर निघे व दुसऱ्या रस्त्यानें परत विहिरींत येऊन पडे. हल्लींप्रमाणें थेट अट्‌लांतिक

महासागराला जाऊन मिळत नसे. यामुळें पूर्वींच्या राज्यांतील शेतकऱ्यांची स्थिति चांगली होती, सबब त्यांस भारी कर देण्यास सुद्धां अडचण वाटत नसे. आतां शेतकरी ह्मटला ह्मणजे तो दरिद्री असावयाचा! मि० ह्यूम साहेब असें ह्मणतात कीं, "शेतकऱ्यांचे गांवचे गांव—नव्हे प्रांताचे प्रांत—कर्जामध्यें इतके बुडाले आहेत कीं, त्यांतून ते कधीं निघतील किंवा नाहीं याचा संशय वाटतो." हल्लीं गहाण व फरोक्त दस्तैवज पूर्वींपेक्षां पुष्कळच होऊं लागले ही एकच गोष्ट वरच्या ह्मणण्याला पुष्टि देण्याला पुरेशी आहे. या संसारसमुद्रांतून तरून जाण्याला धनसंचयरूपी नौका ज्यांस पूर्वसंचितानें प्राप्त झाली आहे, त्यांस कर्ज-रूप भोंवऱ्यामध्यें पडण्याची बहुतकरून भीति नाहीं, हें खरें. परंतु अशा प्रकारचे भाग्यवान फारच थोडे असणार हें उघड आहे. यामुळें पुष्कळ लोकांस भोंवऱ्याचा प्रसाद मिळतोच मिळतो. या भोंवऱ्यांत जो सांपडला, त्याची मग किती दुर्दशा होते, त्याचें वर्णन करणें कठीण आहे. आमच्या शेतकऱ्यांस कर्ज देणारे वाणी, मारवाडी, साव-कार यांपैकीं बहुतेक शायलॉकसारखे निर्घृण हृदयाचे असल्यामुळें ते त्यांस भोंवऱ्यांत ओढतात; व त्यांच्या मुलां-बाळांसही तें अनुपम्य सुख भोगावयास लावितात. डा० हंटर ह्मणतात कीं, "सावकार लोक शेतकऱ्यांजवळून काय दरानें व्याज घेतात, याची चौकशी केली, तेव्हां मला असें कळलें कीं, व्याजाचें मान कधीं कधीं दरसाल दर शेंकडा ३७॥ रुपयेपर्यंत चढलेलें आहे." हे साहेब हल्लीं येथें नाहींत; नाहींतर अधिक व्याजाचीं कित्येक उदाहरणें दाखवून मीं त्यांस चकितच करून सोडलें असतें!

सहा महिन्यांनीं मुदलाच्या दीडपट अगर दुप्पट दाम घेणें ह्मणजे हें काय दराचें व्याज पडतें, याचा विचार केला, तर शेतकऱ्यांची कींव आल्याखेरीज रहात नाहीं. शेतकी ह्मणजे सर्व जगाचें मायपोट होय. या देशांत शेतकी-शिवाय दुसरा महत्त्वाचा धंदा नसल्यामुळें ही या देशाचें जीवित आहे. शेतकरी सुखी व समृद्ध असले कीं, राजा व प्रजा सर्वच सुखी आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानच्या शेतीवर व शेतकऱ्यांच्या काबाडकष्टावर व निढळाच्या घामावर येथील राजेरजवाडे, जहागिरदार वगैरे बडे लोकांचे ऐषआराम व इतर सर्व वर्गांची यथेच्छ चैन हीं अबाधित चालू आहेत. इतकेंच नव्हे, तर आमच्या राज्यकर्त्यांच्या इंग्लंड देशाची जीवनशक्ति ह्मणजे आमची शेतकीच होय! अमेरिका व रशिया येथून विला-यतेस दरसाल अतोनात गहूं जातात. विलायतेस पिक-लेले गहूं तेथील लोकांस फक्त १९ दिवस पुरतात! हिंदु-स्थानांतून लाखों खंडी गहूं जातात, ते त्यांस फार तर १॥ महिना पुरतात. बाकी राहिलेल्या १० महिन्यांस लागणारे गहूं अमेरिका व रशिया हे देश पुरवितात. गव्हांचा मुख्य पुरवठा इतर देशांतून होत असल्यामुळें हिंदुस्थानच्या गव्हांबद्दल इंग्लंड विशेष पर्वा करणार नाहीं, हें खरें आहे. तथापि ते देश परकी राजांच्या अमलांत असल्यामुळें हिंदु-स्थानाप्रमाणें आयत्या वेळीं उपयोगी पडणार नाहींत हें ध्यानांत ठेवणें जरूर आहे. मागें स्पेन व अमेरिका यां-च्यामध्यें लढाई झाली, तेव्हां याचा अनुभव आलाच होता. त्या वेळीं अमेरिकेहून इंग्लंडांत गहूं येण्याचे बंद पडले. त्यामुळें इंग्लंडची फजिती होण्याचा संभव होता. परंतु

तेव्हां हिंदुस्थानानें अब्रू संभाळली! यावरून या देशांतील शेतकीवर इंग्लंडचें सुद्धां जीवन अवलंबून आहे, ही गोष्ट ध्यानीं आली असेलच. त्या वेळीं गव्हांचा भाव पुष्कळ वाढण्याचा संभव होता, परंतु आमचे शेतकरी दरिद्री असल्यामुळें त्यांस व्याजाच्या भीतीनें थोडकासा भाव वाढल्या-बरोबर माल विकावा लागला! जरासा भाव वाढतांक्षणीं लोकांनीं इतका कांहीं माल विकला कीं, आगगाड्या व आगबोटी यांतून गहूं निर्गत करण्यास अवकाश बिलकुल उरला नाहीं! उत्तर हिंदुस्थानांतील कित्येक स्टेशनांवर गव्हांच्या गोणींचे प्रचंड ढीग तसेच पडून राहिले! सातां समुद्रांपलीकडे जसा गव्हांचा पूर लोटला होता, तसा तिकडून पैशाचा पूर इकडे यावयास पाहिजे होता; पण दुर्दैवानें अमच्या शेतकरी वर्गास ह्मणण्यासारखा लाभ झाला नाहीं. ओझीं वाहणारीं गाढवें ओझें वाहून वाहून मरतात, तरी त्या श्रमांचा त्यांस कांहीं फायदा मिळत नाहीं, त्या-प्रमाणें 'राली ब्रदर्स' सारख्या परदेशी व्यापाऱ्यांनीं अगाऊ पैसे देऊन कुळांचीं घरें बांधून ठेविल्यामुळें त्यांस पुष्कळ माल स्वस्त भावानें मिळाला! त्यामुळें आमच्या शेत-कऱ्यांनीं उन्हातापांत खपून जे श्रम केले त्यांचा त्यांस कांहीं फायदा मिळाला नाहीं. ज्यांस अगाऊ पैसे दिले नव्हते, त्यांस किंचित् अधिक भाव देऊन त्यांचा माल देखील त्यांनीं विकत घेतला. यावरून आमचे शेतकरी पैशाला भुकेलेले असतात, असें स्पष्ट दिसतें. इंग्लं-डांतील दरएक मनुष्याचें वार्षिक उत्पन्न ५०० रुपये आहे, व येथील प्रत्येकाचें उत्पन्न फक्त ३० रुपये आहे, असा विद्वानांनीं अजमास काढला आहे. याप्रमाणें गरिबी

आमच्या शेतकऱ्यांच्या पाठीस चिकटून बसली आहे, ती कधीं सुटेल तें परमेश्वर जाणे. आतां गुरांच्या संहारामुळें शेतीचें कसें नुकसान होत आहे, त्याबद्दल विचार करूं.

हल्लीं आपल्या देशांत निरनिराळ्या कारणांनीं गुरांचा संहार होत आहे, तसा इतर कोणत्याही देशांत होत नसेल. विलायतेस वाफ किंवा घोडे यांच्या साह्यानें नांगर चालवितात, तरी तिकडे गुरांढोरांच्या रक्षणाकडे अतिशय लक्ष देतात. या देशांत आज हजारों वर्षांपासून नांगराला बैल किंवा पाडे जुंपण्याची चाल आहे. येथील हवा उष्ण असल्यामुळें घोडा व पाडा यांच्यानें बैलाप्रमाणें एकसारखें पुष्कळ वेळपर्यंत काम करवत नाहीं, व शेतकऱ्यांच्या गरिबीमुळें वाफेचा नांगर इकडे चालू होईल असें दिसत नाहीं. ह्मणून इकडील शेतकऱ्यांस बैलाखेरीज गत्यंतर नाहीं हें उघड आहे. याप्रमाणें इकडील शेतीला मुख्य आधार गुरांढोरांचा असतांही त्यांच्या रक्षणाकडे कोणीं विशेष लक्ष्य देत नाहीं, हें केवढें आश्चर्य आहे बरें! पोटभर चारा न मिळाल्यामुळें सन १८९१ च्या जानेवारीपासून सपटेंबरपर्यंत अवघ्या आठ महिन्यांत फक्त अर्काट प्रांतामध्यें ३ लक्ष गुरें मरण पावलीं! गेल्या दुष्काळाच्या सालीं मुंबई इलाख्यांतील ९ जिल्ह्यांत ९,४४,९९० गुरें मेलीं! पूर्वीं जंगलाचा कडक बंदोबस्त नसल्यामुळें व गवताचा व्यापार चालू नसल्यामुळें गुरांस पोटभर चारा मिळत असे. आतां गवतजमिनीमध्यें 'खेडाण' होऊं लागल्यामुळें मुक्या प्राण्यांच्या पोटास चिमटा बसत आहे! तरी मायबाप सरकारानें जंगलामध्यें गुरें चारण्याची मोकळीक द्यावी; लोकांनीं

गवताचीं कुरणें राखून ठेवण्याची तजवीज करावी, ह्मणजे गुरांची उपासमार होणार नाहीं. लांडगे, वाघ वगैरे हिंस्त्र पशूंच्या भक्ष्यस्थानीं दरवर्षी हजारों ढोरें पडतात, त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं प्रजेला शस्त्रें वापरण्याची परवानगी असली पाहिजे. याशिवाय अनेक रोगांनीं मरतात तीं व मांसभक्षक लोकांच्या हातून ठार मरतात तीं, यांची संख्या बघितली, तर अंगावर कांटा उभा राहतो. मनुष्यांच्या रोगावर उपचार करण्यासाठीं मोठमोठ्या गांवीं दवाखाने आहेत, तसे गुरांसाठीं जागोजाग दवाखाने स्थापन केले पाहिजेत; ह्मणजे आतांप्रमाणें रोगांपासून गुरांचा संहार होणार नाहीं. शेतीला गुराढोरांचा किती उपयोग आहे, हें नीट समजावून सांगितलें तर, मांसभक्षक लोकांकडून हल्लींप्रमाणें गुरांचा संहार न होतां थोडाबहुत बचावच होईल. पूर्वी गुरांची संख्या विपुल असल्यामुळें दूध, तूप फार स्वस्त असे; यामुळें गोरगरिबांसही हे पदार्थ पोटभर खावयास सांपडत. पूर्वींच्या मंडळींचीं धिप्पाड शरीरें असण्याचें दुसरें कांहीं कारण दिसत नाहीं. पूर्वी घरोघर गुरें पुष्कळ असल्यामुळें राबाकरितां शेण विकत घेण्याची पाळी क्वचित् कोणाला येत असे; आतां बहुतेक शेतकऱ्यांस शेणाची केवढी पंचाईत पडते, तें सर्वांस कळत आहेच. एखादें गुरूं मलविसर्जन करतांना दृष्टीस पडलें ह्मणजे, त्याच्या मागें किती मंडळी धांवत असते, तें बघितलें ह्मणजे पराकाष्ठेचें दुःख होतें. आतां शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळें शेतीचें कसें नुकसान होत आहे, त्याचा विचार करून हें प्रकरण संपवितों.

आज कित्येक वर्षें येथील शेतकरी एकसारखे शंखनाद करून ह्मणत आहेत कीं, आतां पूर्वींप्रमाणें पीक येत नाहीं. उघडच आहे. मनुष्य, जनावर वगैरे प्राण्यांस शक्ति येण्यासाठीं पौष्टिक अन्न खावें लागतें; त्याचप्रमाणें जमिनीचा गेलेला कस आणण्यासाठीं तिला 'खत' घालणें जरूर आहे. मनुष्याचे विष्ठेला 'सोनखत' असें नांव असतां, त्याचा उपयोग बाहेर गांवच्या लोकांस कळूं नये, याचें आश्चर्य वाटतें. सोनखत घातलें असतां जमिनीची सुपीकता अतिशय वाढते, हें शहरच्या बागवान लोकांस माहीत आहे असें दिसतें. परंतु खेडेगांवीं याचा उपयोग कोणी करीत नाहीं, यावरून याचा उपयोग त्यांस कळला आहे, असें वाटत नाहीं. चीन देशांत मनुष्याच्या विष्ठेला किंमत पडते, तशी दुसरे कोणत्याही देशांत पडत नाहीं. तेथें कोणी एखादा गृहस्थ पाहुणा गेला, तर त्यास पुष्कळ मेजवान्या होतात. कारणपरत्वें एखाद्याकडे भोजनाला नच जाववलें, तर 'शौचाविधी'स जाऊन त्याची मर्जी संपादन करतां येते ! असा चमत्कार दुसऱ्या कोणत्या देशांत असेल बरें ? बहुतकरून नसेल असें वाटतें. विष्ठेसारखें स्वस्त व अत्युत्तम खत दुसरें कोणतेंच नाहीं. जनावरांच्या हाडांचा भुका हें देखील अत्युत्तम खत आहे. युरोपांतील जमिनींची सुपीकता पहिल्यापेक्षां पुष्कळ वाढली आहे. याचें कारण, तिकडील शेतकरी हाडांचा पुष्कळ उपयोग करूं लागले आहेत, हेंच होय. आज युरोपांतील शेतकरी दर खंडीस १२।१३ रुपये प्रमाणें भाव देऊन हाडें खरेदी करितात, व त्यांचा बारीक चुरा करण्यास दर खंडीस १॥ रुपया खर्च लागतो. याशिवाय मुंब-

ईहून युरोपांत नेण्यास आगबोटीचा खर्च पडतो तो वेगळा. मुंबईस हाडांचें पीठ करणाऱ्या ५।६ गिरण्या आहेत. ठाण्यास देखील १ गिरणी आहे. या गिरण्यांमध्यें हाडांचा खप होतोच. त्याखेरीज मुंबईहून दरवर्षास २ लक्ष खंडींपेक्षां जास्त हाडें युरोपांत जातात! इतका खर्च करून हाडांचें खत युरोपांतील शेतकरी घेऊन जातात, तेव्हां त्यांपासून कांहींतरी फायदा होत असला पाहिजे हें उघड आहे. ह्मणून हाडांच्या खताविषयीं थोडीशी माहिती येथें देतों. जमिनींत हाडांचा चुरा मिळविला व त्यावर पावसाचें पाणी पडलें ह्मणजे तें त्यांत जिरतें. या पाण्यांत हवेंतला कार्बानिक आसिड वायू मिसळलेला असतो. हा वायू हाडांतील फास्फेटमधील चुन्याच्या तीन भागांपैकीं एक भाग आपणाकडे ओढून घेतो. हाडांमध्यें तीन भाग चुना व एक भाग फास्फरिक आसिड असतें, त्याच्या ऐवजीं दोन भाग चुना, एक भाग पाणी व एक भाग फास्फरस आसिड असें नवीन फास्फेट उत्पन्न होतें, व हें फास्फेट पहिल्यापेक्षां पाण्यांत पुष्कळ लवकर विरतें; यामुळें त्यास झाडें लवकर शोषून घेतात. परंतु हा सर्व प्रकार घडून येण्यास कितीएक महिने लागतात. १८४० पर्यंत याच रीतीनें हाडांचा उपयोग करीत असत. परंतु या वर्षी एका साहेबानें हाडांचें खत तात्काल उपयोगी पडावें, अशी युक्ति काढिली. सल्फ्यूरिक आसिडाच्या योगानें हाडांतलें मूळचें फास्फेट बदलून त्याच्या जागीं नवीन फास्फेट उत्पन्न होतें. त्यांत दोन भाग पाणी, एक भाग चुना, व एक भाग फास्फरस आसिड असून तें अति जलद विरत असतें; ह्मणून तें झाडांस फार लवकर शोषून घेतां

येतें. वनस्पतींच्या खनिज घटकांतील बहुतेकांत निमेच्या जवळ जवळ फास्फरस ॲसिड असतें. हें द्रव्य ज्या जमिनींत मुळींच नसतें, तींत पेरलेल्या धान्यास कणसें मुळींच येत नाहींत. कदाचित् आल्यास भरींव येत नाहींत. यावरून वनस्पतींस जें बीज यावयाचें, त्यास या द्रव्याची फार जरूर आहे, हें ध्यानांत आलेंच असेल. सोडा, पोटॅश इत्यादि क्षारांपेक्षां धान्यांस फास्फरस ॲसिड फार जास्ती खर्च होतें. त्यामुळें हा उपयुक्त पदार्थ जमिनींतून लवकर नाहींसा होतो. सिलिका, पोटॅश, सोरा वगैरे क्षार खनिज पदार्थांपासून जमिनीस प्राप्त होतात. परंतु फास्फ० ॲसिड तयार होण्याला जमिनींत फारशीं साधनें नसतात. याप्रमाणें या उपयोगी द्रव्याचा व्यय फार होतो, व तें कमी उत्पन्न होतें. आपल्या देशांतील जमिनी दिवसेंदिवस निःसत्व होत चालल्या आहेत, ह्मणून हाडांचें खत घालून ह्या द्रव्याचा पुरवठा केला पाहिजे. हाडांचा भुका करून जमिनींत घातल्यास त्यापासून पुष्कळ फायदा होईलच. परंतु भुका न करितां नुसतीं हाडें जमिनींत घातलीं, तरी त्यापासून फायदा होईल. अशा हाडांपासून जमिनींत एक प्रकारच्या अव्यक्त अन्नाचा संचय होतो, व तें वर्षानुवर्ष उपयोगीं पडत असतें. अशीं उपयुक्त हाडें महार, धेड वगैरे हलक्या जातींचे लोक अल्प फायद्यासाठीं विकून टाकून जमिनींचें सर्वस्वी नुकसान करीत आहेत. परदेशी लोक खताखेरीज दुसऱ्या कामांतही हाडांचा उपयोग करितात. म्यांचेस्टर शहरीं रंगविण्याचे मोठाले कारखाने आहेत. तेथें मोठाल्या कढयांमध्यें हाडें उकळतात; त्यांत वर जी चरबी येते, ती मेण-

बत्त्या करणारांस विकून, बाकीचें पाणी लागेल तितकें दाट करून खळीप्रमाणें कापडास लावितात. त्यांवर एक प्रकारचा रंग चढवून त्यांचे चमचे, कांटे वगैरे पदार्थ करितात. घागरीसारख्या निमुळत्या तोंडाच्या भांड्यामध्यें हाडें घालून त्यांस खूब आंच दिली ह्मणजे त्यांतले कांहीं वायुरूप घटकावयव उडून जाऊन मागें एक काळा पदार्थ राहतो, त्यास हाडांची काजळी ह्मणतात. साखर शुद्ध करण्याला ही फार उपयोगी आहे. गहूं, ऊंस, वाटाणे यांस हाडें फार उपयोगीं आहेत. प्रत्येक आंब्याच्या झाडाला ९।१० शेर हाडें घातलीं, तर तें झाड फार जोरानें फुटतें. कलमें लावणारांनीं इकडे लक्ष्य द्यावें. हें खत घातलें तर मांडीयेवढा जाड ऊंस तयार होतो! यावरून हाडें किती उपयोगी आहेत, हें आतां सर्वांस कळलेंच असेल. आपल्या देशांतून हीं हाडें नव्हत तर प्रत्यक्ष लक्ष्मीच–परदेशीं जात आहे, याचा सूज्ञांनीं विचार करावा. भूस्तरशास्त्र, वनस्पतिशास्त्र व रसायनशास्त्र शिकलेल्या विद्वान् व श्रीमंत गृहस्थांचें इकडे लक्ष्य जाऊं नये, हें लहान सहान आश्चर्य नव्हे! अमेरिकेंतील विद्वान् लोक फील्ड, फार्म, स्टॉकमन वगैरे मासिक पुस्तकें काढून अविद्वानांस शेतीविषयाचें ज्ञान देतात, व इकडील विद्वान् विधवावपन, पुनर्विवाह वगैरे गोष्टी प्रचारांत कशा येतील, या विचारांत गुंग असतात! अशा विद्वानांच्या विद्वत्तेला धिःकार असो! सुप्रसिद्ध विद्वान् डा० मर्डक ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांतील सगळ्या शेतकीची बारीक चौकशी झाली पाहिजे. जमिनीवर कर बसला आहे तो बरोबर आहे कीं नाहीं, हेंही पाहिलें पाहिजे. कर वसूल करण्याची पद्धति

योग्य आहे कीं नाहीं, तेंही बघितलें पाहिजे. चीन व जपान येथून कांहीं झाडें या देशांत आणून लावलीं, त्यांचा पुष्कळ उपयोग झाला. तशींच आणखी पुष्कळ झाडें आणलीं पाहिजेत." होय, हें ह्मणणें खरें आहे. परंतु तें करावें कोणीं? लिची व कापूर हीं झाडें त्याच देशांतून आलीं आहेत. अननस, पेरू, पीच, चिकू वगैरे झाडें इतर देशांतूनच या देशांत आलीं आहेत. आणखी अश प्रकारचीं झाडें असतील तीं या देशांत आणण्याची तजवीज झाली पाहिजे; ह्मणजे पुष्कळ कल्याण होईल. हिंदुस्थानचे माजी व्हाइसराय लॉर्ड मेयो यांच्या मनांत येथें जंगी शेतकीखातें स्थापन करावयाचें होतें. येथील शेतकऱ्यांस पुरेशी मदत न केल्यास त्यांची स्थिति वाईट होऊन अखेर सरकारचेंही नुकसान होईल, ही गोष्ट पक्की ठसली होती; ह्मणून त्यांनीं त्याप्रमाणें योजना करून विलायत सरकाराकडे शिफारस केली होती. परंतु त्यामध्यें विलायत सरकारानें हात घालून त्याची अगदीं दुर्दशा करून टाकली! आपल्या देशाच्या राज्यकारभाराचें सूत्र स्टेट सेक्रेटरीच्या हातीं असल्यामुळें व त्यांस इकडील खरी स्थिति माहीत नसल्यामुळें, हिंदुस्थान सरकारच्या मनांत पुष्कळ चांगल्या गोष्टी करण्याचें आलें, तरी तें दरिद्री मनुष्याच्या मनोरथाप्रमाणें व्यर्थ जातें! असो, आतां माझ्या मतें शेतकऱ्यांस सुखी करण्याचे उपाय आहेत ते येणें प्रमाणें:—

( १ ) त्यांच्या मुलांस सक्तीचें शिक्षण असावें; ६ पासून १४ वर्षांपर्यंत प्रत्येक मुलगा शाळेंत घातला पाहिजे. गरिबांस फुकट शिक्षण मिळावें, व तें त्यांच्या उपयोगीं पडेल असें असावें.

( २ ) सावकारांच्या तडाक्यांतून त्यांस अजिबात सोडवून, सावकारी अगर सरकारी पेढींतून अगदीं कमी व्याजानें त्यांस कर्ज देववावें.

( ३ ) विलायत सरकार व इंग्रजलोक यांस शेतकरी वर्गाची दुर्दशा व भावी परिणाम यांचें चित्र दाखवून कायम धारा मिळेल असें करावें.

( ४ ) जंगलापासून होत असलेला त्रास दूर करवावा.

( ५ ) गुरांचा संहार न होण्यासाठीं शक्य ते प्रयत्न करावे.

तूर्त इतक्या गोष्टी अमलांत आल्या तरी पुष्कळ झालें. या गोष्टी कधीं अमलांत येतील त्या येवोत. आतां शेतीची सुधारणा करूं इच्छिणाऱ्यांच्या हितास्तव जिराईत व बागाईत या दोहोंचा शेती भाग २ मध्यें संक्षिप्त रीतीनें विचार करितों.

**शेती, भा० २, (प्रकरण १ लें.)**—जिराईत.—पावसाच्या पाण्यानें किंवा जमिनींत पावसाचा ओलावा असतो त्यानें, ज्या धान्यांची उत्पत्ति होते, तीं जिराईत धान्यें होत. याचे खरीप व रब्बी असे दोन प्रकार आहेत. पावसांत लागवड होऊन आश्विन कार्तिकाच्या पूर्वीं तयार होतात, तीं खरीप धान्यें होत. जमिनीच्या वरापीनें व दंवाच्या ओलाव्यानें तयार होतात, तीं रब्बी धान्यें होत. जिराइतांत भात हें मुख्य आहे. सबब त्याबद्दल विचार करूं.

**भात.**—हें धान्य मूळ हिंदुस्थानांतील आहे. हें या देशांत तलावाच्या किंवा डोंगराच्याकडेस आपोआप उगवतें, त्यास देवभात किंवा नीरभात असें ह्मणतात. या रानटी जातीपासूनच लागवडीच्या मेहनतीनें उत्तम जातीचीं भातें

तयार झालीं आहेत. बंगाल इलाख्यांतील भाताची प्रसिद्धि सर्वत्र आहे. भातामध्यें पुष्कळ जाती आहेत. त्यांतील कांहीं येथें देतों. अंबेमोहर, अवचितें, अरवेल, अंतरसाळ, आजगा, आवटें, कमोद, काळी साळ, काळा भात, काशी पटणी, कांदज, काळी कुळई, काळी कचुरी, कुणसाळ, कुशा, कुडे पटणी, कुदुर्धा, किजळ, कोंदाळ, कोचिवरा, कुडई, कडा, कळवी, कोलंबा, कोथिंबरें, खारी, खोचरें, खिरसाळ, गणद, गजवेल, घुडा, घोटवेल, घोसाळवेल, चिकणसाळ, चिमणसाळ, चांदरसाळ, जिरेसाळ, जिरेवेल, जिरेपटणी, टोकसाळ, डांगी, डामरगा, डोका, डोंगरें, तांबसाळ, तातकळंब, तंवसाळ, तुरवें, दाणगा, दोडकी, धनेसाळ, धुडंगी, नवान्न, नानकळंब, निणगा, निरपुंज, नेरेंपटणी, पनवेल, पंकसाळ, पांढरीसाळ, पाणभात, बहाड, बंगाला, बुरबुटें, बोडकें, भडस, भारीसाळ, भुरा, महाडी, मसुरीसाळ, मांजरवेल, मुदगार, मुगुद, मोरीसाळ, मोत्याळ, मोरचुका, राजावेल, राता, लवेसाळ, लासा, लोंबसाळ, वज्री, वरंगळ, वांकसाळ, वालय, वेलची, वेळा, संधाने, सुतयाळ, सुतरसाळ, सोरटी, सोनफळ, सोनवेल, सोनसाळ, हरकेल, हेबडी, एकलोंब्या. भातामध्यें हळवीं व गरवीं असे दोन भेद आहेत. तीन चार महिन्यांत तयार होतात तीं हळवीं, व पांच सहा महिन्यांनीं पिकतात तीं गरवीं समजावीं. रुचीस, दिसण्यास व पुरवठ्यास हळव्यापेक्षां गरवीं भातें चांगलीं असतात. कांहीं दिवस पाऊस न पडला तर हळव्या भाताचीं तोंडें वासतात, तसें गरव्या भाताचें होत नाहीं. आतां याचा उपयोग काय तें सांगतों. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व देशांतील लोक याचा थोडा बहुत उपयोग करितात. फार लोकांचें

मुख्य अन्न तांदूळ हें आहे. गव्हांपेक्षां तांदूळ कमी पौष्टिक आहे. शंभर शेरांमध्यें फक्त ६ शेर तांदुळाचें रक्त बनतें. बाकीच्यांचा मल होतो. गव्हांपेक्षां यांत स्टार्च ( सत्व ) जास्ती असतें, परंतु ग्लुटेन ( चिकोटी ) कमी असते. युरोपांत हजारों खंडी तांदूळ जातो; त्यांपैकीं पुष्कळ भाग स्टार्च व दारू तयार करण्यासाठीं खपतो. भाताची पेज थंड व फार पौष्टिक आहे. भाताच्या लागवडीची सर्वांस माहिती आहेच. कित्येक ठिकाणीं राब पौष, माघ महिन्यांत भाजतात हें बरोबर नाहीं. राबाची सर्व तयारी करून ठेवावी, व चैत्र वैशाख महिन्यांत जमिनींतील ओलावा सुकल्यावर राब भाजावें; व ते भाजण्यापूर्वीं त्यांवर थोडथोडें पाणी शिंपडावें, ह्मणजे जमीन चांगली भाजून निघते. "बांध खातर ने पाणी, करम लावे ताणी" अशी गुजराथींत ह्मण आहे. याचा अर्थ असा कीं, ज्याच्या शेताला बंदेस्ती, खत व पाणी यांची सोय आहे, त्याचें नशीब उघडलें ह्मणून समजावें. उत्तम जमीन असून मेहनत पुष्कळ असेल तर दर एकरास तीन खंडी, मध्यम जमिनींत २ खंडी, व कनिष्ठ जमिनींत १ खंडीपर्यंत पीक निघतें. आतां गव्हांबद्दल विचार करूं

**गहूं.**—हें धान्य याच देशांतील असावें असा तर्क आहे. कोकणांत याची लागवड मुळींच होत नाहीं असें नाहीं. परंतु देशावर व तापी नदीच्या उत्तरेस याचें उत्पन्न फार होतें. अमेरिकेंत व रशियांत गहूं पुष्कळ पिकतो खरा, परंतु या गव्हांप्रमाणें त्या गव्हांत गुण नसल्यामुळें आज बाजारांत यालाच जास्त किंमत येते. इकडील गव्हांत पाण्याचा अंश कमी असल्यामुळें याची कणीक अधिक पडते. याची

साल पातळ असल्यामुळें याचा मैदाही जास्ती पडतो. शिवाय इकडील गव्हांत पौष्टिक अंश जास्त असून हे गोडीसही. अधिक असतात. आपल्या देशांत गव्हांच्या जाती प्रसिद्ध आहेत. त्या येणेंप्रमाणें:- शेतगहूं, जोवारी गहूं, तांबडा, पांढरा, पिंवळा, बनसी, खंडवा, पाणगहूं, काटेगहूं, पोटेगहूं, हंसेगहूं, दाऊदखानी, खपलेगहूं, कवड्यागहूं, जोडगहूं, सोनसळा गहूं, बोंडगहूं. यांत बनसी गहूं उत्तम व खपले गहूं कनिष्ठ समजावे. या धान्यासारखें उपयोगी धान्य दुसरें एकही नाहीं. याचे शेंकडों पदार्थ होतात. यांत नायट्रोजिनस् फार असल्यामुळें हें फार पौष्टिक आहे. अशक्त मनुष्यांस शक्ति येण्याकरितां गव्हांचें सत्व देतात, हें प्रसिद्धच आहे. शंभरांपैकीं १३ भागांचें रक्त बनतें. यावरून तांदुळापेक्षां हा दुप्पट पौष्टिक आहे. हें उघड आहे. गव्हांची कणीक चाळल्याखेरीज ती उपयोगांत आणीत नाहींत, परंतु ही चूक आहे. हाडाका बळकटी आणण्याचा गुण त्याच्या कोंड्यांत असतो, व तो तर आपण काढून टाकतों! गहूं रोज खाल्ले तर अमांश होतो असें ह्मणतात. परंतु तुपाचा मारा असल्यावर कांहीं होत नाहीं. याला चिकण जातीची व बिन रेतीची जमीन असावी. उत्तम काळ्या फडाच्या व मळईच्या जमिनींत हा चांगला पिकतो. ज्या जमिनींत चुन्याचा अंश जास्ती असतो तींत गहूं चांगला होतो, व त्याला रोगाचें भय फार कमी असतें. चिकण, काळ्या जमिनींत थोडा चुना घातला तर गव्हांस पुष्कळ फायदा होतो. याचें बीं चांगलें नसेल तर पिकास फार नुकसान होतें. म्हणून तें पेरण्यापूर्वी अर्धातास मिठाच्या

पाण्यांत भिजवून ठेवावें. नंतर त्याच्या वजनाच्या १/१० कळीचा भिजलेला चुना त्यांत घालावा, व तें बीं सारखें कालवावें. नंतर तें पेरावें. मीठ न मिळेल तर गुरांच्या शिळ्या मूत्रांत भिजवावें व नंतर चुन्यांत कालवावें. असें केलें ह्मणजे बीजांतील सूक्ष्म किडे मरून जातात, व बीज जोरदार उगवतें. याला चुना हें उत्तम खत आहे. त्याशिवाय लांकडांची राख, मीठ, गुआनो, सोनखत, बकऱ्यांच्या लेंड्या व मूत्र ह्यांचा सुद्धां फार उपयोग होतो. ज्या जमिनींत सतत गहूं करितात, तींतील सिलिका नाहींशी झालेली असते; ह्मणून तींत गव्हांचें पीक उत्तरोत्तर कमी येतें. यास्तव कापूस, मका, तंबाखू, वगैरे पिकें कांहीं दिवस त्या जमिनींतून काढावीं. या पिकांस सिलिका फार लागत नाहीं. आतां जोंधळ्याबद्दल विचार करूं.

**जोंधळा.**—या देशांतील लाखो लोकांचें हें अन्न आहे. याच्या भाकरी करितात. याचा हुरडा खावयास उत्तम लागतो. याचीं कणसें मनुष्यांस व कडबा गुरांस उपयोगी पडतो. याचें ताट फारच गोड असतें. लहान मुलें हीं ताटें उंसाप्रमाणें चावितात. गुरांस हा कडबा फार आवडतो, याचें कारण तरी हेंच होय. गुजराथेंत सुंढियूं ह्मणून जी ज्वार करितात, ती गुरांस फार मानवते. मनुष्यास तूप तसें गुरांस सुंढियूं, असें तिकडील लोक समजतात. कडबा असा पौष्टिक असतां त्याची व्यवस्था जशी करावी, तशी आपले लोक करीत नाहींत. कणसें काढून घेतल्यावर ताटें उन्हांत ठेवितात. त्यामुळें तो लांकडाप्रमाणें कठीण होतो. मग गुरें तो खात नाहींत. कडब्याचा पाला मात्र गुरें खातात, व गोमूत्राच्या योगानें त्याच्या अंगीं खारटपणा

आलेला असतो, ह्मणूनच तो विशेष खपतो. युरोपांतील कांहीं शेतकरी लोक खाडे करून त्यांच्या बाजू बांधितात. ज्वारीचीं किंवा मक्याचीं कणसें तोडल्यानंतर कडबा कापून त्याचे लहान तुकडे करितात. त्यांस एकदोनदां ऊन दिल्यावर ते तुकडे खाड्यांत रचितात. अर्धा फूट जाड थर झाला ह्मणजे त्यावर मीठ, त्यावर पुन्हा कडबा असे शेवट-पर्यंत थर रचून मग मातीनें खाड्याचें तोंड दाबून टाकितात. हा कडबा २ वर्षें राहतो. हा दमदार असल्यामुळें गुरांना फारच मानवतो. एका गुरास मोठ्या दोन पेंढ्या दररोज पुरेशा होतात! याप्रमाणें इकडील शेतकरी करतील तर त्यांचा पुष्कळ फायदा होईल. मीठ महाग नसतें तर गरीब शेतकऱ्यांसही असें करितां आलें असतें. आतां नागलीसंबंधानें विचार करूं.

**नागली.**—याला नाचणी असेंही ह्मणतात. गुजराथेंत याला बावटो ह्मणतात. हिच्या खालीं दिलेल्या जाती प्रसिद्ध आहेत. शेवरा, कुंभारगा, झिपरी, कोळशी, मुटली, केरी, दूधमोगरा, अंबेमोहर, कव्ही, बुट्टी, साठी, वारणसी, डोंगरी, शेंदरी, कारली, तवशी, धवी, पारवी, गोडी, तिपेरी, बहुली, तांदळी. हें कनिष्ठ प्रतीचें धान्य आहे. गरीब लोक याची अंबील करितात. याची खांडवी चांगली होते. अंबिलींत तूप घालून ती महामारी-सारखा रोग झालेल्या गुरास पाजिली तर तें गुरूं सहसा दगावत नाहीं. याचें सत्व लहान मुलांस देतात. हिला राख व मासलीचा कुटा हें खत घालावें.

**कोद्रा.**—यास हरीक असें ह्मणतात. हें अगदीं कनिष्ठ प्रतीचें धान्य आहे. याच्या रामेश्वरी, शिवेश्वरी, हरकिणी

अशा जाती आहेत. कचा व पोचा हरीक माजरा होतो. माजरा हरीक खाल्ला तर घेरी येते. हरीकाचा भात तांदुळाच्या भातासारखा लवकर पचत नाहीं, ह्मणून गरीब लोक मुद्दाम हें धान्य खातात. भाताप्रमाणें या धान्याला मेहनत लागत नाहीं. यास राबाची जरूर नाहीं. हें धान्य एकदां पेरल्यावर तेथून काढून दुसरे ठिकाणीं लावण्याची जरूर नाहीं. गुजराथेंत नेहमीं दोन तीन धान्यें एकत्र करून पेरण्याची चाल आहे. ही चाल इतरत्र नाहीं. एक पीक निघाल्यावर दुसऱ्याचा हंगाम येतो, व तें निघाल्यावर तिसऱ्याचा हंगाम येतो. याप्रमाणें एकाच जमिनींत तीन पीकें केलीं, ह्मणजे पाऊस कमी जास्त पडला तरी एखादें पीक हातीं येतेंच.

**वरी.**–नागलीसारखेंच हें धान्य असतें. डुकरी, मालगोंडा व कोती अशा हिच्या तीन जाती आहेत. शेवटची जात सर्वांत उत्तम आहे. हिचें कणीस मोठें असून दाणा पांढरा व भरदार असतो. गरीब लोक हिची अंबील करून पितात. ही पुष्टिकारक आहे. हें धान्य उपोषणाला उपयोगी पडतें. थोड्या मेहनतीनें व थोडें बीं टाकून पुष्कळ उत्पन्न होणारें हेंच धान्य होय.

**मका.**–हें धान्य पृथ्वीवर सर्व ठिकाणीं होतें. याचें उत्पत्तिस्थान हिंदुस्थान किंवा अमेरिका यांपैकीं एक असावें. पंजाबांत याचें पीक फार होतें. मुंबई इलाख्यांत ह्याचा अन्नाप्रमाणें उपयोग करीत नाहींत. कोवळीं कणसें भाजून खाण्यासाठीं याचा खप फार होतो. बंगाल्याकडील मक्यास गोडी अधिक असते. मक्याचें पीठ करून भाकरी करितात. मका हा गव्हांपेक्षां कमी पौष्टिक

आहे. हा जरा वातूळ आहे. अमेरिकेंत याची गूळ व साखर करितात व यापासून तेल व दारू काढितात. जर्मनी देशांत याच्या पानांचे कागद बनवितात. ब्यांक-नोटांचे कागद याचेच केलेले असतात. या कागदांत सिलिकेचा भाग कमी असल्यामुळें छापण्याचे कामीं यांचा फार उपयोग होतो. मक्यांत तेलकट अंश जास्ती असल्यामुळें अशक्त मनुष्यांस कॉड लिव्हरप्रमाणें याचा उपयोग होतो. याचीं दूधभरीत कोंवळीं कणसें गुरांस घातलीं, तर तीं फार लवकर पुष्ट होतात. घोड्यालासुद्धां हाच खुराक होय. अमेरिकेंत मक्याचें बीं सारख्या रांगांनीं पेरितात. झाडें मोठीं झाल्यावर दोन रांगांमधून एक दोन वेळां नांगर फिरवितात. तेणेंकरून माती पोकळ होऊन तींत ओलाव्याचा प्रवेश होतो, व मुळें लांबवर पसरतात. इतकेंच नव्हे तर झाडांस मातीची पुरणी मिळाल्यामुळें जोर येतो. मक्याचें झाड लवकर वाढत असल्यामुळें याच्या पोषणार्थ जमिनींतील पोषक रस फार खर्च होतो. ह्मणून मक्याच्या शेतांस खताचा पुरवठा न केल्यास जमीन ताबडतोब उतरते. यांस शेण व लीद यांचें ताजें खत घालावें. मक्याच्या दाण्यांत फास्फरस ॲसिडचा भाग फार असतो, सबब हाडाच्या खतापासून फार फायदा होईल. आतां तुरीबद्दल विचार करूं.

**तूर.**—याचें उत्पत्तिस्थान हिंदुस्थान होय. ह्यांत पांढरी व तांबडी असे दोन भेद आहेत. हें झाड दोन अडीच हात वाढतें. उत्तर हिंदुस्थानांत तुरीची एक जात आहे. तिचें झाड पुष्कळ वर्षें टिकतें. पाण्याचें साधन असेल तर नेहमीं ओले दाणे खावयास सांपडतात. तूर ही

साधारण बरीच पौष्टिक आहे. याची डाळ करितात. जंबूसर येथील डाळ लवकर शिजते, व जास्त रुचिकर लागते. तांदूळ व डाळ एकत्र शिजवून खिचडी करितात. ही नुसत्या भातापेक्षां पौष्टिक आहे. डाळ पित्तकर असल्यामुळें तुपाखेरीज खाणें बरें नव्हे. तुरीचा पाला गुरांस फार आवडतो. या झाडाचा कोळसा बंदुकीची दारु करण्यास फार उपयोगी पडतो. तुरीच्या डाळीच्या पिठाचीं भजीं फार चांगलीं होतात. गुराचें तोंड येतें, तेव्हां तुरीची डाळ शिजवून त्यास खाऊं घालितात. तुरीचें वरण पथ्यकर आहे. आतां हरभऱ्या संबंधानें विचार करूं.

**हरभरा.**–द्विदल धान्यांत हा श्रेष्ठ आहे. गुजराथेंत बारीक दाण्यास चणी व मोठ्या दाण्यास चणा असें ह्मणतात. हा फार पौष्टिक व कसदार आहे. याचे अनेक पदार्थ होतात. बेसनाचे लाडू व पुरणाच्या पोळ्या हीं हरभऱ्याच्या डाळीचीं उंचीं पक्वान्नें होत. याची आमटी उत्कृष्ट होते. कोल्हापुरी आमटीची प्रसिद्धि सर्वत्र आहेच. पैलवान लोक रोज भिजलेली डाळ व खोबरें अगर कांदा खातात. हरभरा घोडयास खावयास घालितात. हरभऱ्याच्या झाडांवर पडलेलें दंव धरितात, त्यांस आंब असें ह्मणतात. मोडशीवर ही गुणकारक आहे. आंबींत भिजवलेलें बीं लवकर उगवतें. गारुडीलोक आंब्याचें झाड अगर मेथी तावडतोब उगवून अडाणी मनुष्यांस फसवितात. कित्येक ठिकाणीं भाताचें पीक काढून घेतल्यावर त्या शेतांत हरभरा करितात. परंतु पावसांत पडीत टाकलेल्या शेतांत जसा हरभरा होतो, तसा त्यांत होत नाहीं. वरकस जमिनींत हरभऱ्याचें पीक काढून घेतल्यावर

जोंधळा केला, तर उत्तम होतो. आतां उडदाबद्दल विचार करूं.

**उडीद.**–हें धान्य याच देशांतील असून सर्व ठिकाणीं पिकतें. याला शेंगा येतात. हा फार पौष्टिक आहे. याचे पापड उत्तम होतात. उडीद शिजवून गुरांस घातले असतां तीं फार पुष्ट होतात. याचा पाला गुरें खात नाहींत, म्हणून तो शेतांत गळून पडेल असें करावें. शेंगा वरवर काढून घेऊन झाडें तशींच सुकूं दिलीं म्हणजे पाला आपोआप गळून पडेल. यापासून जमिनीला उत्तम खत मिळतें. आतां वालाबद्दल विचार करूं.

**वाल.**–हें धान्य बहुधा इकडीलच असावें. याचें उत्पन्न फक्त कोंकण व गुजराथ या दोन ठिकाणीं होतें. पोटॅश, चुना व मीठ यांचें प्रमाण विशेष असेल, तर त्या जमिनींत वाल चांगला होईल. हें धान्य फार गोड पण जरा वातूळ आहे. याचा पाला दुभत्या गुरांस घातला, तर त्यांचें दूध वाढतें. इतर जनावरेंही फार पुष्ट होतात. राजापुरी पावटे फारच गोड असतात. याचे दोन अगर तीन दाणे भात लावलेल्या शेतांत सहा हातांचे अंतरावर मघाचे पावसांत रोंवून द्यावे. मग भात पिकेपर्यंत याचे हातभर रोपे होतात. ते बाजूस सारून भात कापावें. नंतर त्याचे वेल होऊन पसरतात. प्रत्येक वेल तीनचार हात लांब जागा व्यापितो. अलिबाग, रेवदंडा इकडे वाल पुष्कळ पिकतात. याच्या पांढरा, तांबडा व कडवा अशा तीन जाती आहेत. ज्या शेतांतील पाणी लवकर नाहींसें होत नाहीं, त्यांत वाल व्हावयाचे नाहींत, असें समजून पुष्कळ लोक स्वस्थ बसतात. परंतु ही त्यांची चूक आहे.

अशा शेतांत भाताच्या दोन रांगांमध्यें हाताहाताच्या अंतरानें कोयत्याचें टोंक मारावें, व त्या ठिकाणीं दोन अगर तीन दाणे टाकून वर कोयत्यानेंच माती सारावी. . भाताच्या सावलीमुळें हीं झाडें वीतभरच वाढतात. भात कापल्या-वर तीं झाडें झपाट्यानें वाढूं लागतात. भात कापतांना वेल पायांनीं तुडवले गेल्यामुळें फार जोरदार होतात. अशा रीतीनें वाल लावला, तर त्याचें पीक पुष्कळ येतें. या वालाचीं सालें भाजीस उपयोगीं पडत नाहींत. साला-सुद्धां दाण्यांची भाजी होते, अशा वालाच्या अनेक जाती आहेत. सुरती वालपापडी शेताच्या बांधावर लावली, व शेंगा खुडण्याचें काम सुरू ठेविलें तर फाल्गुन महिन्यापर्यंत शेंगा निघतात. माखण्या, वालपापडी, मेदल, घोटवाल, वालसांबळ, चपटी सांबळ, वगैरे जातीचे वाल मांडवावर चढविले पाहिजेत.

**चवळी.**—हिचे वेल असतात. मारवाड, गुजराथ काठे-वाड व कोंकण येथें ती पिकते. कोंकणांत उत्तम जातीच्या चवळ्या होतात. अळसुंदा, बारकी चवळी, बडगी चवळी, वेल चवळी, काळ्या तोंडाची चवळी अशा अनेक जातीच्या चवळ्या असतात. वेलचवळी बारमहा लागते. हें धान्य फार वातूळ असून पौष्टिक आहे. चवळ्यांची उसळ उत्तम होते. बंगाल व आसाम प्रांतांत चवळीच्या पाल्यापासून एक प्रकारचा रंग करितात. या-खेरीज जिराईत धान्यांमध्यें मसूर, वाटाणा व लांख हीं कठोळाचीं धान्यें प्रसिद्ध आहते. मसूर हिंदु लोकांत निषिद्ध मानिली आहे. सर्व कठोळांत मसुरेसारखा स्वाद दुसऱ्या कोणत्याही धान्यास नाहीं. वाटाणा वातूळ आहे.

याच्या ओल्या शेंगा मडक्यांत घालून भाजल्या तर फारच सुरेख लागतात. लांख यास गुजराथेंत लांग म्हणतात. हेही वातूळ आहेत. अशक्त मनुष्यास मुळींच पचत नाहींत. आतां गळिताच्या धान्याबद्दल विचार करूं.

**गळिताचीं धान्यें.**—भुईमूग, तीळ, शिरस, एरंडी, करडई, जवस, ताग, अंबाडी या सर्वांचा या धान्यांत समावेश होतो. यांपैकीं प्रत्येकाबद्दल दोन शब्द लिहितों.

**भुईमूग.**—याची लागवड देशावर फार होते. याचें मूलस्थान अमेरिका होय. फ्रान्स व बेलजियम येथें याचा फार खप होतो. हा फार पित्तकारक आहे. याचें तेल खाण्यास व जाळण्यास उपयोगीं पडतें. युरोपांत साबूच्या कारखान्यांत याचा फार खप होतो. याची पेंड दुभत्या जनावरांस फायदेशीर आहे. पोटॅश, चुना, हाडांचें खत यांपासून यास फायदा होतो. तीळ सर्व ठिकाणीं पिकतो, याचें तेल खाण्यास व जाळण्यास उपयोगीं पडतें. याची पेंड गुरांस घालितात. केळ व ऊंस यांस पेंडीचें खत घालावें. हा दाट पेरूं नये.

**शिरस.**—याचें पीक गुजराथेंत फार होतें. फ्रान्स, जर्मनी व बेलजियम येथें याचा फार खप होतो. पंचवीस वर्षांपूर्वीं जितक्या लक्ष रुपयांचा शिरस जात असे, तितक्या कोटी रुपयांचा हल्लीं जाऊं लागला आहे. याचें तेल फार उपयोगीं आहे. या तेलाचा लोणच्यास फार उपयोग होतो. याची पेंड गुरांस व खतास उपयोगीं पडते. चिकण जमिनींत हा चांगला होत नाहीं.

**एरंडी.**—यांत दोन जाती आहेत. एक वर्षायु व दुसरी बहुवर्षायु. ही येथून दरवर्षी परदेशांत विशेषेंकरून

फ्रान्स देशांत फार जाते. इतर तेलापेक्षां हें तेल फार थंड जळतें. बारक्या एरंड्यांचें तेल औषधी आहे. एरंडेल हा फार सौम्य जुलाब आहे. चामडी कमविण्यासाठीं याचा खप होतो. यंत्रास व गाड्यांच्या चाकांस लावण्यास व साबू, मेणबत्त्या वगैरे करण्यास हें उपयोगीं पडतें. जहाजें, गाड्या व खुर्च्या वगैरे लांकडी सामानास जें व्हारनिश देतात, त्यांत हें घालितात. याची पेंड फक्त खतास उपयोगीं पडते. केळीला हें फार उत्तम खत आहे.

**करडई.**—देशावर व गुजराथेंत ही फार पिकते. हिची लागवड रंगांसाठीं करितात. पागोटीं वगैरे उंची वस्त्रांस कुसुंबी रंग देतात, तो करडईच्या फुलांपासून करितात. हिचें तेल खाण्यास व जाळण्यास उपयोगीं पडतें. पेंड गुरांस व खतास उपयोगीं पडते.

**जवस.**—यास गुजराथेंत अळशी म्हणतात. ईजिप्त, रशिया व बेलजम येथून हा इंग्लंडास फार जातो. आपल्या देशांत बंगाल्यांत याचें पीक फार होतें. कापूस, गहूं याच्या खालोखाल याचा व्यापार चालतो. याचें तेल काढितात. तें रोगणास उपयोगीं पडतें. बेलतेल म्हणतात तें हेंच. याची पेंड जनावरांस उपयोगीं पडते. याच्या वाखापासून बारीक कापड तयार करितात. पूर्वीं याचें तेल परदेशांत जात असे. आतां बींच जाऊं लागलें आहे. मोहरीची किंवा शिरसाची भेळ न करितां शुद्ध जवसाचें तेल युरोपांत पाठविल्यास त्यास हल्लींपेक्षां पुष्कळ भाव येईल. इतकेंच नव्हे, तर येथील तेली लोकांस थोडेंसें काम मिळेल, व पेंड गुरांस व खतास उपयोगीं पडेल. याचा वाख व सळ यांपासून कागद होतात. याच्या योगानें

जमीन निःसत्व होते. मीठ, राख, उकिरड्याचें खत, व बकऱ्या मेंढ्यांच्या लेंड्या यांचें खत घालावें, म्हणजे जमिनीस फायदा होतो.

**ताग.**—यास सण असेंही म्हणतात. हा परदेशांत फार जातो. याच्या बियांचें तेल उंची साबू व औषधें यांमध्यें उपयोगीं पडतें. याच्या भाजलेल्या बियांचें तेल पिंवळट रंगाचें असतें. तें लोखंडी सामानास व घरास रंग लावण्यास उपयोगीं पडतें. याची पेंड गुरांस घालितात. याचा वाख चांगला निघतो. वाखाकरितां पेरावयाचा असेल तेव्हां दाट पेरावा व बियाकरितां पेरतांना पातळ पेरावा. नंतर झाडें साधारण मोठीं झाल्यावर त्यांचे शेंडे तोडून टाकावे, म्हणजे त्यांचा विस्तार वाढून त्यांस पुष्कळ शेंगा येतात. पूर्वीं आगपेट्या नव्हत्या, तेव्हां याच्या सळकांड्यास गंधक लावून त्या विस्तवावर धरून पेटवीत असत. या देशांत याचे गोणपाट करितात, जाळीं विणतात. कोंकणांत वेसणी, पागे सुरेख करितात. येथून दरवर्षीं हजारों खंडी ताग विलायतेस जातो, तेथें त्याचें उंची कापड बनतें. तागी मुकटे आपल्या देशांत येतात, हें सर्वांस माहीत आहेच. यंत्राच्या योगानें ताग धुतल्यावर कापसाप्रमाणें पांढरा स्वच्छ दिसतो. तागाचे कागद कापसाच्या कागदापेक्षां बळकट असून सुरेख दिसतात. आपल्या देशांत वायव्येकडील प्रांत व मुंबई इलाख्यांत अमदाबाद, जुन्नर येथें व कलकत्ता येथें कागद करितात, त्यांत सुद्धां वाख काढून घेतल्यावर जो गाळ राहतो, त्याचा पुष्कळ उपयोग होतो. तागापासून शेतीस फार फायदा होतो. याच्या उष्णपणामुळें हरळी वगैरे

गवत व कीड यांचा नाश होतो. निःसत्व झालेल्या जमिनी पडीत न टाकतां त्यांत ताग केला, तर पीक सांपडून जमीन सुधारते. ताग स्वच्छ धुतला तर त्यास आतांपेक्षां अधिक किंमत येईल. वाख फार कुजविला तर धागे लवकर सुटतात व जास्त पांढरे होतात खरे, परंतु ते लवकर तुटतात. खोल पाणी थंड असतें म्हणून व वाहत्या पाण्यांत ऊब नसते म्हणून त्यांत ताग जास्त दिवस कुजविला पाहिजे.

**अंबाडी.**—हिंदुस्थानांत सर्वत्र पिकते. देशावर याचें पीक पुष्कळ होतें. अंबाडीचा वाख सणाच्या वाखापेक्षां कमी बळकट, परंतु अधिक तकतकीत असतो. याचें तेल जाळण्यास व गाडयांच्या ओंगणास उपयोगीं पडतें. पेंड जनावरांस घालितात. हिच्या कोंवळ्या पाल्याची भाजी फार सुरेख होते. आतां जिराइतांतील महत्त्वाचा जिन्नस जो कापूस त्याबद्दल विचार करूं.

**कापूस.**—अन्नवस्त्र यांची ददात ज्याला नाहीं, त्यास सुखी समजावें. अन्नामागून वस्त्र शब्द आहे, तेव्हां अर्थात् तो अन्नापेक्षां कमी योग्यतेचा आहे. कापूस, लोंकर, रेशीम, ताग यांचीं वस्त्रें होतात. रेशमी वस्त्रें श्रीमंत लोक वापरतात, व मध्यमप्रतीचे लोक समारंभास जाण्यासाठीं एकेक संग्रहास घेऊन ठेवितात. लोंकरीचीं वस्त्रें थंड देशांतील लोक बारमास व इतर ठिकाणचे लोक थंडीचे दिवसांत मात्र वापरतात. उष्ण देशांतील लोक कापसाचीं वस्त्रें वापरतात. अमेरिका, ईजिप्त व हिंदुस्थान या तीन ठिकाणीं कापूस फार पिकतो. या तीन ठिकाणचा कोट्यावधि रुपयांचा कापूस दरवर्षी विलायतेस जातो.

जगांतील बहुतेक वस्तीला एकटें इंग्लंड कापड पुरवितें. असें म्हणावयास हरकत नाहीं. कापसाच्या सरक्या दुभत्या गुरांस फारच फायदेशीर होतात.

**नीळ.**—हा फार उपयोगी पदार्थ आहे. पूर्वीं या देशांत नीळ फार पिकत असे. आतां बंगाल व मद्रास व मुंबई इलाख्याचा कांहीं भाग येथें ही पिकते. हिचा रंग होतो. विलायतेस दरवर्षीं येथून लाखो रुपयांची नीळ जाते. पूर्वीं गुजराथेंत नीळ फार पिकत असे. परंतु आतां तेथील लोक खानदेशांतील नीळ विकत घेतात. निळीची लागवड केली असतां जमीन फार सुपीक होते. जमिनींतील पौष्टिक द्रव्यें या झाडांस फार थोडीं खर्च होतात. बंगालपेक्षां गुजराथेंतील जमीन निळीच्या लागवडीस जास्त लायक असतां केवळ तिकडील लोकांच्या देवभोळेपणामुळें हा व्यापार बुडाला आहे. हिला चुनखडीची जमीन पाहिजे. याखेरीज आल म्हणजे सुरंगी ह्मणून झाड आहे, त्यापासूनही रंग तयार करितात.

**सुरंगी.**—याच्या मुळांत तांबडा रंग असतो. कापसाचें सूत व कापड विशेषेंकरून खारवीं रंगविण्यास हा रंग उपयोगीं पडतो. हा रंग परदेशांत जात नाहीं.

**तंबाखू.**—याचें मूलस्थान अमेरिका होय, असें पुष्कळांचें मत आहे. अमेरिकेंत पिकण्यापूर्वीं हा चीन देशांत पिकत होता, असा शोध लागला आहे. हल्लीं या देशांत बहुतेक ठिकाणीं तंबाखू होतो, तो सर्व येथेंच खपतो. येथील लोकांस खाण्यास किंवा ओढण्यास कडक तंबाखू लागतो. युरोपांतील लोक तंबाखू खात नाहींत. ते सिगार, चिरूट करून ओढतात. तंबाखूमध्यें निकोटाईन ह्मणून एक द्रव्य

असतें, तें फार असलें ह्मणजे तंबाखू कडक होतो. हल्लीं युरोपांतून व अमेरिकेंतून सिगारच्या रूपानें दरवर्षी या देशांत लाखो रुपयांचा तंबाखू येत आहे. यामुळें आपला पैसा परदेशीं जात आहे. तंबाखू सुकवून कमविण्याच्या रीतींत योग्य सुधारणा केल्यास आपला पैसा वांचेल, इतकेंच नव्हे तर इतर देशांतील पुष्कळ पैसा आपल्या देशांत येईल. तंबाखू हा हलक्या प्रकारचा कैफ आहे. गूळ घालून याचा गुडाखू करितात. तपकीरही करितात. देशी व युरोपियन औषधींमध्यें याचा पुष्कळ खप होतो. याचें तेल निघतें, परंतु तें विषारी आहे. तंबाखूवर नारळांतील पाणी शिंपलें तर तो सौम्य होतो. व त्याच्या रोप्याचीं कांहीं पानें खुडून टाकलीं, तर राहिलेलीं पानें तलख होतात. चिरुटास तंबाखू कसा पाहिजे तें सांगतों. पानें नरम व लांब रुंद असावीं. पानांचा रंग पिंवळा असून त्यांला डाग अगर भोंकें नसावीं. मधला दांडा जाड नसावा. तो सावकाश जळत राहील असा असावा. असे गुण येण्यासाठीं तंबाखू पिकविण्याचें काम व तो सुकवून कमाविण्याचें काम एकाच इसमास करतां येणार नाहीं, सबब दुसरें काम कारखानदारांनीं केलें पाहिजे ह्मणजे फायदा होईल.

**(प्रकरण दुसरें) बागाईत.**—विहिरीच्या अगर पाटाच्या पाण्यानें ज्या जिनसा पिकतात, त्यांस बागाईत जिनसा, व त्या जेथें पिकतात, त्यास वाडी असें ह्मणतात.

जिराइतापेक्षां बागाइताचें उत्पन्न जास्त, त्याप्रमाणें त्याला खर्चही जास्त होतो. ह्मणून जमीन, पाणी, द्रव्य यांची अनुकूलता असेल, त्यानेंच वाडी करण्याचा प्रयत्न करावा.

जमीन नांगरून, डिखळें फोडून, धोंडे काढून, व खतें घालून सुधारतां येईल. परंतु पाणी असावें तसें व तेंही मुबलक नसेल तर मालकाचे सर्व श्रम फुकट जातील. पाणी खारट अगर मचूळ नसावें. व तें उंच जागीं असावें कीं जेणेंकरून सर्व जागीं सारखें पोहोंचण्यास अडचण पडणार नाहीं. वाडीची जागा पसंत करतांना रेलवे स्टेशन अगर बाजार जवळ आहे कीं नाहीं याचा पण विचार करावा. कारण, जिराइताप्रमाणें बागाईत जिनसा पुष्कळ वेळ टिकणाऱ्या नसतात, व शहराखेरीज त्यांना भारी किंमत येत नाहीं. बागाईत जमीन पसंत झाल्यावर तिच्या सभोंवतीं निवडुंगाची वही करावी. निवडुंगें एकदां जगलीं ह्मणजे पुष्कळ वर्षेंपर्यंत वहीप्रीत्यर्थ दिडकीसुद्धां खर्चावी लागत नाहीं. बांबूच्या झिटाची वही सुरेख होते, परंतु तिला फार खर्च लागून आयुष्य कमी असतें. वहीवाड बळकट नसल्यास एखादें गुरूं माळयाच्या कित्येक दिवसांच्या मेहनतीवर एकदम पाणी फिरवितें. वहीच्या मजबुतीसाठीं बाभळ, विलायती चिंच, दिवीदिवीसारखीं कांटेरी झाडें तिच्या बाजूनें लावावीं. असें केल्यानें जळाऊ लांकडाची देखील अनायासें सोय होईल. कंपौंड सुरक्षित झाल्यावर वाडीचे तीन भाग पाडावे. एक फूलझाडांकरितां, दुसरा भाजीपाल्याकरितां, तिसरा फळझाडांकरितां. वाडीच्या मध्यभागीं मालकाकरितां व चाकरलोकांकरितां राहण्यासाठीं घरें असावीं. सर्व भागांत जाण्यायेण्यास अडचण पडूं नये ह्मणून गाडीरस्ते व पायरस्ते पुष्कळ ठेवावे. फूलझाडें व भाजीपाला यांच्यापेक्षां फळझाडांचें उत्पन्न

पुष्कळ येतें. दुसरें असें आहे कीं, भाजीपाल्याचें उत्पन्न मेहनतीवांचून येत नाहीं. फळझाडें मोठीं झाल्यावर त्यांचें उत्पन्न बिनमेहनतीनें येतें. यासाठीं मालकानें फळझाडें लावण्याकडे विशेष लक्ष्य ठेवावें. आतां कोणतीं फळझाडें कोणत्या जमिनींत लावावीं, त्यांस खत काय घालावें, त्याची माहिती येथें थोडक्यांत देतों.

**अननस.**– हा एक उत्कृष्ट मेवा आहे. फळाच्या बाजूस मुनवे असतात ते लावले तर फळें लवकर लागतात. यास तांबडी किंवा रेताड माती व पुष्कळ पाणी पाहिजे. याला कडक उन्ह सोसत नाहीं. फळ आल्यावर पाल्या थोड्या कापाव्या ह्मणजे फळ मोठें येतें. याच्या बुडांत चुना व थोडें मीठ घालावें, ह्मणजे झाड जलद वाढतें. कोणत्याही प्राण्याचें मांस व शेण व लीद यांपासून त्यास पुष्कळ फायदा होतो. याचा मुरंबा उत्तम होतो. याच्या वाखाचें अति उंची कापड बनतें. फळाच्या वासामुळें आजूबाजूस सर्प राहतो.

**अशफळ.**–हें एक फळझाड आहे. याला द्राक्षासारखे घोंस येतात. याला तांबडी अगर रेताळ जमीन पाहिजे. याच्या ताज्या बिया लाविल्या पाहिजेत. हें लिचीपेक्षां कमी गोड असतें.

**आळू.**–जरदाळू सर्वांस माहीत आहेतच. हे खाण्यास सुरेख लागतात. आलूबुखार हे आंबट असून रुचकर असतात. याला तांबडी जमीन पाहिजे. कडक उन्ह नसावें.

**आंवळी.**–हें महत्त्वाचें झाड आहे. ह्याला फळें ६।७ वर्षांनीं येतात. तांबडी जमीन पाहिजे. याच्या

फळाचा मुरंबा पित्तशामक आहे. आंवळेल तेल फार थंड आहे. काळा रंग व शाई करण्यास हे उपयोगीं पडतात.. साल व पाला चामडीं रंगविण्यास उपयोगीं पडतात.

**आक्रूड.**–हें झाड थंड देशांत होतें. तें आपल्या देशांत बहुधा होत नाहीं, ह्मणून त्याची माहिती दिली नाहीं. याला फळें येण्यास १५।२० वर्षें लागतात. फळें खाल्लीं तर शरीर सशक्त होतें.

**अंबाडा.**–याचीं फळें लोणच्यास व कढीस अगर पन्ह्यास उपयोगीं आहेत. याची खांदी जगते. हें झाड उंच वाढतें. याला रेताड अगर तांबडी जमीन चांगली. याचें जळण होतें.

**ऑलिव्ह.**–हें किंमती झाड आहे. ६० ते ९० अंशांपर्यंत उष्णता असेल तेथेंच हें होतें. खांदी जगते.

**आंबा.**–हा उष्ण देशांतील एक अत्युत्तम मेवा आहे. रायवळ, इरसाल व कलमी असे याचे साधारणपणें तीन प्रकार आहेत. मुद्दाम न लावतां झालेल्या झाडांस रायवळ, व मुद्दाम लावलेल्या झाडांस इरसाल, व अशा इरसाल झाडाच्या कलमापासून तयार केलेल्या झाडास कलमी आंबे म्हणतात. कलम अगर खुटी यापासून केलेल्या झाडांस फळें थोडीं येतात; व त्यांस फार थोडें आयुष्य असतें. बाठ्यापासून केलेलें झाड शेंदोनशें वर्षेंपर्यंत जगतें. श्री० रास्ते व नाना फडणवीस यांनीं वांई व मेणवली येथें व पोर्तुगीज लोकांनीं गोवें, मुंबई व दमण येथें आंब्यांच्या बागा मुद्दाम तयार केल्या आहेत. त्यांत कांहीं जातींचे आंबे फारच उत्तम आहेत. आफूस,

पायरी, मालकम, फर्न्याडीस, कावजी पटेल, पावशा, पाखऱ्या, काळा, बनछोड, देवरुख्या, बोरशा, वगैरे उत्तमांपैकीं आंबे होत. मुंबईतील माजगांवांत आंब्यांचीं झाडें आहेत, त्यांस फारच रुचकर फळें येतात. बोरशा आंब्याला पुष्कळ फळें आलीं, ह्मणजे त्याचें लिलांव ९०० रुपयांपर्यंत चढतें. 'मद्रासी' ह्मणून एक जात आहे, त्याचेंही उत्पन्न मोठें असतें. बंगाल्यामध्यें 'श्रावणी' ह्मणून एक उत्तम जात आहे, त्याचीं फळें दिपवाळीस खावयास सांपडतात! कच्च्या आंब्याचें सार व लोणचें उत्तम होतें. याची आंबोशी करितात. याचा मुरंबा होतो. पिकलेल्या आंब्याचा रस खाण्यास उत्तम लागतो. इतर पदार्थांप्रमाणें रसाचा वीट येत नाहीं. याच्या रसाच्या पोळ्या सुकवून ठेवितात. याच्या लांकडाची होडी करितात, व त्याच्या फळ्या तक्तपोशी करावयास उपयोगीं पडतात. साल व पानें चामडीं रंगविण्यास उपयोगीं पडतात. यापासून गोंद निघतो. जुनाट वृक्ष मेल्यावर जळाऊ लांकडाची काळजी दूर होते. तांबड्या जमिनींत हें झाड उंच वाढत.

आतां बाठा लावून झाड कसें करावें तें सांगतों. आपणांस ज्या जातीचीं झाडें करावयाचीं असतील, त्या जातीचे पिकलेले आंबे झाडांवरून झेल्यानें उतरून घेतल्यावर ते सडूं द्यावे. नंतर उंच टोपल्यांत अगर मडक्यांत राख व माती घालून तींत ते लावावे. त्यास दिवसांतून एकदां पाणी देत जावें. अशा रीतीनें तयार केलेले रोपे दुसरे वर्षी जमिनींत लावावे. ज्या ठिकाणीं हे रोपे लावावयाचे असतील त्या ठिकाणीं २५।३० हातांच्या अंतरानें अर्धा पुरुष

खोल, दोन हात लांब व रुंद असे खाडे माघ महिन्यांत खणून ठेवावे. नंतर पाऊस पडण्यापूर्वी त्यांत थोडी राख, व कुजलेलें शेण घालून तळ्यांतील गाळानें ते भरावे. मृगाचा पाऊस पडल्यानंतर मध्यभागीं पोकळ जमीन करून व तींत ४।५ शेर हाडें घालून मुळें दुखविल्या-शिवाय नुसता रोपा लावावा. पाऊस नसेल तेव्हां एक दिवसा आड पाणी द्यावें. कलम बांधणें, खुंटी मारणें, फांदी जमिनींत दाबणें वैगेरे प्रकार प्रत्यक्ष पाहून जसे लक्ष्यांत येतील, तसे पुस्तकांत वाचून येणार नाहींत. पुस्तकी ज्ञान व अनुभवज्ञान यांत पुष्कळ फरक आहे. एका गृहस्थास श्रीखंड करावयाचें होतें. तेव्हां त्यानें पुस्तक उघडून पाहिलें. त्यांत दह्यांतील पाणी आटून गेल्यावर साखर घालावी असा शोध लागला. मग अनु-भवज्ञानाची कांहीं जरूर नाहीं असें समजून पाणी आट-विण्यासाठीं स्वारींनीं तें दहीं चुलीवर ठेविलें! मग श्रीखंड कसें झालें असेल तें सांगावयास नकोच. तात्पर्य, अनु-भवज्ञानच श्रेष्ठ आहे. म्हणून ही माहिती करून घेणा-रांनीं ती अनुभवानें मिळवावी. आतां आंब्याची फांदी कशी लावावी तें सांगतों. चांगल्या जोरदार झाडाची तीन इंच जाड व दोन तीन फूट लांब अशी फांदी पाहून ती सांध्याच्या वरच्या अंगास एक इंचावर तोडावी. अर्ध्या फांदीला कशानें तरी टोंचून लहान लहान भोंकें पाडावीं. व तो अर्धाभाग जमिनींत राहील अशा बेतानें ती नीट उभी लावावी, व वरच्या अंगास शेण दाबावें. त्या ठिकाणीं ओलावा राहील इतकें पाणी घालावें, व सावली करावी. दोन महिन्यांचे आंत पानें फुटूं लागतात.

नवसागर व चुना घातला तर फळें लवकर लागतात. मीठ घातल्यास उत्तम. या झाडाचीं फळें बारीक येऊं लागलीं तर झाडाच्या भोंवतालीं दोन फुट जागा सोडून मुळें ( काष्टतंतू ) कापावीं, ह्मणजे फलतंतू जोरावून मोठीं फळें येऊं लागतात. वाळवीचा उपद्रव होत असल्यास १९ दिवसांनीं गुळाचें पाणी करून बुंधाशीं घालावें ह्मणजे वाळवी नाहींशी होते.

**अंजीर.**–हें पेरूयेवढें वाढणारें झाड आहे. याचें फळ खावयास उपयोगीं पडतें. पिकलेल्या अंजिरांचा मुरंबा होतो. तो पित्तशामक व रक्तवृद्धिकर आहे. तांबड्या अगर चुनखडी जमिनींत अंजीर चांगले लागतात. फांद्या जगतात. मासळीचा कुटा फार फायदेशीर आहे. मुळें तोडून झाड खच्ची करणें फार फायदेशीर आहे. अंजिराचा बाग २० वर्षें टिकतो. प्रथम तीन वर्षें खर्च केल्यास पुढें पुष्कळ उत्पन्न येतें.

**करमर.**–याचें फळ गुळचट व रुचकर लागतें. त्याचें लोणचें व मुरंबा उत्तम होतो. ४।९ वर्षांनीं फळें येतात. बियापासून नवीं झाडें होतात. ३।४ दिवसांनीं पाणी द्यावें.

**कवलें.**–संत्रें, नारिंगें, मोसंबी यांचा एकच वर्ग आहे. पावसाळा फार असेल तेथें हीं झाडें होत नाहींत. याचीं नवीं झाडें कलमें बांधून करावीं. हीं फळें साहेब लोकांस फार आवडतात. याच्या फळांच्या सालीपासून तेल काढितात. मोहोराचें तेल फार किंमती असतें. हीं फळें पाचक व रक्तशुद्धिकर आहेत. हीं खाल्लीं तर दांताचे रोग बरे होतात. यास नेहमीं ऊन्ह पाहिजे. मुळें मोकळीं करून उकिरडा व शेण यांचें खत घालावें.

**काजू.**–डोंगराळ अगर रेताळ जमिनींत हीं झाडें चांगलीं होतात. याला पाण्याची विशेष गरज नाहीं. याला दुसरे वर्षीं फळें येतात. हीं फळें गोड असून पौष्टिक आहेत. मासळीचा कुटा घातला तर फायदा होतो. फळें येत नसलीं तर कोणत्याही प्राण्याचें मांस पुरावें.

**काळें मिरीं.**–हा वेल आहे. ह्याला तांबडी माती व गारठा पाहिजे, याला ऊन्ह नको.

**काफी.**–हें किंमती झाड आहे. याला चवथे वर्षीं फळें येतात. हीं कुटून दुधांत शिजवून पितात. काफी पौष्टिक असून रक्तवृद्धिकर आहे. या झाडाला कडक ऊन्ह व फार वारा सोसत नाहीं. अरेबियन काफीपेक्षां लिबेरियन काफी महाग असते. याला तांबडी जमीन पाहिजे. ताज्या बियाखेरीज नवीं झाडें होत नाहींत. याला पाणी विशेष लागतें. गुरांचें शेण, मूत्र, चुना, झाडाची राख यांपासून फायदा होतो. याचीं पानें कढींत टाकावीं.

**केळ.**–हें फार उपयोगी झाड आहे. याच्या राजेळी, बसराई, सोनकेळ, म्हसराई, तांबडीसाल, हिरवीसाल, बनकेळ, वेलची, करंजेळी, कोखंडी, मुठेळी वगैरे अनेक जाती आहेत. हल्लीं आपल्या देशांत परदेशांतून एक जातीची केळ आली आहे, तिचें पान १० हात लांब असतें. कोणत्याही जमिनींत हें झाड होतें. याला एरंडीची पेंड अथवा मासळीचा कुटा व पुष्कळ पाणी घातल्यास लोंगर फार मोठें येतें. हत्तीच्या दांतांचा थोडा भुका केळीच्या कांद्यांत घालून मेणानें तें भोंक बंद करावें. तो मुनवा रोपून त्यास पुष्कळ पाणी दिल्यास हात हात लांब केळीं येतात. यांच्या लागवडीनें जमिनींतील पोटॅश कमी होतो,

सबब झाडाच्या बुडाशीं राख घालीत जावी. दर झाडास दरवर्षी १ ते २ रुपये उत्पन्न येतेंच.

**केप गुजबरी.**–याचीं फळें गुळचट व आंबट असतात. याची एक प्रकारची दारू करितात. याच्या फांद्या जगतात. कित्येक ठिकाणीं याला ढोलांबा असें म्हणतात. कुजलेलें खत घालावें.

**कोकंब.**–हें झाड तांबड्या जमिनींत मोठें वाढतें. याला पाणी फार लागतें. याच्या फळाचें तेल निघतें. पावसांत पाय कुजतात, तेव्हां हें लावावें. 'म्यांगोस्टिन'चीं नवीं झाडें करावयास हीं झाडें फार उपयोगीं पडतात. याला ७।८ वर्षांनीं पेरूयेवढीं फळें येतात.

**कंवठ.**–हें उपयोगी झाड आहे. याच्या पिकलेल्या फळाचा मुरंबा होतो. काळ्या जमिनींत हें लवकर वाढतें.

**कंबक.**–हें झाड मोठें वाढतें. याला ९।१० वर्षांनीं फळें येतात. त्यांचें लोणचें उत्तम होतें. तांबड्या मातींत हें झाड चांगलें होतें. हें फळ पिकल्यावर सुद्धां आंबट लागतें, म्हणून चुन्याचें बोट लावून खावें.

**खिरणी.**–हें झाड मोठें वाढतें. याचीं फळें खातात. बियांचें तेल तुपासारखें लागतें. याचें लांकूड कठीण असल्यामुळें त्याचा इमारतीकडे उपयोग होतो. १९।२० वर्षांनीं फळें येतात.

**खारीक.**–शिंदी व खजूर यांच्या सारखेंच हें झाड असतें. समुद्रकिनारीं हें झाड चांगलें होतें. याच्या फुलांत स्त्रीकेसर व पुंकेसर असतात. त्यांचा संयोग केला म्हणजे फळें येतात.

**गुलाबी जांब.**–पांढरा जांब, मलाकी जांब यापेक्षां

गुलाबी जात उत्तम असतो. हें किंमती झाड आहे. याला तिसरे वर्षीं फळें येतात. जड ( फांदी ) दाबून केलेल्या झाडास फळें लौकर येतात. याला तांबडी जमीन व पुष्कळ पाणी पाहिजे.

**चलटा.**–हें एक साधारण फळझाड आहे. याला काळी जमीन व दमट हवा पाहिजे.

**चार.**–हें जंगली झाड आहे. सर्व जमिनींत हें होतें. याला पाणी फार नको.

**चिकू.**–हें किंमती झाड आहे. याचें फळ फार थंड असून खावयास मधुर आहे. सबब याला फार किंमत पडते. याच्या खांद्या जगतात. याला पाणी पुष्कळ पाहिजे. याचीं नवीं झाडें बियापासून होतात, पण त्यांस फळें उशिरानें येतात.

**जायफळ.**–हें फारच किंमती झाड आहे. याचीं फळें महाग असतात. जायफळाभोंवतीं जायपत्री असते. ती सुद्धां महाग असते. याचीं सुकलेलीं पानें देखील फुकट मिळत नाहींत. याला तांबडी अगर रेताड जमीन, खारी हवा व पुष्कळ पाणी पाहिजे.

**डाळिंब.**–हें झाड खडकाळ व तांबड्या जमिनींत चांगलें होतें. दरवर्षीं याच्या जुन्या फांद्या छाटून व मुळें कापून टाकावीं. कोंबड्याची विष्ठा हें खत घालावें. याच्या फांद्या जगतात. याच्या फळाला कीड लागली तर बुडाशीं हिंगाचें पाणी व मीठ घालावें. याच्या रसाचें सरबत उत्तम होतें. तें पित्तशामक आहे.

**तूत.**–या झाडाचीं पानें रेशमाचे किडे पोसण्यास उपयोगीं पडतात, ह्मणूनच याचें महत्त्व आहे. याचीं फळें

पिकलीं ह्मणजे खावयास उपयोगीं पडतात. फांद्या होतात.

**दालचिनी.**–हें महत्वाचें झाड आहे. याला तांबडी माती व खारी हवा पाहिजे. याला फुलें आलीं ह्मणजे गुरांपासून फार त्रास होतो, सबब कंपौंड मजबूत पाहिजे.

**द्राक्ष.**–हा वेल आहे. याला तांबडी माती पाहिजे. याला फळांचे झुबके येतात. द्राक्षवेलीचें उत्पन्न दांडगें आहे. याला कुजलेल्या पाल्याचें खत घालावें.

**नागवेल.**–तांबडी माती व मुबलक पाणी असेल तर या वेलांची लागवड करणें फार फायदेशीर आहे. काळी व देठी अशा हिच्या दोन जाती आहेत. पानमळ्यावर कीड पडल्यास फार नुकसान होतें. सबब मळा नेहमीं स्वच्छ ठेवावा, ह्मणजे बहुतकरून उपद्रव होत नाहीं. कदाचित् झाला तर राख टाकावी, गोमूत्र अगर तंबाखूचें पाणी शिंपडावें. मळा करण्यासारखी सोय नसेल व घर-बेगमी पुरतीं पानें पाहिजे असतील तर आंबा अगर सांवर ह्या झाडांस जमिनीपासून दोन हातांवर तोरपणीनें आरपार भोंक पाडावें. व त्यांतून तो वेल पलीकडे काढावा. नंतर तें भोंक मेणानें बंद करावें. पुढें त्या वेलास छाया करावी म्हणजे त्यास नवी फूट होते. याप्रमाणें फूट झाल्या-वर जमिनींतील वेल तोडून टाकावा. असें केल्यास थोड्या आयासानें पुष्कळ वर्षेंपावेतों पानें खावयास सांपडतात!

**नासपाती.**–हें झाड सफरजंगच्या जातीपैकीं आहे. याच्या फांद्या होतात. हीं फळें झाडांवर पिकत नाहींत. पाड लागला म्हणजे उतरून थंड छायेंत कांहीं दिवस ठेवावीं लागतात. हीं फळें खाण्यास योग्य आहेत.

**नारळ.**—हें फार उपयोगी झाड आहे. याला रेताड जमीन व मुबलक पाणी पाहिजे. याला भुंग्यापासून फार उपद्रव होतो. डुकराची विष्टा हें उत्तम खत आहे. सोनचाफ्याचीं ताजीं फुलें उग्र वासाचीं असल्यामुळें त्यांजपाशीं भुंगे येत नाहींत.

**फपनस.**—हें उपयोगीं झाड लिंबाच्या वर्गांतील असल्यामुळें पाहिजे त्या जमिनींत होतें. याचें फळ मोठें असून खाण्यास रुचकर असल्यामुळें याला किंमत पुष्कळ येते. नाताळासारख्या सणांचे दिवसांत एकेका फळास रुपया देखील येतो! याचें बीं लावलें तर फळें लवकर येत नाहींत. कलमास दुसरे वर्षीं फळ येतें.

**पेरू.**—याच्या तीन जाती आहेत. जांभळा, तांबडा व पांढरा. पहिली जात सर्वांत उत्तम. याचा मुरंबा चांगला होतो. बिनबियांचा पेरू पाहिजे असेल तर जमिनीपासून एक हातावर चीर पाडून चाकूनें आंतील गीर पोकरून काढावा, नंतर शेण व तांबडी माती एकत्र करून त्याचा जखमेवर लेप द्यावा म्हणजे झालें.

**फणस.**—याच्या कापा व बरका अशा दोन जाती आहेत. याला तांबडी माती माहिजे. कोणतेंही मांस अगर कुजलेले तांदूळ हें खत घालावें.

**बदाम.**—हें उत्पन्नाचें झाड असून दिसण्यांत सुरेख आहे. बदाम पुष्टिकारक आहे. याचें तेल निघतें. तें महाग विकतें. याला तांबडी माती व पुष्कळ पाणी पाहिजे.

**बिलंबी.**—हें फळझाड आहे. याच्या फळाचें लोणचें व मुरंबा करितात. याला तांबडी माती पाहिजे. नवीं झाडें बियांपासून करितात. लहानपणीं जपलें पाहिजे.

**बिही.**–हें किंमती झाड आहे. याला पाणी पुष्कळ पाहिजे. याच्या फळाचा मुरंबा उत्तम होतो. याच्या फांद्या जगतात. बियांपासून केलेल्या झाडांस ५।६ वर्षांनीं फळें येतात.

**बेल.**–या झाडाचीं पानें श्रीशंकर यास फार आवडतात. याच्या फळाचा मुरंबा आमांशावर उपयोगीं पडतो. याच्या फळाच्या सालीचा रंगांमध्यें उपयोग करितात.

**बेदाणा.**–हें किंमती झाड आहे. याच्या फांद्या जगतात. याला पुष्कळ पाणी व दाट छाया पाहिजे. याला ३।४ वर्षांनीं फळें येतात. तांबडी जमीन विशेष मानवते.

**बोर.**–हें झाड काळ्या जमिनींत चांगलें होतें. नागपूर व अमदाबाद इकडे तोंडल्याप्रमाणें लांब व मोठीं बोरें होतात. रांदेर येथें हरभऱ्या येवढीं बोरें होतात. हीं फार गोड असतात. छाटण्यापासून या झाडास फार फायदा होतो.

**भाकर.**–हें किंमती झाड आहे. या झाडाच्या फळांतील मगज गव्हांच्या रोडग्यासारखा गोड लागतो म्हणून याला भाकरीचें झाड असें ह्मणतात. याला तांबडी जमीन व पुष्कळ पाणी पाहिजे. ३।४ वर्षांनीं या झाडास फळें येतात. गरीब लोकांस हें फार उपयोगी आहे.

**महाळुंग.**–हें झाड कोणत्याही जमिनींत होतें. याच्या फळाचें लोणचें व मुरंबा चांगला होतो. याच्या सालीपासून आसिड बनतें. याला ३।४ वर्षांनीं फळें येतात.

**म्यांगोस्टिन.**–हें किंमती झाड आहे. याला तांबडी माती व पुष्कळ पाणी पाहिजे. याचें फळ फार स्वादिष्ट असतें. यांच्या फांद्या जगतात. रातांब्याच्या झाडावर

डोळे बांधून तयार केलेलीं झाडें फार सुरेख दिसतात. पिकलेल्या फळास फार उत्तम वास येतो.

येथपर्यंत मुख्य मुख्य फळझाडांचें वर्णन दिलें आहे. आतां हा भाग संपविण्यापूर्वी कोणत्या झाडांचें उत्पन्न दांडगें आहे, त्यांची नुसती नामावळी देतों.

दिविदिवि, महागनी, रबर, मोह, सत्पाळू, लिची, सफरजंग, लवंग व लोकॉट. आतां शेतीविषय संपला. दुसरा विषय जो व्यापार त्याबद्दल विचार करूं.

**व्यापार.**—माल विकत घेणें व देणें याचें नांव व्यापार. पूर्वी येथून तऱ्हेतऱ्हेच्या जिनसा बाह्यप्रदेशीं जात व त्याबद्दल पुष्कळ द्रव्य या देशांत येत असे, असें मागें सांगितलेंच आहे. आगबोटी, आगगाड्या, सडका वगैरे व्यापारोपयोगी साधनें वाढल्यामुळें येथून दुसरे देशांत कच्चे पदार्थ पूर्वीपेक्षां पुष्कळ जाऊं लागले आहेत; यामुळें या देशाचा थोडासा फायदा झाला आहे, हें खरें; तरी कच्चे पदार्थ न पाठवितां त्याचे पक्के बनवून पाठवूं लागल्यास हल्लींपेक्षांही अधिक फायदा होईल. कसबाच्या योगानें कच्च्या पदार्थाचें विलक्षण रूपांतर होतें; इतकेंच नव्हे, तर त्याची किंमत देखील मनस्वी वाढते! याच्या स्पष्टीकरणार्थ येथें फक्त एकच उदाहरण देतों. लोखंड हा कच्चा पदार्थ १६ रुपयांचा घेऊन त्याचे नाल बनविल्यास दुप्पट, सुया करून विकल्यास ७० पट, चाकूंचीं पातीं करून विकल्यास ६५० पट, व खिशांतल्या घड्याळांच्या कमानी करून विकल्यास ५० हजार पट किंमत वाढते! यावरून कसबाच्या योगानें कच्च्या पदार्थाची किंमत किती चढते हें आतां सर्वांच्या लक्ष्यांत आलेंच

असेल. पूर्वी या देशाचें नांव सुवर्णभूमि होतें, तें "नांव सोनूबाई व हातीं कथलाचा वाळा" अशापैकीं नव्हतें, हें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. परदेशी व्यापाऱ्यांनीं तिकडील नकली जिनसा इकडे आणून स्वस्त दरानें देण्याचा व त्या आपण डोळे मिटून घेण्याचा सपाटा सुरू केल्यामुळें या देशाचे मुखावर पूर्वीसारखा तजेला राहिला नाहीं, यांत नवल कसलें! दुर्दैवानें आम्ही आळशी व चैनी बनल्यामुळें परदेशी वस्तूंचा खप पुष्कळ होऊं लागला, व त्यामुळें इकडील धंदे बसत चालले. पुढचा विचार करून आपण त्यांचा स्वीकार केला नसता, तर आज त्यांचा सुळसुळाट झालेला दिसला नसता! परदेशी व्यापाऱ्यांनीं आह्मांस वस्तू बनविण्याच्या श्रमांतून मुक्त केलें, इतकेंच नव्हे, तर त्या आणण्यासाठीं घरांतून बाहेर जाण्याची सुद्धां गरज ठेविली नाहीं! कुटुंबांतील मनुष्यांखेरीज वाटेल ती जिन्नस मागवा, ती व्हॅल्युपेबल पार्सलनें घरबैठा आलीच म्हणून समजा! बिलाचे पैसे मात्र तयार पाहिजेत. या सर्व जिनसारूपी जळवांनीं आमच्या देशरूपी शरीरांतील द्रव्यरूप शोणित अतिशय शोषून घेतलें आहे, व जें थोडेंबहुत शिल्लक राहिलें आहे, तेंही शोषण्याचा सपाटा चालविला आहे. पण आपण तिकडे बघतच नाहीं, हें केवढें आश्चर्य आहे बरें! यांपैकीं कापड व लोखंड या सर्वांत मोठ्या जळवा होत. आपण दरसाल कापड २९ कोट रुपयांचें व लोखंड १४ कोट रुपयांचें विकत घेतों. या दोहोंपुढें बाकी सर्व जिनसा 'दर्यामे खसखस' प्रमाणें होत! हे दोन राक्षस आपल्या देशाला फार झपाट्यानें गरीब करीत आहेत, याचा अझूनही विचार करावयास

नको काय? नयनसुखासाठीं विलायती कापड वापरून आपण आपल्या घरच्या मुलांस उपाशीं मारतों, व दारच्या पोरांस पोटभर जेवायास घालतों, असें होतें. हें आपल्या लक्ष्यांत कधीं येणार बरें? स्वदेशी मालास मागणी थोडी व परदेशी मालास मागणी फार, यामुळें स्वदेशी व्यापारी दुःखांत व परदेशी व्यापारी आनंदांत दिवस घालवितात, याची आपणांस लाज वाटली पाहिजे! घाण्याचा बैल रात्रंदिवस फक्त तेल्याकरितां श्रम करित असतो, त्याप्रमाणें आपण सर्व परदेशी व्यापाऱ्यांचें पुरें करण्यासाठीं सगळा दिवस धडपड करीत आहों; इतकेंच नव्हे, तर ब्रह्मदेवानें त्यांच्यासाठींच आपणांस निर्माण केलें आहे कीं काय अशी शंका येते! आपले स्वदेशबांधव भुकेनें व्याकुळ होत असतां आपले प्राण कासावीस होत नाहींत, तर आपण या देशांत जन्म तरी कशाला घेतला? परदेशांतून तऱ्हेतऱ्हेच्या जिनसा आपल्या देशांत येत असतां कापडावरच इतका कटाक्ष कां, हें आतां सर्वांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. शिवाय, कापडावर कटाक्ष असण्याचें दुसरें एक कारण आहे. पूर्वीं हिंदुस्थानांतील कापड सर्व देशांतील लोकांस घ्यावें लागत असे. खुद्द इंग्रज लोकांस त्या वेळीं वस्त्रें वापरण्याची कल्पना सुद्धां नव्हती! कापड विणण्याची कला येथील लोकांस फार प्राचीन काळापासून साधली आहे, असें दिसतें. पांडवपत्नी द्रौपदी, हिची लज्जा रक्षण करतेवेळीं भक्तवत्सल परमात्मा श्रीकृष्ण यानें तिला निरनिराळ्या शहरचीं अमूल्य वस्त्रें नेसविलीं होतीं, असें पुराणांत वर्णन आहे. परंतु अभाविकांस हें खरें वाटणार नाहीं, सबब ही गोष्ट बाजूस ठेवून पेश-

वाईत घडलेली एक गोष्ट मी सांगतों. पुणें येथें पेशवाईचा पूर्ण अंमल असतां, निरनिराळ्या ठिकाणचे कारागीर आपलें कसब दाखवून इनामें घेऊन जात. एकदां एक कारागीर आंब्याच्या कोयीमध्यें सगळा धोतरजोडा घालून इनाम मिळविण्याच्या आशेनें पुण्यास आला. पुढें सर्वांनीं त्याच्या कसबाची प्रशंसा केली; परंतु भारी किंमत असल्यामुळें धोतरजोडा घेण्यास कोणी धजेना! शेवटीं हरिपंत फडके यांनीं पुण्याचें नांव ठेवण्यासाठींच तो विकत घेतला, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. फार लांब कशाला, नागपुरी धोतरजोड्यासारखे रेशमी कांठ व डाक्का येथील मलमलीसारखी मलमल हीं यंत्रकलानिपुण इंग्रज लोकांस अद्याप साधलीं नाहींत, ही गोष्ट सर्वांस ठाऊक आहेच. तात्पर्य, ही कला आम्हां हिंदुस्थानच्या लोकांस कधींपासूनच पूर्णपणें साधली आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, हाताची शक्ति यांत्रिक शक्तीपुढें अगदीं फिक्की पडल्यामुळें व तिला राजाश्रय आंवळ्यायेवढा व लोकाश्रय भोंपळ्यायेवढा मिळत असल्यामुळें ही कला थोड्याच दिवसांनीं नामशेष होणार असा सुमार दिसतो. हजारों कोष्ट्यांनीं आपले माग विकून इतर धंदे पत्करले! डाक्याची मलमल म्हटली म्हणजे हिंदुस्थानांतील कारागिरीच्या सर्वोत्कृष्टपणाची मूर्तिमंत प्रतिमा असा सर्व जगांत कीर्तिदुंदुभी वाजत आहे— अरे परमेश्वर, चुकलों! वाजत होता!!— तेथें आतां हातानें सूत काढून मलमल तयार करण्याचें काम एका घरींही चालत नाहीं. हाताचीं नखें वाढवून व त्यांस भोंकें पाडून बारीक सूत काढण्याला मेहनत फार पडते, व त्या मानानें किंमत येत नाहीं; म्हणून आतां तेथील लोक आयतें सूत विकत

घेऊन मलमल विणतात! डाक्काखेरीज येवलें, बऱ्हाणपूर, जालना, नागपूर, अमदावाद, काशी, मुर्शिदाबाद, काश्मीर वगैरे पुष्कळ ठिकाणीं अत्युत्तम कापड बनत असे, असें हल्लींच्या स्थितीवरून देखील अनुमान काढतां येतें. कापडावर कटाक्ष असण्याचें तिसरें कारण असें आहे कीं, हल्लीं या देशांत कापड निघत आहे. छत्र्या, आगपेट्या वगैरे जिनसा अल्प किंमतीच्या असून त्या येथें मुळींच तयार होत नाहींत. यामुळें त्यांवर आजच कटाक्ष ठेवल्यास आपणांस मोठी अडचण सोसावी लागेल. कापडाचें तसें नाहीं. या देशांत प्रथम गिरण्या स्थापन झाल्या तेव्हां त्यांमध्यें 'जाडाभरडा' माल निघत असे. तो दिसण्यांत चांगला नसे, तरी टिकाऊ असे. यामुळें तो गरीब लोक आनंदानें घेत. याप्रमाणें थोडेंसें उत्तेजन मिळाल्यामुळें आज त्याच गिरण्यांमध्यें साधारण बऱ्या प्रकारचें कापड निघूं लागलें आहे. आणखी उत्तेजन मिळाल्यास यापेक्षांही सुरेख कापड निघूं लागेल. उत्तेजन दिल्यावर काय होणार नाहीं बरें? मार्कांच्या रूपानें उत्तेजन दिल्यास लहान मुलें झटून अभ्यास करितात. स्कॉलरशिपच्या रूपानें उत्तेजन दिल्यास द्वीपांतरीं जाऊन विद्या मिळवितात! आगगाडी, आगबोट किंवा तारायंत्र या प्रकारचे चमत्कार उत्तेजनाखेरीज अस्तित्वांत आले नाहींत हें त्या त्या विषयांचे इतिहास वाचील त्यास कळून येईल. सन १८११ मध्यें हेन्री बेल नांवाच्या साहेबानें 'कामेट' नांवाची एक बोट बांधिली. हिचें एंजिन फक्त ४ घोड्यांच्या शक्तीइतकें असून तिचें सामर्थ्य २५ टन ओझें वाहण्याचें होतें. हल्लीं पी. ओ. कंपनीजवळ ७ हजार

टन ओझें वाहणाऱ्या बोटी पुष्कळ आहेत. कित्येक बोटी तर अगदीं राजवाड्याप्रमाणें तरत्या आहेत. असो, सांगावयाचें तात्पर्य काय कीं, उत्तेजन दिल्यावर वाटेल तें होतें. आतां कोणी म्हणेल कीं, परदेशी मालाप्रमाणें उत्तम माल येथें तयार होऊं लागला, म्हणजे आम्ही स्वदेशी माल विकत घेऊं. तोंपर्यंत परदेशी माल वापरला म्हणून काय झालें? याला उत्तर हेंच आहे कीं, उत्तेजनाखेरीज चांगला माल तयार होणें अशक्य आहे. आज विलायतेंत अत्युत्तम कापड निघत आहे, याचें कारण उत्तेजनाखेरीज दुसरें कांहींएक नाहीं. आपल्या देशाला सुस्थिति प्राप्त व्हावी, अशी इच्छा असलेल्या प्रत्येक इसमानें परदेशी कापड वापरण्याचें बंद केलें पाहिजे. परदेशी कापड बहिष्कृत करणें हें कायदेशीर असून पूर्ण फायदेशीर आहे. असें समजा कीं, एक भांडें पाण्यानें भरलेलें असून त्याला लहान मोठीं अनेक छिद्रें पडलीं आहेत. त्यांतून बहुतेक पाणी गळून गेलें आहे. थोडें राहिलें आहे तेंही गळत आहे. आतां तें शिल्लक रहावें अशी इच्छा असेल तर काय करावें बरें? छिद्रें बंद करण्याखेरीज दुसरा कांहींएक उपाय नाहीं. त्यांतही मोठीं प्रथम. म्हणून या उप्पर जर कोणास देशी मालाचा अभिमान उत्पन्न होणार नाहीं, तर आपल्या या आर्यभूमातेचें नष्टचर्य अद्याप बरेंच शिल्लक आहे, असें मी उघड म्हणूं शकेन. आपल्या कृतीचा एकंदर राष्ट्रावर काय परिणाम होतो, याचा सूक्ष्म रीतीनें विचार केल्यास परदेशांतील माल कितीही चांगला व स्वस्त मिळाला तरी घेऊं नये, असें तुम्हांस वाटेल हें मी खात्रीनें सांगतों; सबब आतां तरी तुम्ही स्वदेशी माल वाईट असला

तरी पुढील परिणामावर नजर देऊन त्याचा आदरपूर्वक स्वीकार कराल अशी मला आशा आहे. असो, आतां मूळ विषयाकडे वळूं.

प्राचीनकाळीं व्यापाराचा दुसरा नंबर लागला होता, हें खरें. तरी आज त्याचा पहिला नंबर आहे. इंग्लंड देश भरभराटीस आला आहे, याचें कारण तरी व्यापार हेंच होय. संपत्ति मिळविण्याला व्यापारासारखें सुलभ साधन दुसरें कोणतेंच नाहीं. आज आपल्या देशांत जेवढे वर्ग आहेत, त्यांमध्यें व्यापारी वर्गच काय तो बऱ्या स्थितींत आहे. मुंबईंत पेटीट, टाटाप्रभृति व्यापारी मंडळीनें गिरण्या स्थापून कापडाच्या रूपानें परदेशीं जाणाऱ्या संपत्तिप्रवाहास थोडा तरी प्रतिबंध केला, व चीन जपानकडे संधान ठेवून आगपेट्या, छत्र्या, मेणबत्या, फटाके, चांदी वगैरे कारणांनीं गेलेली संपत्ति थोडी बहुत परत आणिली, हे त्यांचे आपल्या देशावर मोठे उपकार आहेत. व्यापाराच्या साह्यानें मुंबईंत बरेच गृहस्थ आज लक्ष्मीपुत्र बनले आहेत. त्यांची संपत्ति पाहून राजेरजवाड्यांसही परम आश्चर्य वाटतें! मागें एकदां उत्तर हिंदुस्थानांतील एक बडे संस्थानिक सर दिनशाजी पेटिट यांचे घरीं गेले होते. तेव्हां तेथील सामान पाहून त्यांस मोठा अचंबा वाटला! सदरहू शेटजींच्या घरीं जाण्याचा मलाही एकदां प्रसंग आला होता. तेव्हां मला तर तें इंद्रभुवनच वाटलें! मि० टाटा, मुळजी जेठा, धरमसी मोरारजी वगैरे गृहस्थांचीं घरें सुद्धां पहाण्यालायक आहेत. मुंबईंतील श्रीमंत मंडळीस खिशांत ठेवूं शकतील असे व्यापारी इंग्लंड व अमेरिका येथें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कित्येक तर केवळ

स्वकष्टार्जित द्रव्यानें नुसते श्रीमंत नव्हे, तर कुबेर बनले आहेत ! त्यांची आवक दर मिनिटास मोजली तरी चालेल ! ! असे इसम सगळ्या जगांत १० आहेत. अमेरिकेंत ८ व इंग्लंडांत फक्त २. केरळकोकिळ मासिक पुस्तकांत त्यांचीं नांवें नंबरवार आलीं होतीं, तीं जशींच्या तशीं येथें देतों. ( १ ) डब्ल्यू. अस्टोर ४९ कोट रु०, ( २ ) जे० डी० राकेफ्लर २७ कोट रु०, ( ३ ) सी. व्हॉडरबिल्ट २४ कोट रु०, ( ४ ) डब्ल्यू. व्हॉडर बिल्ट २४ कोट रु०, ( ५ ) ड्यूक ऑफ् वेस्ट मिन्स्टर २४ कोट रु०, ( ६ ) जे. अस्टोर २१ कोट रु०, ( ७ ) एच्. फाग्लर १८ कोट रु०, ( ८ ) जे. ब्लेअर १५ कोट रु०, ( ९ ) एल्. स्टॅबलॉर्ड १५ कोट रु०, ( १० ) सी. बनिंगटन १५ कोट रु०. सदरहू गृहस्थांनीं संपत्ति कशी मिळविली त्याची हकीगत वाचली म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें. त्यांपैकीं नंबर १–५–६ यांनीं शेतीमध्यें व बाकीच्या ७ इसमांनीं व्यापारामध्यें संपत्ति मिळविली. लंडन शहरांत मि. रॉथचाइल्ड नांवाचे एक यहुदी गृहस्थ व्यापारांत फार श्रीमंत झाले आहेत. तसेंच कर्नल नॉर्थ या नांवाचा एक गृहस्थ १२ कोट रुपयांचा मालक आहे. ५० वर्षांपूर्वीं हा अत्यंत कंगाल स्थितींत अनवाणी हिंडत असे. यानें आरंभीं कोळसे विकण्याचें दुकान घातलें, व येवढी संपत्ति फक्त २० वर्षांत मिळविली ! याच्या खालोखाल श्रीमंत असे गृहस्थ जर्मनी, आफ्रिका, आस्ट्रेलिया, चीन वगैरे ठिकाणीं कांहीं आहेत. कॅलिफोर्नियामध्यें जे. गुड्स नांवाच्या एका मनुष्यानें आपली संपत्ति तिघां मुलांस वांटून दिली आहे. त्या प्रत्येकास ९ कोट रुपये आले ! येवढी

संपत्ति त्यानें स्वतः प्रामाणिकपणाचे जोरावर व्यापारांत मिळविली. याच्या तोडीचा असा एकही गृहस्थ या सुवर्णभूमींत हल्लीं नाहीं, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे बरें! आपल्या देशांतील कुबेर सर दिनशाजी पेटिट, मि० टाटा वगैरे गृहस्थ वर्षास जितके पैसे मिळवितात, त्यापेक्षां अधिक पैसे दरसाल धर्म करणारे गृहस्थ इतर देशांत आहेत. डयूक ऑफ् वेस्ट मिन्स्टर हे दरवर्षीं नाताळामध्यें १० लक्ष रुपये धर्म करितात. प्रसिद्ध "पीयर्स सोप कंपनी" दरसाल १८ लक्ष रुपये फक्त जाहिरातीमध्यें खर्च करते! यावरून या कंपनीचें उत्पन्न किती असेल याची कल्पना सहज करतां येईल. यावरून संपत्ति मिळविण्यास व्यापार हा रस्ता किती सुलभ आहे, हेंही कळून येतें. असा हा राजरस्ता असून तो सुशिक्षित मंडळीस दिसूं नये, हें लहान सहान आश्चर्य नव्हे. आमच्या देशांतील सुशिक्षित मंडळी व्यापारामध्यें इंग्रज लोकांची बरोबरी कधीं करतील तो सुदिन! आपल्या देशाला उन्नति प्राप्त व्हावी, अशी प्रत्येक सुशिक्षित मनुष्याची इच्छा असणें साहजिक आहे. उन्नतीची मातोश्री जी गरिबी ती आपणांस अनायासें अनुकूळ झाली आहे. उद्योग हा पितासुद्धां थोडाबहुत वश आहे. व्यापार हा बंधु मात्र अनुकूळ नाहीं! तो अनुकूळ झाला म्हणजे उन्नति प्राप्त झालीच ह्मणून समजा. इंग्रज लोकांचें अनुकरण करण्याचे कामीं सुशिक्षित मंडळी पूर्ण निष्णात असून त्यांस व्यापारामध्यें अनुकरण करण्याची पंचाईत कां पडते तें कळणें कठीण नाहीं. हल्लीं या देशांत व्यापारी शिक्षण स्वतंत्रपणें मिळण्याची सोय नाहीं, यामुळें आपलें अतोनात नुकसान होत आहे. या देशांतील व्यापार

सुशिक्षित नेटिवांच्या हातीं गेल्यास हिंदुस्थानची स्थिति हां हां म्हणतां बदलेल यांत संशय नाहीं. मागें वैश्य लोकांनीं व्यापार केला, त्यांस भूगोलाचें ज्ञान नव्हतें, व इतर शिक्षण-ही विशेष मिळालें नव्हतें, तरी इतर देशांतील संपत्ति त्यांचे पायाशीं चालून येत असे. याचें कारण हेंच कीं, त्या वेळीं हा देश ऐन भरभराटींत व इतर देश अगदीं अज्ञान स्थितींत होते. आतां तशी स्थिति राहिली नाहीं. ह्मणून आतां तेजीमंदीची तार आली तर ती वाचवि-ण्यासाठीं दारोदार फिरणारे, कोणतें शहर कोणत्या देशांत आहे, हें सुद्धां माहित नसणारे, अशा गृहस्थांच्या हातांत व्यापारनौका राहिल्यास निभाव कसा लागेल बरें ? लाग-णार नाहीं हें उघड आहे. येथपर्यंत केलेल्या विवेचना-वरून आमच्या सुशिक्षित मंडळीस व्यापार करण्याची उमेद येणें साहजिक आहे. सबब आतां व्यापार करण्याला कोणकोणते गुण जरूर पाहिजेत, त्याबद्दल विचार करूं.

निरालस्य, काटकसर, सचोटी, प्राविण्य, अब्रू व साहस इतक्या गुणांची अनुकूळता असली, तर व्यापारांत यश येण्याचा खात्रीनें संभव आहे. वर सांगितलेले सर्व गुण इंग्रज लोकांच्या अंगीं असल्यामुळें आज व्यापारामध्यें त्यांची बरोबरी कोणी करूं शकत नाहीं. यांपैकीं कांहीं गुण भाट्ये, वाणी वगैरे जातींच्या अंगीं आहेत. पार्शी जाती-मध्यें काटकसर नाहीं व मारवाडी लोकांत सचोटी नाहीं असें ह्मटलें तरी चालेल! ब्राह्मण जात व्यापार करण्यामध्यें निरुपयोगी म्हणावयास हरकत नाहीं. कारण, तिला बिन भांडवली धंदा—चाकरी—करून भाकरी मिळविण्याची चटक पुष्कळ दिवसांपासून लागली आहे. यामुळेंच ही

जात अद्यापि दरिद्री राहिली आहे. निरालस्य व काटकसर हे गुण मारवाडी लोकांच्या अंगीं उपजतांच येतात, असें ह्मटलें तरी चालेल. आपल्या लोकांमध्यें सचोटी फार कमी आहे. ती वाढल्याखेरीज आपल्या व्यापाराचें डोकें वर निघेल अशी आशा करावयास नकोच. युरोपियन व्यापाऱ्यांच्या सचोटीबद्दल माझे मित्र सेवकभाई ललुभाई, वसई येथील कापडाचे व्यापारी, यांनीं मला एक उदाहरण सांगितलें. तें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. "आपल्या देशांतील गिरणीवाले खराब माल चांगल्या मालांत बेलाशक मिसळतात, व युरोपियन गिरणीवाले अशा मालावर हिरवी चिठी लावितात. यामुळें विलायती माल खरेदी करतांना मन मुळींच कचरत नाहीं." युरोपियन व्यापाऱ्यांच्या सचोटीविषयीं आणखी पुष्कळ उदाहरणें देतां येतील. १६ व्या शतकांत या देशांत व्यापार करण्यासाठीं युरोपांतून पुष्कळ कंपन्या आल्या होत्या. परंतु शेवटीं सत्रा आणे चोख सचोटीचा आश्रय करणारी "ईस्ट इंडिया कंपनी" काय ती टिकली! एकदां सौदा केल्यावर-कितीही नुकसान झालें तरी देखील फिरावयाचें नाहीं, असा बाणा या कंपनीनें धरल्यामुळें हिच्यापुढें इतर कंपन्यांचें तेज पडलें नाहीं, यांत नवल कसलें? पूर्वीं गुजराथेंतून जवसाचें तेल विलायतेस फार जात असे. पुढें त्यांत लबाडी होऊं लागली; तेव्हां तिकडील व्यापारी तेलाऐवजीं जवसच मागवूं लागले! यामुळें तिकडील लोकांचा पुष्कळ फायदा झाला व इकडील तेली लोकांचा बराच तोटा झाला! हें ध्यानांत आणून तरी इकडील व्यापारी सचोटीचा आश्रय

करतील, तर आपला व्यापार पुष्कळ वाढेल. व्यापारी शिक्षण मिळण्याची तजवीज झाली ह्मणजे प्राविण्य संपादतां येईल. आतां अब्रू व साहस यांबद्दल विचार करूं. देवघेव चोख ठेविली ह्मणजे अब्रू वाढते. व अब्रू वाढली ह्मणजे भांडवलास मुळींच कमताई नाहीं. अब्रूदार सावकारांकडे कमी व्याज मिळतें, तरी तेथें पैसे ठेवण्यास पुष्कळ लोक कबूल होतात. लबाड सावकारांकडे भारी व्याज मिळण्याची लालूच असतां तेथें फारसे कोणी जात नाहींत, असा जगांतील अनुभव आहे. फार लांब कशाला, आपलें इंग्रज सरकार अगदीं कमी—दरसाल दर शेंकडा ३८ = व्याज देतें तरी त्याजपाशीं पुष्कळ लोक आपले पैसे खुशीनें ठेवितात! यावरून अब्रूदार मनुष्यास भांडवलाची कमताई नाहीं, हें उघड आहे. जगांत जेवढें भांडवल आहे, तें सर्व आपलेंच आहे, असें अब्रूदार मनुष्यानें पक्कें समजावें. युरोपियन लोक कोट्यावधि रुपयांचा व्यापार करितात, तो तरी परक्यांच्या पैशानेंच करितात! व्यांकेनें हात ओढून धरले म्हणजे त्यांचेसुद्धां बारा वाजतात! व्यापाराला अत्यंत जरूरीचा शेवटचा गुण जो साहस तो मात्र आपल्या लोकांच्या अंगीं फार कमी आहे. तो आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तो आल्यावर आपण त्यांची बरोबरी करूं शकूं. व्यापारांत जे कुबेर बनले आहेत ते सर्व साहसाच्या जोरावर बनले आहेत. " रायली ब्रदर्स " नांवाची एक जंगी व्यापारी कंपनी आहे. या कंपनीचा मूळ पुरुष रॉली हा ४० वर्षांपूर्वीं या देशांत आला. त्या वेळीं त्याजपाशीं कांहीं नव्हतें; म्हणून त्यानें पांचशें रुपये कर्ज काढून व्यापार

सुरू केला. आज या कंपनीजवळ १९ कोट रुपये रोख शिलक आहेत! शिवाय मोठमोठ्या शहरांतील सावकार लोकांस कर्जाऊ दिले असतील ते वेगळे ! ! साहसाशिवाय इतका पैसा मिळाला काय? नाहीं. आतां एखाद्या व्यापाऱ्यानें भीत भीत १६ हजार रुपयांचा माल खरेदी केला, व त्यावर दर रुपयास एक आणाप्रमाणें नफा घेऊन तो विकला; तेव्हां त्याला एक हजार रुपये मिळाले असें आपण समजूं. आतां दुसरा एक व्यापारी आहे, त्यानें एक लक्ष रुपयांचा माल खरेदी केला, व एक दिडकी नफा न घेतां मुद्दल किंमतीनें फुटकळ विकला; तेव्हां मुद्दल किंमतीनें दिल्यामुळें थोड्याच दिवसांत त्याचा सर्व माल खपला; व नुसत्या दलालीच्या नियमाप्रमाणें त्याला तीन हजार रुपये मिळाले ! भित्रेपणानें व्यापार करणारास वर्षांतीं एक हजार मिळाले, व साहसाच्या जोरावर व्यापार करणारास थोडक्याच दिवसांत तीन हजार रुपये मिळाले ! यावरून व्यापाराला साहस हा गुण किती उपयोगी आहे, तें कळून येईल. आतां अशा रीतीनें अफाट व्यापार चालू करण्यास जबरदस्त भांडवलाचा टेंका पाहिजे, हें उघड आहे. येवढें भांडवल एकट्याजवळ असण्याचा संभव नाहीं व असलें तरी तें घालून उपयोग नाहीं. एखाद्या गृहस्थापाशीं १०।२० लक्ष रुपये आहेत असें समजूं. ते देऊन त्यानें एक गिरणी अगर छापखाना विकत घेतला. पुढें दुर्दैवानें त्याला आग लागली, तर त्याची कंबर एकदम बसेल कीं नाहीं? त्याला एकट्याला तसा कारखाना पुनः कधीं काढतां येणार नाहीं. यासाठीं अफाट व्यापार चालविण्यास पातीनें भांडवल जमविणें

हाच उत्तम उपाय होय. युरोपियन लोक कंपनी काढून व्यापार चालवितात. त्यांची ही रीत आपण जरूर घेतली पाहिजे. कारखाना बुडाला अगर जळाला तर पातीनें जमविलेलें भांडवल बुडतें खरें, परंतु पुन: तसा कारखाना काढण्यास अडचण पडत नाहीं. रेलवे, गिरणी, खाण वगैरे प्रचंड कामें कंपनीखेरीज होणें शक्यच नाहीं. बी० बी० रेलवेचा नर्मदा नदीवरील पूल दोनदां वाहून गेला. सबब हल्लीं त्या कंपनीनें मोठा खर्च करून एक अजस्र पूल बांधला आहे! हीच रेलवे एकट्याची असती, तर त्याच्यानें असें साहस करवलें असतें काय? कधीं करवलें नसतें. आतां कोणी म्हणेल कीं, "निरालस्य, काटकसर वगैरे गुण व्यापाराला पाहिजेत हें खरें, व ते अंगीं येतीलही; परंतु सचोटी येणार नाहीं व तिचा उपयोगही नाहीं. मारवाडी पैसेवाले होतात, ते सचोटीनें कांहीं होत नाहींत. 'घीनो दोढ्यों अनें दोढ्यानूं घी' अथवा व्याज मोजतांना 'माघ, फागण ने शिमगा' किंवा हिशेब करतांना 'तीन चोक तेरा' अशा प्रकारच्या कांहींतरी लबाड्या केल्याखेरीज होत नाहींत" हें म्हणणें सर्वस्वी खरें आहे असें वाटत नाहीं. जरी एखाद्यास लबाड्या करून प्रसंगविशेषीं दोन पैसे मिळाले, तरी मागें सांगितलेल्या सत्यनिष्ठ व्यापाऱ्या येवढा पैसा त्यास कधीं मिळणार नाहीं. "सत्यमेव जयते" हें वाक्य सहसा खोटें होणार नाहीं. मग कलियुगाची हवा लागल्यामुळें खोटें झालें तर सांगवत नाहीं. असो, आतां कोणी असें म्हणेल कीं, वर सांगितलेले सर्व गुण अंगीं आणतां येतील. परंतु भांडवल नाहीं, तें आणावें कोठून? याला उत्तर हेंच

आहे कीं, आज आपला देश गरीब झाला आहे, तरी त्यांत भांडवल मुळींच नाहीं, असें नाहीं. थोडें बहुत आहे, तें बारावाट पसरलेलें आहे. श्रीमंत, अब्रूदार असे गृहस्थ बाहेर पडले तर तें एकत्र होईल यांत संशय नाहीं. मेसर्स टाटा, लखमीदास खिमजी, चतुर्भूज मुरारजी वगैरे गृहस्थांनीं एक स्वदेशी ब्यांक काढिली तर ती चालणार नाहीं काय? चालेल. पण आम्हांस कडेवर घेऊन चालविणारे आज आयते सांपडतात, तर मग आह्मी आपल्या पायांनीं काय म्हणून चालूं? असो, आपणांस इंग्रज लोकांची संगत लागून आज बरींच वर्षें झालीं, तरी सहकारी मंडळींचें महत्त्व अद्याप आपल्या लक्ष्यांत येऊं नये हें आश्चर्यजनक नव्हे काय? कित्येक अल्पसंतोषी लोकांस एकट्यानें व्यापार करणें बरें असें वाटतें. "भागाचें घोडें, किड्यांनीं मेलें" इत्यादी वाक्यें बोलून ते आपलें ह्मणणें खरें आहे असें भासवितात! परंतु व्यवस्थित कारभार असल्यावर तें किड्यांनीं कां मरावें हें कळत नाहीं. युरोपियन लोकांत व्यवस्था इतकी उत्तम असते कीं, ते एका ठिकाणीं मुख्य दुकान ठेवून, त्याच्या शाखा व उपशाखा इतर ठिकाणीं स्थापन करितात. इतका व्याप करितात तरी त्यांस संताप मुळींच होत नाहीं! इतका व्यवस्थितपणा आमच्या लोकांमध्यें कधीं दृष्टीस पडेल तो सुदिन समजला पाहिजे. व्यापार करण्याला कोणकोणते गुण पाहिजेत, याबद्दल येथपर्यंत विवेचन केलें. आतां एक दोन गोष्टींचा विचार करून हें प्रकरण संपवितों.

हल्लीं आपले देशांत व्यापार चालू आहे, त्यांत नेटिव लोकांचा हितसंबंध फारच कमी आहे. व्यापारांमधील

नफ्याचा बहुतेक अंश युरोपियन लोकांस मिळत असून नेटिव लोकांस मजूरी अथवा दुसऱ्या चांगल्या शब्दांनीं म्हणणें झाल्यास दलाली काय ती मिळते ! सुशिक्षित लोकांनीं व्यापारांत शिरतांना दुसरी एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. ती लक्ष्यांत न ठेविली तर आपलें मनस्वी नुकसान होईल. सुरतेचा माल पुण्यास व पुण्याचा माल सुरतेस पाठविणें, अशा प्रकारचा व्यापार करण्यापासून हिंदुस्थानचा कांहींतरी फायदा होईल काय ? अशा व्यापारापासून व्यक्तिमात्राचें नफानुकसान जें काय होईल तें ! यांत देशाचा किंचित्सुद्धां फायदा नाहीं. अशिक्षित मनुष्यास व्यक्तिमात्राचें नफानुकसान काय तें दिसतें. देशाच्या हिताहिताकडे त्याचें लक्ष्य मुळींच नसतें. सुशिक्षित मनुष्याचें तसें नाहीं. त्यास या दोहोंमधील भेद उत्तम प्रकारें कळतो. सबब देशाची संपत्ति जेणेंकरून वाढेल, अशा प्रकारचा व्यापार त्यांनीं करणें जरूर आहे. त्यांजवर देशसंबंधीं मोठी जबाबदारी आहे, हें त्यांनीं विसरूं नये. मेसर्स घोरपडे, शिंदे, निर्गुडे, गाइकवाड वगैरे शाईच्या कारखानदारांनीं शाईच्या रूपानें परदेशांत जाणाऱ्या संपत्तिप्रवाहास अटकाव केला ; मि० बुटी यांनीं कागदाची गिरणी व दातार कंपनीनें कुलपांचा कारखाना काढून स्वदेशाची सेवा केली ! पंडित कृष्णराय यांनीं कानपूर येथें चामड्याचा कारखाना व कृष्णशास्त्री पुराणिक यांनीं पनवेल येथें औषधी कारखाना काढून यथाशक्त्या स्वदेशहित केलें ! कै० धोंडु अण्णा दांडेकर यांनीं केळवें माहीम येथें व मनोहर कंपनीनें धुळें मालेगांव येथें चाकूकात्र्यांचा व बटणांचा कारखाना काढून

देशाचा बराच फायदा केला. याप्रमाणें कोणी कांहीं, कोणी कांहीं धंदे काढतील तर किती तरी मजा होईल बरें ? परमेश्वरकृपेनें आज आपणांस अत्युत्तम राज्यकर्ते सांपडले आहेत. त्यांनीं कोट्यावधि रुपये खर्च करून सुवेझचा कालवा खणला, व तो सर्वांस उपयोगीं पडावा म्हणून सदैव मोकळा ठेविला आहे. आतां इंग्लंडच्या हिताकडे नजर देऊन इंडिया सरकार हिंदुस्थानच्या हिताविषयीं कधीं कधीं अनास्था दाखवितें हें जरी खरें आहे, तरी एकंदरींत व्यापारामध्यें पुष्कळ स्वातंत्र्य येतें, यांत संशय नाहीं. येथील लोक जपानप्रमाणें फंड काढून व्यापारी लोकांस उत्तेजन देतील, तर या देशाचा व्यापार पुष्कळच वाढेल हें निर्विवाद आहे. उत्तेजन कसें द्यावें तें सांगतों. साबू अगर चाकूच्या कारखानदारास राष्ट्रीय फंडांतून मदत द्यावी, कीं जेणेंकरून तो मुद्दल किमतीनें माल विकूं शकेल! आरंभीं मुद्दल किमतीपेक्षांही कमी किमतीनें माल द्यावा. म्हणजे परदेशचा माल खपण्याचा बंद पडेल! असें करतांना आरंभीं फार त्रास होईल, पण पुढें त्याचें सुख मिळेल. व्यापारसंबंधीच बातम्या देणारें एक पत्र काढावें. त्यांत कोणीं कसलें जरी ‘ पेटंट ’ घेतलें, अगर कोठें प्रदर्शन भरविलें तर त्याची साद्यंत माहिती द्यावी. आपल्या देशांतील कसब परदेशांत गेलें तें तरी प्रदर्शनाखेरीज गेलें नाहीं. कारागीर लोक कीर्तीच्या व द्रव्याच्या आशेनें आपला ‘ कसबी ’ माल प्रदर्शनामध्यें पाठवितात. नंतर युरोपियन लोक भर किंमत देऊन तो विकत घेतात, व विलायतेस पाठवितात. तेथें त्याची नक्कल करतां आली तर ठीकच

आहे; नाहींतर ते मोठाले पगार देऊन इकडील कारागीर तिकडे नेतात. त्यांजपासून कसब शिकून तसले पदार्थ यंत्रावर बनूं लागले, म्हणजे अर्थात् ते स्वस्त किंमतीनें देण्यास परवडतात! व यामुळें इकडील धंदे बसत जातात. असो. व्यापार हा विषय फार गहन आहे. याचा पार लागावयाचा नाहीं. तरी यथाशक्ति, यथामति विवेचन केलें आहे. तें ध्यानांत आणून माझे स्वदेशबांधव व्यापार करण्याच्या हेतूनें कंबरा बांधतील तर या देशाचें 'सुवर्णभूमि' हें नांव खरोखर सार्थ होईल, इतकें सांगून हा विषय संपवितों. आतां विद्येसंबंधानें विचार करूं.

**विद्या.**—या सृष्टीमध्यें जितके प्राणी आहेत, त्या सर्वांत मनुष्यप्राणी श्रेष्ठ आहे. याचें मुख्य कारण ज्ञान हें होय. विद्या व ज्ञान या दोन्ही शब्दांचे धात्वर्थ एकच आहेत. मराठी चवथ्या पुस्तकांत 'विद्येची प्रशंसा' या सदराखालीं ज्या कविता दिल्या आहेत, त्या वाचल्या म्हणजे तिची योग्यता ताबडतोब लक्ष्यांत येते. विद्येची प्रशंसा सर्व भाषांत आढळते; परंतु गुजराथी भाषेमध्यें थोडक्यांत पण चटकदार असें तिचें वर्णन आहे. तें असें:—

**विद्या छे ते मोटो सार ।**
**नहीं उचकतां लागे भार ॥**
**नहीं तो चोर चोरी करे ।**
**नहीं तो भाग्यो भाग मागे ॥**

**अर्थ**—विद्या ही सर्वांत श्रेष्ठ असून उचलण्यास जड नाहीं. चोरास नेववत नाहीं व भागीदारासही घेववत

नाहीं. 'विद्याविहीनः पशुभिः समानः' असें संस्कृतांत ह्मटलें आहे. 'विद्या नाहीं ज्याला तो नर जीवंत असुनही मेला' असें एका मराठी कवीनें ह्मटलें आहे. पशुत्व जाऊन जिच्या योगानें मनुष्याला मनुष्यत्व येतें, तिची योग्यता मोठी नाहीं, असें ह्मणवेल काय? अशी तिची योग्यता आहे, ह्मणूनच विद्यादानासारखें दुसरें दान नाहीं असें ह्मणतात. कित्येकांनीं अन्नदानासारखें दुसरें दान नाहीं, असें वर्णन केलें आहे. अन्नांवांचून प्राण कासावीस झाले असतील, तर त्यास अन्नदान करणें ह्मणजे जीवदान देणें होय. अशा दृष्टीनें हल्लीं अन्नदान होत नाहीं, ही केवढी दुःखाची गोष्ट आहे बरें? हल्लींचें अन्नदान आळसाला उत्तेजन देत असून देशांत निरुद्योगी लोकांची संख्या वाढवीत आहे, असें मला वाटतें. पूर्वी अन्नछत्रें असत खरीं, परंतु त्यांत जेवण्यास क्वचित् कोणी जाई! आतां निगरगट्टपणा इतका वाढला आहे कीं, हात धरून घालविणें भागच पडतें! आमच्या दानशूरत्वाचा ओघ निराळ्या दिशेनें कधीं जाईल तो जावो. असो, ओघास आलें ह्मणून विषयांतर केलें, त्याबद्दल वाचकांची क्षमा मागून मूळ विषयाकडे वळतों.

विद्येमध्यें दोन भेद आहेत. एक ऐहिक व दुसरी पारमार्थिक. आमचे पूर्वज आपला बहुतेक वेळ पारमार्थिक विद्या मिळविण्याकडे खर्च करीत असत. यामुळें अलीकडील कित्येक मंडळीस ते अडाणी होते असें वाटतें; परंतु मला तसें वाटत नाहीं. क्षणिक सुख मिळविण्याचें सोडून चिरकाल सुख मिळविण्याचे नादीं लागले, येवढ्यावरूनच जर त्यांस अडाणी ह्मणावयाचें असेल तर एकदां सोडून

शंभरदां म्हणावें. गूढांत गूढ असें जें आत्मज्ञान, त्यासंबंधीं आमच्या पूर्वजांनीं जे शोध केले आहेत, ते पाहून मोठमोठे अर्वाचीन पंडित अगदीं थक्क होऊन गेले आहेत! सबब त्याविषयीं मौन धरून ऐहिक विद्येसंबंधानेंच दोन शब्द लिहितों. आपल्या देशांत फार प्राचीन काळापासून चतुर्वर्णव्यवस्था असल्यामुळें विद्या संपादन करण्याचें काम दश गुणांनीं युक्त अशा ब्राह्मणवर्गाकडे आलें. क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनीं त्यांचा परामर्ष घेण्याचें पत्करल्यामुळें त्याजकडून तें काम उत्तम प्रकारें शेवटास गेलें, हेंही यथायोग्य झालें. पूर्वीं काशी, पैठण, नाशिक वगैरे क्षेत्रांच्या ठिकाणीं विद्या शिकविण्याच्या मोठाल्या शाळा असत. तेथें दरसाल शेंकडो विद्यार्थी शिकत असत. पुढें यवनधर्मी लोकांकडून हिंदुधर्माच्या पवित्र पुस्तकांचा नाश होऊं लागला; त्यामुळें सर्व विद्या मुखोद्गत ठेवणें भाग पडूं लागलें. पुढें ती स्थिति जाऊन शांतता प्राप्त झाली, तरी घोकंपट्टी कमी न होतां उलट वाढूं लागली. हल्लीं तर तिला ऊतच आला आहे, असें म्हटलें तरी चालेल. असो, आतां श्रमविभागाचे दृष्टीनें बघितल्यास पूर्वीचे ब्राह्मण आप्पलपोटे कसे ठरतात तें मला समजत नाहीं. ज्ञानसंपादनाखेरीज दुसरें कांहीं काम पत्करलें असतें व तें दुसऱ्यास करूं दिलें नसतें म्हणजे देखील हल्लींच्या लोकांनीं त्यांस 'आप्पलपोटे' म्हटलें असतें! कोणी कसाही वागला तरी हंसणारास जागा सांपडतेच. फार बोलणारास भाट व कमी बोलणारास मुका, तसेंच पूजाअर्चा करणारास दांभिक व न करणारास धर्मभ्रष्ट असें विशेषण मिळत नाहीं काय?

मिळतें. त्याचप्रमाणें पूर्वींचे ब्राह्मण कसेही वागले असते तरी हल्लींच्या ब्रह्मद्वेषी मंडळीनें त्यांस बरें असें कधीं म्हटलें नसतें. असो, आतां इंग्रज सरकारच्या कृपेनें पाश्चिमात्य पद्धतीचें शिक्षण एकंदर जनसमूहास मिळण्याची तजवीज झाली आहे. हें शिक्षण या देशांत चालू करावें कीं न करावें, याविषयीं पूर्वीं मोठा वाद पडला होता. कित्येकांचे मतें पाश्चिमात्य पद्धतीचें शिक्षण हें वाघिणीचें दूध असल्यामुळें स्वार्थत्याग व देशाभिमान वगैरे उच्च मनोविकार त्या दुधानें पोसले जाऊन पुढें त्याचीं कटु फळें आपणांस चाखावीं लागतील, म्हणून प्राच्य पद्धतीचें शिक्षण या देशांत चालू करावें. या शिक्षणाच्या योगानें तशीं फळें चाखण्याचा प्रसंग स्वप्नांत सुद्धां येणार नाहीं. दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें अशा अर्थाचें होतें कीं, हा आर्यावर्त देश आहे. यामध्यें हजारों राज्यें होऊन गेलीं, त्याप्रमाणें आपलेंही कधीं तरी जाण्याचा संभव आहे; यांत संशय नाहीं. मग ज्या अमोलिक गुणांच्या योगानें आपणांस राज्य प्राप्त झालें आहे, त्या गुणांची जोड जर आपण यांस करून दिली, तर हे लोक आपले सदैव आभारी राहतील. येथील लोकांनीं ज्याला एकदां 'आपला' असें ह्मटलें, मग ते त्याच्याशीं प्राण गेला तरी दगा करणार नाहींत, असा यांच्यांत एक अमोलिक गुण आहे. त्यामुळें आपलें राज्य कांहीं ज्यास्तच दिवस टिकेल. याप्रमाणें दोन पक्षांचा वाद पडला होता. विलायतेस त्याची पुष्कळ भवति न भवति होऊन अखेर दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें विचारार्ह ठरलें, व त्याप्रमाणें अंमलबजावणी झाली. पाश्चिमात्य शिक्षण योग्य रीतीनें मिळावें, ह्मणून त्याचे प्राथमिक शिक्षण,

मध्यम शिक्षण, व उच्च शिक्षण असे तीन भाग करून खेडेगांवीं शाळा, जिल्ह्याचे ठिकाणीं हायस्कुलें व इलाख्याचे ठिकाणीं कॉलेजें स्थापन केलीं, व विलायतेहून चांगले विद्वान् पंतोजी मागवून शिक्षणसूत्रें त्यांच्या स्वाधीन केलीं. इतकें करण्यास खर्च बराच लागला, तेव्हां तो निघावा ह्मणून जमीन महसुलाबरोबर दर रुपयास एक आणा लोकलफंड घेतात, त्याचा ⅓ शाळाखात्याकडे घेऊं लागले. आरंभीं लोकांस विद्येची अभिरुचि कमी होती, त्यामुळें इनामांच्या लालचीनें मुलें शाळेंत जमवावीं लागत. पुढें थोडकेंसें शिकलेल्या मनुष्यास मोठमोठ्या हुद्यांचीं कामें मिळूं लागलीं; तेव्हां शाळेंत मुलांची संख्या वाढत चालली व खर्चही वाढत चालला. तो काढण्यासाठीं शाळेंत येणार मुलांवर फी बसविली! तरी पण खर्च भागेना, तेव्हां शेवटीं ती वाढविली. इतके सायास केले तरी सर्व सुधारलेल्या देशांत विद्येच्या संबंधानें आज आपला देश अगदीं खालीं आहे! ‘विचारसाधन’ पुस्तकांत या संबंधानें फार उपयुक्त माहिती दिली आहे. तीवरून कळतें कीं,...............................पौं० शि०

| | | |
|---|---|---|
| आस्ट्रेलियां० प्रत्येक विद्यार्थ्यास दरसाल खर्च | ९ | ८ होतो. |
| विलायतेंतील ,, ,, ,, | १ | १९ |
| रशियांतील ,, ,, ,, | ० | १७ |
| फ्रान्सांतील ,, ,, ,, | ० | १२ |
| हिंदुस्थानांतील ,, ,, ,, | ० | १—३ |

वर दिलेले आंकडे जुने आहेत; त्यांत हल्लीं थोडाबहुत फरक झाला असेल. तरी पण इतकें म्हणावयास हरकत नाहीं कीं, इतर सुधारलेल्या देशांच्या मानानें विद्या-

भ्यासासंबंधानें या देशांत फारच थोडा खर्च होत आहे. ज्या देशांत आईबाप आपल्या मुलांच्या विद्याभ्यासाविषयीं विशेष काळजी बाळगितात, त्या देशांत थोडा खर्च केल्यास एक-वेळ चालेल. परंतु निशाणी नांगर ही ज्यांची सही करण्याची पद्धत व मुलें घरीं मस्ती करितात म्हणून त्यांस शाळेंत पाठविणें जरूर आहे, अशी ज्यांची समजूत, अशा लोकांचाच भरणा ज्या देशांत फार आहे, त्या देशांत कमी खर्च करून कसा बरें निभाव लागेल? लागणार नाहीं, हें उघड आहे. असें असतां शिक्षणसंस्था सरकारानें आपल्या हातीं न ठेवितां लोकांच्या हातीं द्यावी, असें कित्येकांच्या तोंडचे उद्गार ऐकूं येतात! आजच्या स्थितीचा विचार केला तर असें होणें योग्य नाहीं, असें मला वाटतें. लहान मुलास चांगलें चालतां येऊं लागलें, म्हणजे त्याला पांगुळ गाडीची जरूर लागत नाहीं, हें सर्वांस माहीत आहेच. आज हिंदुस्थानांत शेंकडा १२ पेक्षां जास्त मुलें शाळेंत जात नाहींत! मिशनरी लोकांनीं कळपांत ओढण्याच्या सदिच्छेनें जागोजाग स्थापलेल्या शाळा व वाघिणीचें दूध पिऊन तर्र झालेल्या लोकांनीं काढलेल्या शाळा यांतील विद्यार्थ्यांची संख्या वजा केल्यास सरकारी शाळांतील विद्यार्थ्यांचें प्रमाण यापेक्षांही कमी पडेल! येवढा मोठा आर्यावर्त देश, व तो आज अज्ञानामध्यें घोरत पडला आहे!! परमेश्वरी लीला अगाध आहे, असें म्हटल्याखेरीज राहवत नाहीं. अशिक्षित देशबांधवांस सुशिक्षित करणें हें आपलें आद्यकर्तव्य आहे, असें समजून अंगांत हुशारी असून, पायांत रुपेरी बेडी न अडकवितां विद्याखात्यांत अगर खाजगी शाळेंत कमी पगार घेऊन राह-

ण्याचा ज्यांनीं निश्चय केला, त्यांच्या निर्लोभतेचें व धन्य-तेचें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे बरें? आर्यजन-नीचे खरे सुपुत्र तेच होत! असो, इतर देशाच्या मानानें या देशांत विद्याभ्यास कमी असण्याचें दुसरें एक कारण असें आहे कीं, इतर देशांत सक्ती आहे, तशी येथें नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंद, जर्मनी, आस्त्रिया, इताली या देशांत सक्ती असून गरीब मुलांस फुकट शिकवितात. बेल्जममध्यें सक्ती नाहीं, तरी तेथें गरीब मुलांस फुकट शिकवितात. हिंदुस्थानांत सक्ती नाहीं व गरीब मुलांस शेंकडा फक्त १५ पर्यंत फुकट शिकवितात! प्राथमिक शिक्ष-णामध्यें मात्र मागसलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांस हें प्रमाण लागू करूं नये असें अलीकडे ठरलें असावें, असें वाटतें. हल्लीं गरीब विद्यार्थ्यांस प्राथमिक शिक्षणाबद्दल फी पडत नाहीं. असो, अशी स्थिति असल्यावर विद्येमध्यें हा देश मागें राहिला तर नवल कसलें? बरें, सर्व लोकांस विद्या शिकण्याची इच्छा नाहीं, असें नाहीं. आज गांवोगांव उनाड पोरें रस्त्यांतून खेळतांना थोडीं दृष्टीस पडतात काय? वरिष्ठ शिक्षणाच्या महर्गतेमुळें अभ्यासक्रम सोडून थोड्या मुलांनीं इतर धंदे पत्करले काय? या देशांत इंग्रजी शिकविण्याची सुरुवात झाली, तेव्हां थोडेसें शिकलेल्या इसमांस भराभर चाकऱ्या मिळूं लागल्या; यामुळें जो तो इंग्रजी शिकूं लागला. आरंभीं वकील थोडे, डाक्तर थोडे, मास्तर थोडे, यामुळें सर्वांची मजा झाली होती. परंतु अलीकडे एकाच प्रकारचें शिक्षण मिळालेली मंडळी पुष्कळ झाल्या-मुळें व त्यांस स्वतंत्र उद्योग करून पोट भरण्याचें साधन नसल्यामुळें त्यांची पुढें कशी काय अवस्था होईल तें मला

कळत नाहीं. चाकऱ्या थोड्या व त्या करणारे फार, यामुळें पैशास पांसरी चाकर मिळूं लागले! ह्मणून हाडांचीं काडें व रक्ताचें पाणी करून म्याट्रिकपर्यंत अभ्यास करून शेवटीं १०।१२ रुपयांवर राहण्याचा प्रसंग येऊं लागला! आपल्या या मुंबई इलाख्यांत विद्या शिकविण्याची सुरुवात अलीकडे झाली आहे, ह्मणून अद्यापि पदवीधर मंडळीचा सुळसुळाट झालेला नाहीं. पण बंगाल व मद्रास इलाख्यांत अगदीं कमाल झाली आहे. बंगाल इलाखा सधन असल्यामुळें तिकडील स्थिति कांहींशी बरी आहे. पण मद्रास इलाख्याची स्थिति अशी नाहीं; इतकेंच नव्हे, तर अगदीं वाईट झाली आहे. तिकडे म्याट्रिक झालेले इसम दरमहा ७।८ रुपये पगारावर पुष्कळ सांपडतात! मागें मीं एका पत्रांत असें वाचलें होतें कीं, तेथील हुजूर डेप्युटी कलेक्टरच्या आफिसांत एका बी. ए. पदवीधरानें पट्टेवाल्याची चाकरी धरिली!! शिव! शिव! काय ही स्थिति! ही ऐकलेली गोष्ट कोणास खरी वाटणार नाहीं, ह्मणून प्रत्यक्ष पाहिलेली सांगतों. उंबरगांव येथील माझे मित्र रा० केशवराव कारुळकर हे मुंबई येथें शिकावयास राहिले असतां त्यांस एके दिवशीं एक मद्रासी मनुष्य जीर्णवस्त्रें परिधान केलेल्या स्थितींत आढळला. त्यानें त्यांजपाशीं दीन वदनानें खाणावळीसाठीं चार आणे मागितले; ते इंग्रजींत बोलून मागितले, ह्मणून रा० कारुळकर यांनीं त्याची विचारपूस केली. तेव्हां तो बी. ए. पास झालेला गृहस्थ आहे, असें त्यांस कळलें. नंतर त्यांणीं त्यास आपल्यासाठीं शिक्षक ठेविलें. सांगावयाचें तात्पर्य काय कीं, मद्रास इलाख्यांत फार वाईट स्थिति झाली आहे. अशी स्थिति आणखी

कांहीं वर्षांनीं या इलाख्यांत देखील दृष्टीस पडेल. याचा आमच्या पुढाऱ्यांनीं व दयाळू मायबाप सरकारानें विचार करणें जरूर आहे. यावरून उच्च शिक्षणाचा मी शत्रु आहें, असें मात्र कोणीं समजूं नये. हें शिक्षण या देशांत चालू केलें नसतें तर न्यायमूर्ती रानडे, बद्रुद्दीन, कै० रोमेशचंद्र मित्र, कै० मुथुस्वामी आयरसारखीं विद्वद्रत्नें, रा० टिळक, कै० आगरकर, आपटे व रा० परांजपे यांसारखे स्वार्थत्यागी, बानर्जीद्वय, मेथा, गोखले, चंदावरकर व मालवीसारखे वक्ते, दादाभाई व राजा रामपाल सिंह व कै० पंडित अयोध्यानाथसारखे देशाभिमानी, रोमेशचंद्रदत्त व डा० देशमुख सारखे निरपृही, कै० मंडलिकासारखे व्यवस्थित, कै० विष्णूशास्त्री चिपळूणकरासारखे कलम बहाद्दर, डा० खेर माजी डा० बहादूरजी व डा० देसाई सारखे परोपकारी, डा० काणे, भाटवडेकर यांच्यासारखे सालस, व प्रो० जिनसीवाले, स्वामी विवेकानंदसारखे धर्माभिमानी गृहस्थ आपल्या दृष्टीस पडले असते काय? भिन्न भिन्न धर्मांचे, जातींचे व दर्जाचे लोक एकत्र जमून उच्च नीच भाव विसरून जाऊन कांग्रेसमध्यें सुखदुःखाच्या गोष्टी सांगत बसतात, हा इंग्रजी विद्येचा प्रभाव नव्हे काय? पदवीधर मंडळी कांग्रेसमध्यें स्वयंसेवक बनून हमालाप्रमाणें राबतात, व मद्रासकरांच्या आंगठ्याला ठेंच लागली तर पंजाबवाल्यांच्या डोळ्यांतून आंसवें गळतात, हा कोणत्या विद्येचा प्रभाव बरें? पाश्चिमात्य शिक्षणरूपी अंजन मिळाल्यामुळें आमच्या नेत्रावरील सारा साफ नाहींसा झाला व त्यामुळें आमची स्थिति आह्मांस धुतलेल्या तांदुळांप्रमाणें स्वच्छ दिसूं लागली! तेव्हां सांगावयाचें तात्पर्य काय कीं, या शिक्षणापासून

आपला पुष्कळ फायदा झाला आहे, होत आहे व होईल. परंतु सर्वच याच्या मार्गे लागले, तर 'अति तेथें माती' या न्यायानें फायद्या ऐवजीं आपलें फार नुकसान होईल. रोग्यापेक्षां डाक्तर फार किंवा फिर्यादीपेक्षां वकील फार झाले, तर त्या डाक्तरांची किंवा त्या वकिलांची स्थिति कशी काय होईल, याची कल्पना करण्याचें काम मी वाचकांवरच टाकतों. ईश्वरानें ज्यास सामर्थ्य दिलें आहे, त्यानें हें शिक्षण अवश्य मिळवावें. गरीबगुरिबांनीं थोडेंसें शिकून नंतर एखाद्या उपयुक्त धंद्याचें ज्ञान मिळवावें, तेणें-करून त्यांचें व एकंदर देशाचें पुष्कळ हित होईल असें मला वाटतें. विद्या शिकावयाची ती पैशाकरितां नव्हे, असें पुष्कळ विद्वानांचें म्हणणें आहे, व तें खरें आहे. परंतु आपला देश कंगाल असल्यामुळें आपणांस हा नियम लागू नाहीं. मागें एकदां कॉटन साहेब असें म्हणाले होते कीं, खर्डे घांसण्याचे कामावर दरमहा १० रुपये पगार दिला तर १०० इसम सांपडतात व फिटरसारखें साधें यंत्रकाम जाणणारा चौपट पगार दिला तरी एखादा इसम सांपडल्यास सांपडतो! तेव्हां असलें पोपटपंची शिक्षण आपल्या देशांतील गरीब लोकांच्या मुळींच उपयोगी नाहीं. दूध जसें धडधाकट्या मनुष्यांचे उपयोगी असून नवज्वर असलेल्या मनुष्यांस फायदेशीर नाहीं, तसें हें उच्च शिक्षण श्रीमंत मनुष्यांस उपयोगी असून गरीब मनुष्यांस फायदेशीर नाहीं. वसईजवळ पापडी म्हणून एक गांव आहे. तेथील एका मुलानें आपल्या बापाची १० हजार रुपये किंमतीची मालमिळकत विकून अभ्यास केला, व बी. ए. ची परीक्षा दिली. आज

त्यास ४० रुपये पगार मिळत आहे. आतां तो १० हजार रुपये मिळविणार कधीं व देशहित करणार कधीं ? ह्मणून माझें मत असें आहे कीं, सर्वांनीं या शिक्षणाकडे लक्ष्य देऊन उपयोग नाहीं. विद्या कमी असतांना जर अशी स्थिति, तर मग सगळें राष्ट्रच्या राष्ट्र विद्वान् झाल्यावर काय परिणाम होईल ? रानांतील सुवासिक फुलांस कोणी भोक्ता न मिळाल्यामुळें तीं जशीं जागच्या जागीं कोमेजून गळतात, अथवा तोंडलीच्या मांडवावर अतोनात तोंडलीं लागलीं ह्मणजे त्यांतील कांहीं उपयोगीं पडतात, बाकीचीं जागच्या जागीं पिकून सडतात, त्या प्रमाणें विद्वान् पुष्कळ झाले ह्मणजे त्यांची अशी गत झाल्यास नवल कसलें ? कालिदास, भवभूति, बाण, दंडी, माघ, शेक्सपियर, मिल्टन इत्यादि कवींचीं काव्यें व नाटकें उत्तम आहेत खरीं, पण तीं आपणांस समजलीं, ह्मणजे आपण कृतार्थ झालों काय ? मग आपणांस माध्यान्हाची काळजी करावयास नको काय ? अन्न हा शरीराचा खुराक, तशी विद्या हा मनाचा खुराक आहे, हें कांहीं खोटें नव्हे. पण आधीं पोटोबा, मग विठोबा ही ह्मणही खोटी नव्हे, हें लक्ष्यांत ठेवावें. एखाद्या देशांत कठीण काव्यें समजणारे विद्वान् पुष्कळ आहेत, व साधारण मोडतोड दुरुस्त करणारा कारागीर एकही नाहीं, तर त्या देशाची स्थिति कशी होईल बरें ? स्टिफन्स, वाट्स सारख्या कल्पक लोकांनीं वाफेच्या अद्भुत शक्तीचा शोध लाविला नसता, तर नुसत्या शेक्सपियर किंवा मिल्टन सारख्यांच्या हातून इंग्लंडचें कितीसें कल्याण झालें असतें बरें ? कविकुलमुगुटमणि कालीदास या देशांत जन्मला परंतु स्टिफन्स सारखा कल्पक कोणी जन्मला नाहीं यामुळें

आपली काय स्थिति झाली ती पहा. तेव्हां सांगावयाचें तात्पर्य काय कीं, मनुष्याच्या सुखाची वृद्धि जेणेंकरून होईल, अशी विद्या प्रत्येकास आली पाहिजे. हिचेंच नांव खरी विद्या! सुधारलेल्या देशांत निरनिराळ्या धंद्यांच्या शाळा घातलेल्या आहेत. त्यांत नुसतीं व्याख्यानेंच देत नसून तीं कामें कशीं करावीं, हें हातांनीं सप्रयोग करण्यास शिकवितात! फ्रान्स देशांत फळें कशीं तयार करावीं व तीं पुष्कळ दिवस कशीं टिकवावीं, हें शिकविण्याच्याच १६ शाळा आहेत! फार काय सांगावें, पाश्चिमात्य देशांत तरुण मुलींस जाणून बुजून अनाथ पोरांची जतन कशी करावी, हें सुद्धां शाळेमध्यें शिकवितात! तात्पर्य काय कीं, प्रत्येक काम नीट पद्धतशीर करतां यावें अशाबद्दल तिकडे फारच काळजी घेण्यांत येते. कलाकौशल्याचे शाळांमधून सर्व प्रकारच्या कलांचें शिक्षण दिलें जातें. यामुळें तिकडे नेहमीं अनेक प्रकारचे शोध होत आहेत. कागदाच्या विटा व पायमोजे बनूं लागले, बंदुकीच्या गोळ्यांनीं फुटूं नये असें चिलखत देखील बनलें! एकानें गुणाकार भागाकार करण्याचें यंत्र बनविलें आहे! अमेरिकेंतील प्रसिद्ध शोधक मि० एडिसन यांनीं आजपर्यंत तऱ्हेतऱ्हेचे शोध लावून लोकांस आश्चर्यचकित करून टाकलें आहे. अशा प्रकारचे काल्पनिक लोक आपले देशांत नाहींत, असें म्हणतां येत नाहीं. कै० ठाकूर, दाते, वैद्य हे सामान्य बुद्धीचे लोक होते काय? प्रो० भिसे व रा० गोविंद रावजी केळकर व वसई येथील रा० मराठे यांची अक्कल अचाट नाहीं, असें कोण ह्मणेल? सदर गृहस्थांस यंत्रकलेचें शिक्षण असतें, तर हे कांहींतरी शोध केल्याखेरीज राहते

काय ? अलीकडे धंदेशिक्षणाकडे पुष्कळांचें लक्ष्य गेलें आहे, ही एक आनंदाचीच गोष्ट समजली पाहिजे. हल्लीं प्रत्येक इलाख्यांत धंदेशिक्षणाची एकेक शाळा आहे. बडोदें येथें कलाभवन स्थापलें आहे. इतक्या तजविजी झाल्या आहेत, तरी त्यामध्यें विलायत किंवा अमेरिका येथील शिक्षणाप्रमाणें शिक्षण मिळत नाहीं अशी ओरड ऐकूं येते! आतां मि० टाटा यांनीं ३० लक्ष रुपयांची देणगी देऊन ही उणीव भरून काढण्याचें मनावर घेतलें आहे. त्याचा परिणाम कसा काय होतो तें पाहिलें पाहिजे. बाकी येवढें खरें कीं, आज शाळाखातें स्थापन होऊन बरींच वर्षें झालीं, तरी यांत्रिकशिक्षण देण्यासाठीं सरकारानें विशेष खटपट केली आहे, असें दिसत नाहीं. शेक्सपियर, मिल्टन यांचीं काव्यें व बेकनसारख्यांचे निबंध शिकविण्यासाठीं प्रो० वर्डस्वर्थसारखे विद्वान् गृहस्थ मोठाले पगार देऊन आणले; परंतु, साबू, मेणबत्या, घड्याळें वगैरे जिनसा तयार कशा कराव्या, हें शिकविण्यासाठीं थोडासा पगार देऊन साधारण मनुष्यसुद्धां आणला नाहीं! यावरून कोणाचे मनांत शंका उत्पन्न झाल्यास नवल काय? सरहद्दीसारखे बिकट प्रश्न मायबाप सरकारास त्रास न देते, तर मला वाटतें कीं, आपल्या दयाळू सरकारानें युरोपांतील पद्धतीप्रमाणें यंत्रकलेचें शिक्षण या देशांतसुद्धां चालूं केलें असतें. सरहद्दीच्या बंदोबस्तासाठीं व अमीरास खूष करण्यासाठीं सरकार जितके पैसे खर्च करीत आहे, त्याच्या निम्मे पैसे जरी प्रजेच्या अत्यंत जरूरीच्या अडचणी नाहींशा करण्यामध्यें खर्च करील, तरी सरकारचा उद्देश उत्तम प्रकारें शेवटास जाईल, हें मी खात्रीनें सांगतों. या देशाची प्रजा कृतघ्न

नाहीं, हें सरकारानें पक्कें लक्ष्यांत ठेवावें. असो, सरकारला उत्पन्न आहे त्या खात्याशीं शाळाखात्याची तुलना केल्यास तें नावडतीच्या पोराप्रमाणें गरीब दिसतें. शहरांत हायस्कुलें वगैरे असल्यामुळें तसें वाटत नाहीं. परंतु खेडेगांवीं १०।१० रुपयांचे पंतोजी असतात व शाळा एखाद्या भिकार झोंपड्यांत असते! यामुळें तसें वाटल्यास नवल कसलें? या खात्यापेक्षां कमी पगार दुसऱ्या कोणत्याही खात्यांत नाहीं. ज्यांस दुसरा धंदा करून दरमहा ७ पेक्षां जास्त कमाई करण्याची अक्कल नाहीं, अशांच्या हातीं आमचे भावी ग्ल्याडस्टन व मोर्लें पडतात! या खात्यापासून सरकारास कांहीं प्राप्ति नाहीं, म्हणून त्याचे हाल होत आहेत, असें पुष्कळांचें मत आहे. सरकार या गोष्टीचा विचार करील अशी आशा आहे. असो, आतां हिंदुस्थानांत ज्ञानरवीचा अस्त होऊन युरोपांत उदय झाला आहे, व तो हल्लीं अमेरिकेंत मध्यस्थानीं आला आहे. यामुळें तिकडे कलाकौशल्याची परमावधी झाली आहे. एकदां जर्मनीच्या बादशाहास लोखंडाच्या बारीक सुयांस भोंकें कशीं पाडतात, याचें मोठें आश्चर्य वाटलें; तेव्हां तेथील एका कारखान्यांतील म्यानेजरानें त्यांच्या दाढींतील एक केंस मागून घेऊन त्यास भोंक पाडून तें बादशाहास दाखविलें! तें नुसत्या डोळ्यांनीं दिसेना, तेव्हां त्यांनीं सूक्ष्मदर्शक यंत्राचा उपयोग केला. तें पाहून बादशहास पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें, हें सांगणें नकोच. ही गोष्ट ऐकून तुम्ही सुद्धां विस्मित व दुःखी व्हाल; परंतु तसें दुःखी होण्याचें कारण नाहीं. रहाटगाडगें व भरतीओहटी हीं जीं सृष्टिनियमाचीं ठळक उदाहरणें दृष्टीस पडतात, यांकडे

बघितलें तर येथें पुनः कधीं तरी ज्ञानरवीचा उदय होईल हें उघड आहे. परंतु तो कधीं उदय पावेल याचा नियम नसल्यामुळें आपण आंग्लनृपतीच्या साह्यानें उद्योगरूपी तपश्चर्या करून तो येथें लवकर उदय पावेल असें करूं या.

आतां उद्योगरूपी तपश्चर्या कशी करावी तें सांगतों. आपण एक राष्ट्रीयफंड काढून त्याच्या व्याजांतून कांहीं पगारी विद्यार्थी युरोप, अमेरिका वगैरे ठिकाणीं कलाकौशल्याचें शिक्षण मिळविण्यासाठीं पाठवावे, व सरकारांतून कांहीं स्कालरशिपा मिळतील अशी तजवीज करावी. तिकडे गेल्यावर हें शिक्षण मिळवितांना पुष्कळ त्रास, नुकसान व अपमान होईल, तो सर्व राष्ट्रहितासाठीं निमुटपणें सहन केला पाहिजे. पाश्चिमात्य देशांतील लोकांस देखील हें शिक्षण अनायासें मिळालें नाहीं, हें आपण ध्यानांत ठेवावें. 'कष्टीं फळ व तपीं राज्य' ही ह्मण जुनी आहे, पण अर्थबोधावह आहे. आपल्या देशांतून विद्याभ्यास करण्यासाठीं विलायतेस आजपर्यंत श्रीमंत लोकांचीं पुष्कळ मुलें गेलीं; परंतु त्यांपैकीं फारच थोडीं मुलें आर्यजननीच्या उद्धारास्तव मेहनत करण्यास समर्थ झालीं; बाकी बहुतेक मुलें पंचशरानें पीडित होऊन आंग्लतनयांच्या प्रीतिरूप होमाला आहुतिस्थानीं उपयोगीं पडलीं! आजपर्यंत आपल्या देशांतून जीं मुलें बाहेरदेशीं शिकण्यास गेलीं, तीं बहुतेक बारिस्टर, डाक्तर, इंजिनियर व सी. एस्. च्या परीक्षा देण्यासाठीं गेलीं होतीं; श्रीमंत गायकवाड सरकार यांनीं मात्र कांहीं मुलें धंदेशिक्षण मिळविण्यास्तव परदेशीं पाठविलीं होतीं; त्यांपैकीं मि० लुहार हेच एकटे विजयी होऊन आले. आतां विलायतेस धंदे-

शिक्षण मिळविण्यासाठीं पुष्कळ विद्यार्थी गेल्यास कांहीं फायदा होईल किंवा नाहीं याबद्दल कित्येकांस संशय वाटतो, सबब त्याबद्दल विचार करितों.

इंग्रज लोक गुह्यज्ञान कोणास देत नाहींत, व उत्तम कौशल्य कोणास दाखवीत नाहींत, असें कित्येक ह्मणतात. हें ह्मणणें अगदींच खोटें आहे, असें ह्मणवत नाहीं; तसें खरेंही मानतां येत नाहीं. तिकडून उत्तम प्रकारचें कसब शिकून इकडे आजपर्यंत कोणी आले नाहींत, येवढा पुरावा पहिल्या गोष्टीला पुरेसा आहे. कानपूर येथील सरकारी चामड्याच्या कारखान्यावरील म्यानेजर मि० स्टुअर्ट यांनीं दोघां बंगाली बाबूंस हें कसब खुशीनें शिकविलें होतें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. या बाबूंची गोष्ट चमत्कारिक असल्यामुळें मी ती येथें मुद्दाम देतों. पंडित कृष्णराय व त्यांचे बंधु हे आंग्लविद्याविभूषित असून चांगल्या महत्त्वाच्या जागीं नौकर होते. पगार चांगला असून हातीं अधिकार मोठा होता; तरी पण त्यांचे जीवास समाधान बिलकुल नव्हतें. आपला देश रात्रंदिवस धुपून जात आहे, याला काय उपाय करावा, याखेरीज त्यांस दुसरी कांहींएक काळजी नव्हती! नौकरी आहे तोंपर्यंत आपण आपल्या कुटुंबाचें पोषण उत्तम प्रकारें करूं, व नंतरही करूं शकूं. आपल्या कुटुंबाचें पोषण करणें हा कांहीं पुरुषार्थ नव्हे! आपण विद्वान् असल्यामुळें अनेक कुटुंबांचें पोषण करून त्यांतल्या त्यांत थोडेंसें स्वदेशहित केल्यास आपल्या विद्वत्तेचें चीज होईल, असें त्यांस वाटलें! ह्मणून त्यांनीं एखादा स्वतंत्र धंदा काढून पश्चिमेकडे जात असलेल्या संपत्तिप्रवाहाला थोडाबहुत अडथळा करून पहावा अशा

हेतूनें, हुद्यांच्या चाकऱ्या सोडून इतर कसब कोणीही शिकेल, चांभाराचें कसब कोणी शिकणार नाहीं, असें समजूनच कीं काय, तें शिकण्याचा निश्चय केला ! कानपूर येथील सरकारी कारखान्यांत चांभाराखेरीज दुसऱ्या कोणास घेत नाहींत, असें समजल्यावरून त्यांनीं चांभाराचा वेषही धारण केला ! दिवाण, जज्जासारखे अधिकार हातीं असल्यामुळें "खाना, पीना और मजा मारना" हेच विचार ज्यांच्या अंतःकरणांत नेहमी वास करणार, त्यांनीं दोन आण्यांचें फटकूर नेसण्यास सिद्ध व्हावें हा लहान चमत्कार काय? देशहिताची कळकळ ह्मणतात ती ही ! देशाभिमानाची ज्योत ज्यांच्या अंतःकरणांत पेटलेली असेल त्यांच्या खेरीज अशी कृति कोण करूं शकेल? असो. कारखान्यांत गेल्यावर त्यांस म्यानिजर यांनीं कामाशिकाऊ लोकांच्या यादींत घातलें. यांस कारागीर सांगतील तीं मजुरीचीं कामें करावीं लागत. तरी पण काम करण्यापेक्षां पहाण्याकडे यांचें लक्ष्य विशेष होतें, ही गोष्ट स्टुअर्ट साहेबांच्या लक्ष्यांत ताबडतोब आली. आजपर्यंत पुष्कळ मुलें कारखान्यांत आलीं, परंतु यांच्यासारखीं चौकस बुद्धीचीं व पाणीदार अशीं कोणींच नव्हतीं, म्हणून साहेबांस संशय आला. तेव्हां संशयनिवृत्ति व्हावी, म्हणून त्यांनीं त्यांस जवळ बोलावून सर्व हकीगत विचारली; तेव्हां बाबूंनीं पण सत्यापाशीं परमेश्वर समजून इत्थंभूत वर्तमान सांगितलें! मग म्यानेजरांस त्यांच्या स्वदेशप्रीतीचें परम आश्चर्य वाटून त्यांनीं त्यांचा बहुमान केला, व सरकारांत योग्य शिफारस करून काम शिकविण्याची परवानगी आणविली; सरकारानेंही उदार मनानें व मोठ्या आनंदानें परवानगी दिली! सदरील उदाहरणावरून आपलें

मायबाप सरकार व कित्येक युरोपियन लोक उदार मनाचे आहेत, ही गोष्ट सिद्ध झाली, असें मला वाटतें. आज त्या बाबूंनीं त्या साहेबांच्या नांवानें चामडें कमविण्याचा एक कारखाना काढला आहे; त्यांत तऱ्हेतऱ्हेचें चामड्याचें सामान तयार करण्यांत येत आहे. दोन रुपयांचें कातडें विकत घेऊन त्याचे जोडे, बूट, जीनें, वगैरे पदार्थ बनविल्यास किती तरी फायदा होईल. तेव्हां तऱ्हेतऱ्हेचें कसब शिकण्यासाठीं इतर देशांत आपण आपलीं मुलें पाठविल्यास आपला फार फायदा होईल, हें उघड आहे. मग आपण आपलीं मुलें तिकडे पाठवीत नाहीं, हा आपलाच अपराध नव्हे काय? युरोपियन लोकांनीं कसब नच शिकविलें, तर अमेरिकेंत जावें. के० गुरुजी हे रंग देण्याचें काम अमेरिकेंतूनच शिकून आले; त्यांनीं पुणें येथें एक रंगशाळा काढली होती; परंतु आमच्या दुर्दैवानें ती टिकली नाहीं. रा० गोविंद भिकाजी आठवले हे चाकू कातरी वगैरे करण्याचें कसब शिकून आले. यांच्या मदतीनें के० धोंडू अण्णा दांडेकर यांनीं एक कारखाना काढला होता. तो हल्लीं केळवें माहीम येथें सुरेख चालला आहे. हा कारखाना मीं स्वतः जाऊन पाहिला, त्यावेळीं रा० आठवले यांनीं स्वतःबद्दलची हकीगत सांगितली, ती ऐकून त्यांच्या दीर्घोद्योगाबद्दल मला पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. धोंडू अण्णांच्या मृत्यूमुळें माहीम व डाहाणू तालुक्यांचें अपरिहार्य नुकसान झालें आहे! असो, आतां दयाघन परमेश्वराच्या कृपेमुळें आपणांस कसब मिळविण्यासाठीं विलायत, अमेरिका येथेंही जाण्याचें कारण राहिलें नाहीं. कारण, हल्लीं जपानदेश कलाकौशल्यामध्यें बराच

पुढें सरसावला आहे. तिकडे जाण्यास विशेष खर्च लागत नाहीं व शिकण्याचा खर्च देखील महिना ९०।६० पेक्षां जास्त होत नाहीं. तेथील लोक सर्व तऱ्हेचें कसब शिकविण्यास मनापासून तयार आहेत, हें केसरीमध्यें प्रसिद्ध झालेंच आहे. जपानचे लोक हिंदुस्थानावर उपकार करण्यास तयार झाले, हे त्यांचे आपल्यावर महदुपकार आहेत. जर आपणांस कलाकौशल्याची गरज आहे, तर मग द्रव्य खर्चून, आर्जव करून, किंवा सेवा करून तें मिळविलें पाहिजे. रशियाचा झार पिटर धी ग्रेट यानें देशहिताकडे नजर देऊन जसा मोठेपणा बाजूस ठेवून मजूराप्रमाणें काम करून लोकांस कित्ता घालून दिला, व त्याचा कित्ता मागें सांगितलेल्या बाबूद्वयांनीं वळविला, तसा आपणही वळविला पाहिजे. बृहस्पतिपुत्र कच यानें शत्रूंजवळून युक्तीनें विद्या संपादन केली, व आपणांस मित्रांजवळून संपादन करतां येऊं नये, यावरून आपल्यांत किती कमतरता आहे, हेंही समजण्यासारखें आहे. हल्लींसारखी स्थिति आणखी कित्येक वर्षें राहिली, म्हणजे आज येथें जें द्रव्य दिसत आहे, तें मग व्यापारामुळें दुसऱ्या देशांत जाणार यांत संशय नाहीं. ही गोष्ट जर निश्चित आहे, तर मग राजेरजवाडे, जहागीरदार, शेटसावकार यांनीं आपल्या द्रव्यापैकीं कांहीं भाग देशी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे कां खर्चू नये तें मला कळत नाहीं. आजपर्यंत हिंदुस्थानांतून लुटीच्या रूपानें थोडें द्रव्य बाहेर गेलें काय ? तें सर्व द्रव्य खर्चून येथें पाठशाळा घातलेल्या असत्या तर त्या योगानें लोकांमध्यें विद्या पुष्कळ वाढली असती; ती विद्या व पाठशाळा गलबतांत घालून बाह्यप्रदेशीं नेतां आली नसती, हें सांगावयास नकोच. जपान

देशांतील लोकांस हल्लीं जें कसब प्राप्त झालें आहे, तें कोठें तरी जाऊन शिकल्याखेरीज आलें नाहीं, हें उघड आहे. हल्लींचा काळच असा आहे कीं पैसा असल्यावर मुळींच अडचण पडत नाहीं. मुंबई येथील गिरण्या चालविणारे कसबी कारागीर मोठाले पगार देऊन इतर देशांतून आणविले, हें ध्यानांत आणणें जरूर आहे. असो, विद्याभ्याससंबंधानें दुसरी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. आपण आपल्या मुलाबाळांच्या खाण्यापिण्याचा, व कपड्यालत्याचा बंदोबस्त ठेवण्याची काळजी बाळगतों, दुसऱ्यावर सहसा विसंबत नाहीं; तर मग विद्याभ्याससंबंधानेंच मात्र आपण पराकाष्ठेचे बेफिकीर राहून आपल्या पोराबाळांचें अकल्याण करण्यास कारण व्हाव, हें बरें दिसत नाहीं. आई व दाई अगर घरचें जेवण व खाणावळींतील जेवण यांमध्यें जितका फरक असतो, तितकाच दुसऱ्यांनीं दिलेलें शिक्षण व स्वतः दिलेलें शिक्षण यांत फरक आहे. तसें नसतें तर मयत प्रिन्स बिस्मार्कसारख्या मुत्सद्यास वृद्धापकाळीं मुलांच्या अभ्यासावर लक्ष्य ठेवण्याचें कांहीं कारण नव्हतें. राज्यकारभारामध्येंच ज्यांचा बहुतेक वेळ जावयाचा, ते सुद्धां आपल्या मुलाबाळांच्या अभ्यासावर नजर ठेवीत असत, तर मग इतर लोकांनीं किती लक्ष्य दिलें पाहिजे बरें? पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आमच्यांतील बहुतेक सुशिक्षित मंडळी तासांचे तास सोंगट्या, बिझिक, बुद्धिबळें वगैरे खेळ खेळण्यांत घालवितात! मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष्य देतील तर शपथ! प्रत्यक्ष स्वतःच्या मुलांच्या अभ्यासाबद्दल ज्यांस भारी अनास्था आहे, तेच जर दुर्दैवेंकरून युनिव्हर्सिटीचे 'फेलो' झालेले असले, ह्मणजे मग न्यायमूर्ति

रानड्यांसारख्या देशहितेच्छूंनीं युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमांत योग्य फेरफार व्हावा या सदिच्छेनें किती जरी खटपट केली, तरी तिला यश मिळणें अशक्य होय, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. युनिव्हर्सिटीमध्यें देशी भाषांचा प्रवेश व्हावा, अशाबद्दल आज पुष्कळ वर्षें एकसारखी ओरड होत आहे, परंतु अद्याप कांहीं दाद लागत नाहीं. ह्मणून नामदार न्या० रानडे यांनीं मायभाषेबद्दल मुंबईच्या टाइम्समध्यें मोठ्या आस्थेनें लिहिलेलीं चार पत्रें प्रसिद्ध केलीं. परंतु आमच्या दुर्दैवानें ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं फक्त एक 'फेलो' च्या गैरहजेरीमुळें साठ वर्षांनीं सुंठ फुलण्याचा सुयोग हातचा गेला! विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा बोजा दुहेरी पडत असल्यामुळें किती विद्यार्थ्यांच्या अमोलिक आयुष्याची माती झाली आहे, याचा या अनास्थाप्रिय फेलोंनीं कधीं विचार केला आहे काय? युनिव्हर्सिटी परीक्षासत्रांतून तावून सुलाखून पसंत ठरलेल्या विद्यार्थ्यांपैकीं डा० गोखले, बहादुरजी, प्रि० आपटे, आगरकर, जस्टिस तेलंग, राव ब० पंडित, केळकर, असे किती तरी विद्यार्थी आजपर्यंत अकालीं निजधामास गेले असतील! याला अभ्यासाचा बोजा मुळींच कारण नाहीं, असें ह्मणवेल काय? आपली प्रगति व्हावी अशी इच्छा असेल, तर मुलांवरील अभ्यासाचा बोजा करवेल तितका कमी करणें अत्यंत इष्ट आहे. हा विषय गहन आहे, यावर आणखी पुष्कळ लिहितां येईल. परंतु स्थलावकाश नसल्यामुळें हा विषय मी येथेंच संपवितों.

समाप्त.